UNIVERSAL LIBRARY
OU_192457
UNIVERSAL LIBRARY

सागर साहित्य

८

# वैमानिक हल्ला

## व इतर गोष्टी

लेखक

भा. वि. वरेरकर

प्रकाशक

बा. द. सातोस्कर, बी. ए.

प्रकाशक—बा. द. सातोस्कर, बी. ए.
सागर साहित्य कार्यालय.
त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४.

CHECKED

प्रसिद्धि—मार्च १९३८

प्रथमावृत्तीचे हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

किं. सव्वा रु.

मुद्रक—ब्रम्हानंद मुकुंद नाडकर्णी
बकुल आर्ट प्रिंटिंग प्रेस.
आंबेवाडी, गिरगांव, मुंबई.

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| | | | पृ |
| प्रस्ताव | | | १ |
| मॉडर्न आर्ट व मामांची प्रतिमा | | | ४ |
| मनोगत | | | ७ |
| कथा | प्रसिद्धि | | |
| वैमानिक हल्ला | चित्रा, | दिवाळी अंक १९३६ | ९ |
| टेलिफोन | सत्यकथा, | डिसेंबर ,, | १९ |
| विचारी शालिनी ! | ,, | फेब्रुआरी १९३७ | २८ |
| मुलगा कीं जांवई ? | ,, | एप्रिल ,, | ३६ |
| यमुनेचे विवाह ! | ,, | मे ,, | ४५ |
| प्रेमाचा बळी ! | ,, | जून ,, | ६० |
| त्याचें उत्तर ? | ,, | जुलै ,, | ७० |
| दरोडेखोर ! | ,, | ऑगस्ट ,, | ७८ |
| दुःख आणि सुख | ,, | सप्टेंबर ,, | ८८ |
| दोन दृष्टी | उषा, | नोव्हेंबर ,, | ९५ |
| लोखंडाचा रस | चित्रा, | दिवाळी अंक ,, | १०४ |
| छावणींत | अप्रकाशित, | डिसेंबर ,, | ११२ |
| गोव्याचा पाहुणा | ,, | ,, ,, | १२० |

# साहित्याचें आगामी वाङ्मय

## अनंत काणेकर

तुटलेले तारे (लघुनिबंध)

धुक्यांतून लाल ताऱ्याकडे


## भा. वि. वरेरकर


? ? ? (कादंबरी)

## तोंड ओळख

(सरस पोर्तुगीज लघुकथांच्या

भाषांतरांचा प्रातिनिधिक संग्रह)





# प्रस्ताव

सुमारें तीस–पस्तीस वर्षांपूर्वी लंडन येथें 'Englishman's Home' या नावाचें एक नाटक रंगभूमीवर आलें होतें. इंग्लंडवर परचक्र आलें अशी कल्पना करून या नाटकाची सुरवात केली होती. शत्रूचा मारा सुरू झाला असतांना स्वतःच्या घराचा बचाव कसा करायचा हें इंग्लिशमनच्या कल्पनेंत सुद्धां येईना. घरांतील पासोड्या गोधड्या खिडक्यांना लावून तो बचावाचीं साधनें निर्माण करूं लागला. असें जें एक दृश्य दाखविलें होतें त्यामुळें तत्कालीन सेनापतींनीं (बहुधा लॉर्ड रॉबर्ट्स्) या नाटकाकडे सरकारचें लक्ष वेधलें.

त्या लहानशा नाटकाचा परिणाम होऊन युद्धाच्या अपेक्षेनें इंग्लंडनें काय तयारी केली पाहिजे याची चर्चा पार्लमेंटमधें सुरू झाली आणि तिचा योग्य तो परिणाम दृश्य स्वरूपांत आला.

प्रचारात्मक वाङ्मयाच्या दृष्टीनें या नाटकानें जें कार्य केलें त्याची स्मृति मला पदोपदीं होत असते. आणि त्या परिणामकारकतेच्या स्मृतीनें प्रचारात्मकता नसेल तर तें वाङ्मय फोल वाटूं लागतें.

अपेक्षित युद्धाच्या भीतीनें युरोपियन राष्ट्रांतील नागरिकांचें संरक्षण कोणत्या उपायांनीं करावें याबद्दल जे नवेनवे शोध आणि त्यांचीं प्रात्यक्षिकें करून पहाण्यांत येत आहेत, त्यांचे इतिहास आम्ही वाचीत असतांही हिंदुस्तानवर अशा प्रकारचें संकट येईल कीं नाहीं याचा विचार सुद्धां करीत नाहीं. हिंदुस्तानच्या राजकारणाची विचक्षणा करीत बसतांना हिंदुस्तानच्या नागरिकांचें परदेशी हल्ल्यांपासून संरक्षण करण्याची अंधुक सुद्धां कल्पना हिंदी पत्रकारांच्या नजरेसमोर उभी राहूं नये याचें आश्चर्य वाटतें.

एकोणीसशें चवदा सालच्या पूर्वीची परिस्थिति ज्यांच्या आठवणींत आहे, त्यांना महायुद्ध सुरू झाल्यानंतर ज्या ज्या कांहीं घटना घडून आल्या, त्यांचा अंदाज

त्या सालापूर्वी कुणालाच आला नव्हता, याचीही आठवण असेल.

आतां महायुद्ध सुरू होणार यांत शंका नाहीं. त्यावेळीं पूर्वीसारखेच अनपेक्षित प्रसंग येतील असा अंदाज आज आपण कां करूं नये ? आजची परिस्थिति कशीही असो, उद्यांच्या काळांत लढाई सुरू झाल्यावर शत्रू कोण आणि मित्र कोण हें कळणें कठीण जाईल. मित्रराष्ट्रें शत्रू बनतील आणि त्यामुळे हिंदुस्तानवर हल्ला करण्यास कुठल्या ना कुठल्या तरी युद्धमान राष्ट्राला सोपे जाईल

आजही जपाननें चीनांत जे पाय पसरले आहेत त्याचा परिणाम उद्यां काय होणार आहे याची कल्पना आज करतां येणें कठीण आहे चीनचा मार्ग मोकळा झाल्यावर तिबेट दूर नाहीं आणि तिबेटचा दरवाजा उघडला तर हिंदुस्तानवर हल्ला करणें जपानला अशक्य होणार नाहीं

यांत्रिक शोधांत देखील गेल्या कांहीं वर्षांत जे बेफाम फरक होत आहेत, त्यामुळें आज अशक्य वाटणाऱ्या गोष्टी उद्यां शक्य होऊन बसतील. १९३६ च्या ‘ चित्रा ’ साप्ताहिकाच्या दिवाळी अंकात म्हणूनच ‘ वैमानिक हल्ला ’ ही काल्पनिक स्वप्नाभासावर आधारलेली कथा मीं लिहिली पण कोणत्याही वर्तमानपत्रानें त्या कथेचा उल्लेख सुद्धां केला नाहीं. परवांच एका वर्तमानपत्रानें थट्टा करण्यापुरता तरी या कथेचा उल्लेख करून जी जाणीव करून दिली त्यामुळेंच हा कथासंग्रह प्रसिद्ध करण्याची प्रेरणा झाली आणि म्हणूनच या कथेला अग्रस्थान देऊन गेल्या वर्षांतील माझ्या लघुकथा मी प्रसिद्ध करीत आहे

युद्धाची प्रत्यक्ष झळ हिंदुस्तानाला जरी लागली नसली तरी हिंदुस्तानचे पुष्कळ जीव गेल्या महायुद्धांत बळी गेलेले आहेत त्यांचा इतिहास शोधून काढण्याचा प्रयत्न कुणीही केला नाहीं १९२० सालीं या महायुद्धाच्या परिस्थितीवर आधारून ‘लढाईनंतर’ या नांवाचें नाटक मी लिहायला सुरवात केली होती आणि त्याचा प्रयोग पहिल्यानें यशवंत संगीत मंडळीने करायचें ठरविलें होतें पुढे गणपतराव बोडस यांचा त्या कंपनीशीं असलेला संबंध सुटल्यामुळें तें नाटक तसेंच राहिलें. त्यानंतर केशवराव भोंसले यांनीं आपल्या ललितकलादर्श नाटक मंडळीकडून त्या नाटकाचा प्रयोग करण्याचें ठरविलें या नाटकाच्या तालमींस सुरवात होण्यापूर्वीं केशवराव दिवंगत झाले. आणि त्यावेळीं तें नाटक रंगभूमीवर आणण्याचें राहून तसेंच गुलदस्तांत पडून राहिलें.

गेल्या वर्षी ' त्रिकाळ ' कर्त्यांनीं आपल्या साप्ताहिकांत याच कथानकावर आधारलेली ' १९१४ नतर ' ही कादंबरी प्रसिद्ध करायला सुरवात केली. तीही अर्धवटच प्रसिद्ध झाली आहे प्रस्तुत कादंबरी पुरी होऊन दोनतीन महिन्यांत प्रसिद्ध होण्याचा योग येईल, असें दिसत आहे

'All Quiet on the Western Front' ही कादंबरी एका जर्मन लेखकानें लिहिली तिचें साऱ्या भाषात भाषातर झालें सर्व जगानें त्या कादंबरीचें कोडकौतुक केलें तो लेखक स्वत रणांगणावर गेला होता हिंदुस्तानांतून रणागणावर गेलेल्या व्यक्तीत दुर्दैवानें कुणी दूरदर्शी लेखक नव्हता. कॅ. लिमये यांच्यासारखा एक लेखक जरी प्रत्यक्ष लढाईवर गेला होता तरी त्यानें युद्धाच्या रणागणावरची पूर्णत्वाने कल्पना येईल असें कोणत्याच प्रकारचें लिखाण प्रसिद्ध केलें नाहीं. लेखक या नात्यानें माझे जे अनुभव आहेत, त्यांमुळें मी कॅ लिमयांना या बाबतींत दोष देणार नाहीं उद्‌बोधक आणि प्रक्षोभक वाङ्मय प्रकाशकाना नको असतें सरकारी बंधनामुळे ही वृत्ति प्रकाशकांच्या अगीं निर्माण झाली आहे हें जरी खरें असले, तरीही लेखकावरील हीं बधनें नाहीशी होण्यासाठी प्रकाशकानीं प्रयत्न असे कांहीही केलेले नाहींत

फॅसिझम आणि इंपीरियालिझम यांमुळें आज साऱ्या जगांत एका विशिष्ट प्रकारची परिस्थिति निर्माण झाली आहे. याची जाणीव बहुजनसमाजाला येईल अशा प्रकारचें वाङ्मय निर्माण होणे आज आवश्यक आहे. या क्षेत्राचा शास्त्रोक्त अभ्यास केला आहे अशा लेखकानी आपल्या कर्तव्याला जागलें पाहिजे.

परतु तशी स्फूर्ति कोणत्याच लेखकाला झालेली दिसत नाहीं एकादी दुसरी लहानशी गोष्ट किंवा एकादी कादंबरी या विशिष्ट परिस्थितीवर लिहिल्यानें मोठेंसें कार्य होईल असा समज करून घेण्याइतका मी आशाळभूत नाहीं अशा प्रकारचें वाङ्मय निर्माण होण्यासाठी अधिकारी व विद्वान लेखकांनीं काहीच केलेलें नाहीं, हें प्रत्यक्ष पाहिल्यावर माझ्या या अत्यत क्षुल्लक अशा प्रयत्नाबद्दल मला अभिमान वाटतो.

हाजीकासमवाडी, फ्रेंच पूल,
गिरगांव, मुबई
ता. १९-१२-३७

भा. वि वरेरकर

# मॉडर्न आर्ट व मामांची प्रतिमा

गेल्या वर्षी येथील 'बॉम्बे आर्ट सोसायटी' तर्फे भरलेल्या कलाप्रदर्शनांत कु. अमृत शेरगिल यांच्या चित्राला ज्यावेळीं सुवर्णपदक देण्यांत आलें त्यावेळीं मॉडर्न आर्ट व परीक्षक मंडळ यांच्यावर टीकाकारांनीं टीकेची एकच झोड उडविली परीक्षक मंडळांत मी असल्यामुळें मला ह्या टीकेला उत्तर द्यावें लागलें तरीही मॉडर्न आर्टचें आपण स्तोम माजवतां तर आपणच कां अशी एकादी कृति करीत नाहीं ? असा सवाल मला करण्यांत आला त्या सवालाला उत्तर द्यावें व वास्तववादी ( Realistic ) कलेचे नमुने करून कटाळलेल्या मनाला कांही निराळ्या प्रकारचें काम करून हुरूप आणावा ह्या दोन हेतूनीं 'आधुनिक कले' च्या तत्रास अनुसरून एकादी कलाकृति घडवावी असें बऱ्याच दिवसांपासून मीं ठरविलें होतें. वेळांत वेळ काढून तशा प्रकारचा अर्धपुतळा करण्याकरतां मॉडेल म्हणून मामा वरेरकर यांची मी निवड केली. व त्यांनींही त्या कामास आनंदानें संमति दिली ज्या पुतळ्याचा आज एवढा गवगवा झाला आहे, त्याबद्दल माझा खुलासा काय आहे हें मला विचारण्यांत आलें, म्हणून हे दोन शब्द मी लिहीत आहें.

कलावानांच्या निसर्गविषयक भावना व कल्पना यांचा आविष्कार करायच्या एकंदर तीन पद्धती आहेत यथातथ्यदर्शन पद्धति ( Representation ) भावनायुक्त आविष्करण पद्धति (Interpretation with sentiments) आणि बौद्धिक व तांत्रिक स्वातंत्र्ययुक्त आविष्करण पद्धति ( Interpretation with every liberty) पहिल्या पद्धतीस पाश्चात्य (Western) दुसरीस हिंदी ( Indian ) व तिसरीस आधुनिक ( Modern art ) कला असें म्हणता येईल. ह्या तिन्ही पद्धतीचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. परतु वरील तीन पद्धतींपैकीं तिसऱ्या पद्धतीस अनुसरून मामांचा अर्धपुतळा घडविण्यांत आला आहे, हें न सांगतांही समजण्यासारखें आहे. मामा वरेरकरांचें हें कॅरिकेचर नव्हे किंवा

विडंबनही नव्हे मामाचा हा Idealistic Portrait आहे मामांच्याविषयी माझ्या ज्या भावना व कल्पना (Conceptions) आहेत त्याचें हे विशदीकरण आहे मामांच्या चेहऱ्याचे साम्य त्यांच्या प्रतिमेंत ठेवण्यात आलें असूनही मला मामांच्या स्वभावाचे जे विशेष वाटतात त्याचा आविष्कार करण्याचा प्रयत्न मी केला आहे. मामाच्या बाह्य स्वरूपाचेच तेवढें साम्य प्रस्तुत कृतीत दाखविलें नसून त्यांच्या स्वभावाचें मर्मही उघड करण्याचा तो प्रयत्न आहे. कल्पनेला स्वातंत्र्य देऊन व तिला थोडी स्वैर सोडून आणि प्रतीकाचा उपयोग करून मामांच्या स्वभावाचें (Character) स्पष्टीकरण (Interpretation with every liberty ) ह्या अर्धपुतळ्यात केलें आहे

वरील पध्दतीनें ज्या व्यक्तीचें चित्रण करावयाचे असतें, ती व्यक्ती आपली निकटवर्ति असावी लागते त्या व्यक्तीच्या स्वभावाचे विशेष व त्याच्या बारीक सारीक छटा कलावानाला परिचित असाव्या लागतात कारण कलावानाच्या दृष्टीनें तो आपल्या विषयाची रचना करीत असतो माझ्या कृतीसाठी मी मामांची निवड केल्यामुळे माझ्या बाबतीत ती अडचण नव्हतीच

मामाचे प्रथमदर्शनी दिसणारें वैशिष्ठ्य म्हणजे त्याची विशाल बुद्धिमत्ता. विस्तृत कपाळ दाखवून हें वैशिष्ठ्य सूचित करण्यात आलें आहे. शिवाय मुळांतच मामांचें कपाळ विस्तृत असल्यामुळें त्यांत साम्यही साधलेलें आहे मामाचा दुसरा विशेष म्हणजे त्यांचा साधेपणा मानेखालील धडाचा आकार परंपरेला सोडून ब्लॉक-सारखा ठेवण्यात मामा मामांच्या बोलण्यांतील व वागण्यांतील साधेपणा दाखविण्याचा हेतु आहे लेखक हा चर्मचक्षूनीं जगातील प्रत्यक्ष[concrete] वस्तू पहात असला तरी अप्रत्यक्ष[abstract] वस्तू पहाण्याकरता त्याला आपली दृष्टि अंतर्मुख करावी लागते लेखकाची दृष्टि जेवढी अंतर्मुख असेल तेवढी त्याची प्रतिभा पल्लेदार असते. मामाची प्रतिभा किती प्रभावी आहे हें मी सांगायला नकोच डोळ्यांत बुबुळें न दाखवूनच मामांची ही अंतर्मुख दृष्टि सूचित करावी लागली. मामांचा कोंकण-विषयींचा तीव्र अभिमान व प्रेम, कोकणचे प्रातिनिधिक फळ जें फणस त्याच्या कवचाचा सदरा घालून प्रगट केलें तर त्यांत कुठे बिघडले ? मामांच्या स्त्रीस्वातंत्र्या-च्या कल्पना काय आहेत हे त्यांच्या कलाकृती वाचणाऱ्या रसिकांस माहीत आहेच स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा वाढावा,त्यांच्यावरील समाजानें लादलेली

बंधने ढिलीं व्हावींत म्हणून ते करीत असलेल्या प्रयत्नांची कल्पना आणून देण्याकरतां त्यांच्या केसाच्या वेण्या घातल्या तर तें औचित्यास सोडून खास नाहीं. मामांच्या विचारांतील पल्लेदारपणा, त्यांच्या उच्चारांतील तिखटपणा व आचारांतील उत्साह—किंबहुना त्यांच्या एकंदर जीवनांतील जिवंतपणा यांचें आविष्करण करण्यास फॉस्फरसशिवाय दुसरा कोणता पदार्थ समर्थ आहे? माशात असलेले फॉस्फरसचें प्रमाण पहातां मामाचे वरील स्वभावविशेष दाखविण्याकरतां त्यांच्या कानाच्या ठिकाणी माशांची योजना केली आहे शिवाय मामांचा विश्वास आपल्या डोळ्यांऐवजीं कानांवर जास्त असल्याचे दाखवावें म्हणून मी कानांना जास्त महत्त्व दिलें शेवटचा एकच मुद्दा सांगावयाचा म्हणजे मामांचें एकंदर जीवितच जें परिस्थितीशी झगड्यांत, विरोधाशी झुज खेळण्यात, संकटांना तोंड देण्यांत व्यतीत झालें, त्याची परिपूर्ण कल्पना देण्याकरतां त्यांच्या चेहऱ्यावरील वक्र रेषांना उठाव देण्यांत आला तर त्यात साम्यतादर्शनाला कुठें बाध येतो?

मामांच्याविषयीं माझ्या भावना काय आहेत व त्यांच्याकडे मी कोणत्या नजरेनें पहातों हें मी प्रत्यक्ष माझ्या कलाकृतीत व आतां शब्दांनीं वर्णन करून सांगितलें आहे इतरांना कांहींही वाटलें तरी मामांना तें 'कॅरिकेचर' वाटत नाहीं यांत मला आनंद आहे परंपरेच्या बंधनांनीं बांधलेल्या वास्तवकलेचें तंत्र सोडून सर्वस्वी निराळ्या प्रकारच्या प्रतीकात्मक कलेच्या आश्रयानें आपली प्रतिमा करण्यास संमति दिल्याबद्दल मी मामांचा अत्यंत आभारी आहें.

ताडदेव, मुंबई
ता २०–१–३८

वि. पां. करमरकर.

# मनोगत

मडगावला एका प्रसगी अध्यक्षीय व्यासपीठावरून मामा वेरेरकरांनी गोमन्तकाला आपले माहेर म्हणून सबोधलें होतें. मामांनी निवळ विनोदनिर्मिती-साठीं तसें म्हटलें नसून ते उद्‌गार त्यांनीं अंतःकरणपूर्वक काढले असले, तर प्रस्तुत पुस्तक 'सागर साहित्या' तर्फे प्रकाशित होत असल्याचें पाहून माहेरवासाचा आनद त्यांना होईल अशी मी आशा करतों मलाही हें पुस्तक वाचकांच्या हातीं देतांना होणाच्या आनदात एक प्रकारचा आगळेपणा वाटत आहे. आतापर्यंत निघालेलीं 'साहित्या' ची पुस्तके गोमन्तकीय लेखकाचीं होती. 'वैमानिक हल्ला' प्रसिद्ध करतांना 'साहित्या' च्या प्रांतिक मर्यादेचें उल्लघन करून मी इतर महाराष्ट्राच्या विस्तृत परिसरांत पाऊल टाकलें आहे महाराष्ट्रांतील ग्रथकार, वाचक [पुस्तक विकत घेऊन वाचणारे], व पुस्तकविक्रेते माझे हें पाऊल स्थिर रहाण्यास मदत करतील अशी मला खात्री वाटते

भावि महायुद्ध सुरू झाल्यास हिंदुस्तान ही युद्धभूमि होण्याची शक्यता, कराची, मुंबई सारख्या शहरांवर वैमानिक हल्ले होण्याची सभाव्यता, इ विषयावरील वृत्तपत्रांतील चर्चा, विषारी वायुपासून सरक्षण करण्याचीं सरकारकडून केलीं जाणारी प्रात्यक्षिकें, मुंबईतील Black-out ची रगीत तालीम, वगैरे गोष्टींकडे जरी स्थूल दृष्टीनें पाहिलें, तरी युद्धाच्या हालचालीचे वारे कोणत्या दिशेनें वहात आहेत याचें अनुमान आज करतां येतें अशा कल्पनेवरच आधारलेली पण उपरोल्लेखित गोष्टी घडण्यापूर्वी सव्वा वर्षामागें मामा वेरेरकरांनी लिहिलेली एक कल्पित कथा आजच्या घटकेस प्रसिद्ध केली तर तें इष्ट होईल असें मला वाटले अर्थात् 'वैमानिक हल्ला' या गोष्टीबरोबरच त्यानंतरच्या कालात लिहिलेल्या कथाही अंतर्भूत करणें क्रमप्राप्त होतें तरीही इतर गोष्टी नुसत्या खोगीरभरतीसाठीं घेतलेल्या नसून, 'दोन दृष्टी', 'दरोडेखोर', 'छावणींत' सारख्या सुंदर गोष्टी पहिल्या गोष्टीइतक्याच सरस आहेत.

'वैमानिक हल्ला' ह्या गोष्टीशिवाय, ज्या दुसऱ्या एका गोष्टीचा विशेष उल्लेख करायचा ती म्हणजे 'छावणींत'. लढाईच्या पार्श्वभूमीवर रंगवलेलें वाङ्मय

मराठी लेखकांनीं निर्माण केलें नाही अशी रास्त तक्रार मामांनीं आपल्या 'प्रस्तावां'त केली आहे. मामांना कोणत्या प्रकारच्या ललित वाङ्मयाचा अभाव भासतो त्याचें उदाहरणच कथेच्या रूपानें त्यांनीं दिलें आहे 'छावणीत' ही कथा म्हणजे एक सत्यकथा होय कथेंतील नायकाला बगाली पद्धतीचे नांव देऊन मामांनीं ही गोष्ट महायुद्धकाली एका बंगाली तरुण डॉक्टराच्या बाबनीत प्रत्यक्ष घडलेली आहे हे सूचित केलें आहे ही व 'गोव्याचा पाहुणा' अशा दोन गोष्टी मामानी प्रस्तुत पुस्तकाकरता मुद्दाम लिहून दिल्या. तसेच प्रकाशकांना नेहमीच धोरेखाली धरणाऱ्या मामानीं मला ह्या पुस्तकाच्या व्यवहाराच्या बाबतींत---कदाचित प्रकाशक ह्या नात्यानें न पाहता---अत्यंत सौहार्द दाखविलें ह्याबद्दल मी त्याचा नेहमींच ऋणी आहें

मामाच्या निरनिराळ्या पोझिस्‌मध्यें प्रसिद्ध होणाऱ्या छायाचित्रांपैकीं एकाद्याची पुनरावृत्ति करण्यापेक्षां मामाचें व्यक्तिवैशिष्ट्य व्यक्त करणाऱ्या एका अर्धपुतळ्याचे छायाचित्र देणें मला विशेष औचित्यपूर्ण वाटलें सुप्रसिद्ध शिल्पकार श्री वि. पा करमरकर यानीं हा पुतळा तयार केला असून 'बॉंबे आर्ट सोसायटी'च्या चालू वर्षाच्या प्रदर्शनांत तो ठेवण्यांत आला होता प्रदर्शन चालू असताना येथील इंग्रजी-मराठी-गुजराती वृत्तपत्रांतून पुतळ्यासबंधीं अनुकूल-प्रतिकूल ( विशेषत मराठींत प्रतिकूल ) टीका येऊ लागल्या. अर्थात् कलावानानें आपली भूमिका स्पष्ट करणें जरूर होतें. प्रस्तुत पुस्तकांत ह्या वादविषयाचीं छायाचित्रें देण्यांत येत असल्यामुळें शिल्पकाराचा खुलासाही त्याला जोडूनच प्रसिद्ध होणें, श्री करमरकरांच्या, वाचकांच्या व प्रकाशकाच्या दृष्टीनें सोईचे झाले असतें माझ्या विनतीस मान देऊन पुतळ्यासंबंधींची आपली भूमिका स्पष्ट करणारा व मॉडर्न आर्टचें तात्विक विवेचन करणारा एक छोटेखानी लेखच श्री. करमरकरांनीं लिहून दिला व ब्लॉककरता प्रतिमेचीं छायाचित्रेंही दिलीं ह्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहें

पुस्तकाचें बाह्यांग सजविण्याचें काम एक उदयोन्मुख चित्रकार, चित्रा, प्रकाश, इ. चे कार्टूनिस्ट व माझे नवपरिचित गोमन्तकीय स्नेही श्री. दीनानाथ दत्तात्रय दलाल यांनीं व छपाईचें काम श्री ब मु नाडकर्णी यांनीं चागल्या प्रकारें पार पाडलें, ह्याचा साभार उल्लेख करणें जरूर आहे

५ ई चुनाम लेन, मुंबई ७
ता. ६-२-३८

बा. द. सातोस्कर

# वैमानिक हल्ला

शेवटीं एकदांची लढाई सुरू झाली. हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानाबाहेर कित्येक महिने चर्चा चालली होती खात्री कुणालाच नव्हती पण अशी खात्री नसते त्याच वेळीं लढाई सुरू होते हा अनुभव गेल्या लढाईच्या वेळीं आला होता म्हणून ही लढाई सुरू झाल्याचें कुणाला तितकेंसें आश्चर्य वाटलें नाहीं

पूर्वीप्रमाणेंच शत्रु-मित्रांची गल्लत झाली होती. पूर्वी जीं राष्ट्रें दोस्त राष्ट्रें होतीं तीं या वेळीं शत्रु—राष्ट्रें झालीं होतीं

पूर्वीच्या अनुभवावरून हिंदुस्थानला या लढाईची कांहींच फिकीर वाटत नव्हती युरोपांत कुठेही लढाई झाली किंबहुना अमेरिका त्यांत पडली तरीही प्रत्यक्ष लढाईच्या दृष्टीनें हिंदुस्थानकडे पहातो कोण, असेंच सर्वत्रांना वाटत होतें

पण हा अदाज चुकला आणि शत्रु—राष्ट्रांचे हल्ले हिंदुस्थानावर होऊं लागले

जिकडे तिकडे एकच हलकल्लोळ माजला. तयारी कुठेंच नव्हती. सर्वच बेसावध होते आणि हिंदुस्थानांतील बरेंचसें सैन्यही युद्धाच्या निरनिराळ्या आघाडीवर पाठविण्यांत आलें होतें

तरीही हिंदुस्थानांत प्रत्यक्ष युद्धाची आघाडी अशी निर्माण झाली नव्हती. होत होते ते नुसते छापे होते. एमडेनसारखें एखादें चुकारू गलबत निरनिराळ्या किनाऱ्यांवरून धामधूम माजवीत होतें. विमानाचा हल्ला होण्याची तितकी भीति नव्हती. जीं युद्धयमान राष्ट्रें होतीं तीं हिंदुस्थानच्या सरहद्दीपासून बऱ्याच दूर अंतरावर होतीं अशा राष्ट्रांतून येणारीं विमानें हल्ला करून परत गेलीं तर त्यांना मुक्काम करण्याच्या जागा जवळपास नव्हत्या.

अरबी समुद्रांतील कोंकणच्या किनाऱ्यावर जेव्हां एके दिवशीं एक विमान

घिरट्या घालतांना दिसलें त्यावेळी त्याचें कुणालाच आश्चर्य वाटलें नाही. हें विमान आपलेंच असावें असाच सर्वत्रांचा समज झाला

रत्नागिरीच्या किनाऱ्याशेजारीं हे विमान सारखें घिरट्या घालूं लागेतोंपर्यंत लोकाचें लक्ष त्याच्याकडे वेधलें नव्हतें लढाई सुरू झाल्यापासून कितीतरी विमानें ये जा करीत होतीं त्यांतलेच हें एक विमान असेल असा सर्वांचा समज होता.

पण तें खरोखर ज्यावेळीं अगदी जमिनीला भिडायला येण्याइतकें नजीक आलें त्यावेळी रत्नागिरीच्या रहिवाशांची एकच तारांबळ उडाली लोकांचे थवेच्या थवे बदरावर धावत जाऊं लागले

विमानाच्या गतींत कांहीतरी घोटाळा झाला होता, हें प्रेक्षकांना दिसत होतें. विमान अगदीं खालीं खाली घसरत येत पुन· वर उठाव करीत होते—स्वत·भोंवतीं चकरा घेत होतें

लोकाना ती गंमत वाटली हे विमानाचे प्रयोग चालले आहेत असा समज करून घेऊन लोक गजर करून टाळ्या वाजवूं लागले.

तोंच विमान खालीं पडलें बंदरावरील धक्क्याच्या टोंकावर जेव्हा तें पडलें तेव्हां सारेच लोक धांवत धक्क्यावर गेले.

धक्क्यावरून विमान खालीं पाण्यांत कोसळून पडलें असें पाहतांच रत्नागिरीच्या खलाशांनीं पाण्यांत उड्या टाकल्या आणि विमानांत असलेल्या माणसांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न चालवला.

विमान ज्या वेळीं धक्क्यावर आदळलें त्यावेळीं त्यांतील एक मनुष्य अलगत समुद्रांत पडला हें कुणाच्या लक्षातही आलें नव्हतें पोहत पोहत तो धक्क्याच्या बाजूला आला त्या वेळीं लोकांची नजर त्याच्याकडे गेली

पाण्यावरून लोकांनीं त्याला वर ओढून घेतलें.

तो थकला होता. अंगावरील अवजड पोशाखामुळें पोहणें त्याला कठीण गेलें होतें. धक्का जवळपास नसता तर तो बुडून मेला असता

समुद्रांत उडी टाकलेल्या खलाशांनीं विमानांत अडकलेल्या दोन माणसांचीं प्रेतें बाहेर काढलीं.

त्यांना शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न करण्यांत आले. पण त्यांचा प्राण

आधींच निघून गेलेला होता.

जिवंत राहिलेला तिसरा माणूस लोकांच्या तोंडाकडे नुसता पहात होता

त्यानें बोलायला सुरवात केली पण त्यांची भाषा कुणालाच कळेना साधारण खुणांनीं—आणि इंग्रजीतून प्रश्न केल्यावर त्यानें मोडक्या इंग्रजीत त्यानें—आपण जर्मन असल्याचें सांगितलें

तो जर्मन आहे असें कळतांच एकेक माणूस पाऊल मागे घेऊन घरची वाट धरूं लागला. पाहतां पाहतां एकदोन खलाशी आणि एक वृद्ध गृहस्थ यांच्याखेरीज धक्क्यावर कुणीच राहिले नाहीं.

गावात बातमी पोचल्यामुळे पोलिसांची तुकडी सर्व प्रकारानंतर धक्क्यावर येऊन पोहोंचली. प्रश्नोत्तरें सुरू झाली पण त्या माणसाला जेव्हा उत्तरे देतां येईनात त्या वेळीं पोलीस ऑफिसर त्या वृद्ध गृहस्थाकडे वळले आणि म्हणाले,

" तुम्हीच आतां याला विचारून पाहा, डॉक्टर."

डॉक्टर म्हणाले, " विचारण्याची जरूरी नाहीं. त्याच्या बोलण्यावरून तो जर्मन आहे हें उघड उघड दिसतें आहे. तुमची हरकत नसेल तर मी त्याला माझ्या घरी घेऊन जातों पाहिजे तर तिथें पोलिसाचा पहारा ठेवा " त्या वैमानिकाला उद्देशून डॉक्टर जर्मनमध्यें म्हणाले, " तुम्ही माझ्या घरीं चला. पोलिसांना तुमची चौकशी करायची आहे."

आपल्या सोबत्यांचीं प्रेतें पाहून त्याच्या डोळ्यांवाटे पाणी येत होतें. तो खालीं वळला आणि त्यानें त्यांच्या थंड झालेल्या गालांचें चुंबन घेतलें.

कांहीं न बोलता तो डॉक्टरबरोबर निघाला डॉक्टरांची तयारी होती

ते मोटरींत जाऊन बसतांच पोलिस ऑफिसरही त्या मोटारींत शिरले. आणि बाकीची पोलीस-तुकडी दुसऱ्या एका मोटरींतून त्यांच्या मागोमाग निघाली.

अगदीं पहिल्या अमदानींत जर्मनींत शिक्षणासाठीं जीं माणसें हिंदुस्थानांतून गेलीं त्यांत डॉ. मनोहर हे प्रमुख होते. जर्मनींत डॉक्टरीची डिग्री मिळाल्यावर कित्येक वर्षें त्यांनीं तिकडेच प्रॅक्टीस सुरू ठेवली होती. त्यांचा मुलगा माधव जर्मनींतच जन्माला आला होता. आज तोही डॉक्टर होऊन मुंबईला प्रॅक्टीस करीत होता. प्रॅक्टीस सोडल्यानंतर वृद्धापकाळांतील दिवस सुखा-समाधानांत घालवावे म्हणून रत्नागिरीस एक घर घेऊन डॉक्टर मनोहर हे इतर चार

पेन्शनरांसारखेच राहिले होते.

त्याची रहाणी युरोपियन पद्धतीची होती त्यामुळें रत्नागिरीतील स्थाईक लोक त्यांच्याशी फारसा संबंध ठेवीत नसत. त्यांची सूनही जर्मन होती. आणि त्यावेळीं ती रत्नागिरीलाच रहाण्याकरतां आली होती

वैमानिकाला घेऊन डॉक्टर मनोहर ज्या वेळीं घरीं आले त्या वेळीं त्याच्या घरासभोवार माणसाचा घोळका इतका जमला होता, की त्यांतून वाट काढून दरवाजा गांठतांना त्यांना फार प्रयास पडले

आंत येतांच तो वैमानिक दिवाणखान्यांतील एका खुर्चीवर आडवा झाला त्याला मूर्च्छा आली होती. डॉक्टरनीं त्याला थोडी ब्रँडी दिली त्या वेळीं तो सावध झाला सावध होतांच त्यानें इकडे तिकडे पाहिलें आणि बोलायला सुरवात केली.

पोलीस ऑफिसर शेजारींच बसले होते अर्थातच त्यांना त्यांची भाषा कळत नव्हती. पोलीस ऑफिसरनीं त्याच्या प्रत्येक शब्दाचें भाषांतर करून सांगण्याचा डॉ मनोहर यांना हुकूम केला

त्याचें नांव हायन्रिश स्लायशर असें होतें

त्यानें नांव सांगतांच डॉक्टर चमकले त्यांनीं आपल्या सुनेला हांक मारली घरात ती कामांत असल्यामुळें बाहेर आली नव्हती

डॉक्टरनीं हाक मारली तरी तिला यायला थोडा वेळ लागला. बाहेर येण्यासाठी पोशाख नीटनेटका करणें तिला अवश्य होतें म्हणून जरी तिला वेळ लागला होता तरी उशिराचें तेंच कारण होतें असें नाही

एकच दिवसापूर्वीं ती रत्नागिरीला आली होती लढाई सुरू झाल्यापासून जर्मन लोकांना वेचून काढून जवळ जवळ कैदेंत ठेवण्यांत येत होतें ती जर्मन आहे याचा रत्नागिरीतल्या लोकाना पत्ता नव्हता या वेळीं तो पत्ता लागेल आणि इतर जर्मनाप्रमाणेंच आपल्यालाही अटकेंत ठेवलें जाईल या भीतीनें ती फारशी घराबाहेर येत नसे.

तिला इंग्रजी येत नव्हतें. आणि म्हणूनच ती भीत होती

ती बाहेर आली. इझिचेअरवर पडलेल्या वैमानिकाकडे तिची नजर गेली.

आणि क्षणभर ती स्तंभित झाली.

डॉ. मनोहरनी तिला बोलावून शेजारच्या खुर्चीवर ज्यावेळीं बसवून घेतलें त्यावेळीं स्लायशरची नजर तिच्याकडे गेली.

तिला पहातांच स्लायशरच्या मुद्रेवर परिचयाची छटा एक क्षणभरच दिसून नाहींशी झाली

डॉक्टरांच्या तें लक्षांत आलें पण पोलीस ऑफिसर यावेळीं बेसावध होता.

दोघांनींही एकमेकांना डोळ्यानीं खुणा केल्याचें डॉक्टरनीं पाहिलें

झालेली हकीकत डॉ. मनोहरनीं आपल्या सुनेला सांगितली बोलतांना ते इंग्लिशमधें बोलत होते आणि त्यांच्या भाषणांतील एकही शब्द त्यांच्या त्या सुनेला कळत नव्हता, तरीही त्यांचें भाषण आपल्याला कळतें आहे असा बेमालूम आविर्भाव ती आणीत होती

पोलीस ऑफिसरनी डॉ. मनोहर यांच्या सांगण्याच्या अनुरोधानें नोट्स् लिहून घेतल्या स्लायशरबद्दलची सर्व जबाबदारी डॉ. मनोहर यांनीं लेखी लिहून दिल्यामुळें पुढील चौकशी होईपर्यंत पोलीस ऑफिसरनी त्याला डॉक्टरच्या घरीं राहण्याची तात्पुरती परवानगी दिली आणि त्यांच्या घरासभोंवार पोलीसांचा सशस्त्र पहारा ठेवून कूच केलें.

पोलीस ऑफिसर निघून जातांच डॉक्टरांची सून अत्यंत अस्वस्थ झाली. डॉक्टरनीं तिला खुणेनें दटावलें आणि स्लायशरला बरोबर घेऊन तीं तिघेंही आंतल्या खोलींत गेलीं.

आंतल्या खोलीत जातांच ब्रिजिट्—डॉक्टरांची सून—स्लायशरच्या एकदम गळी पडली.

डॉक्टरना संशय आधींच आला होता. तो तिचा भाऊ होता.

स्लायशरबरोबर विमानांत जे दुसरे दोघे होते ते मिलिटरी ऑफिसर होते. स्लायशरचा आणि त्यांचा परिचयाशिवाय स्नेहाचा असा कसलाच संबंध नव्हता तरीही त्यांच्या मृत्यूमुळें त्याला जबरदस्त धक्का बसल्याचें त्याच्या बोलण्यावरून दिसून येत होतें.

भावाबहिणीची अशी अचानक रीतीनें जी भेट झाली त्याचा डॉक्टर मनोहरच्या मनावरही परिणाम झाला होता. दोघांनाही मोकळेपणानें बोलूं द्यावें असें एक वेळ त्यांच्या मनांत आलें.

पण त्यांनीं स्वतः होऊन जी जबाबदारी पत्करली होती त्या जबाबदारीच्या दृष्टीनें तसें करणें योग्य झालें नसतें. म्हणूनच त्यांनीं स्पष्टपणें तसें बोलून दाखविलें.

स्लायशर म्हणाला, " मी वैमानिक झालों हें ब्रिजिट्ला माहीत होत आमच्या राष्ट्राच्या नियमाप्रमाणं लढाईच्या वेळीं खासगी वैमानिकाला देखील राष्ट्र सांगेल ती कामगिरी पत्करणं भाग होत लढाईत माझं मन नव्हतं पहिल्या-पासूनच लढाईचा मला तिटकारा राष्ट्रांच्या अग्रभागी जी माणस आहेत त्यांच्या मतभेदांमुळें ज्यांचा कांही संबध नाही, अशीं इतर राष्ट्रांचीं इतर माणसं लढाईच्या धामधुमीत निष्कारण मारलीं जातात, याचा पहिल्यापासून मला तिटकारा. पण अशाल्या धामधुमीच्या काळांत व्यक्तिविशेषाच्या मताला विचारतो कोण ? नोकरी पत्करण्याखेरीज मला गत्यंतर नव्हत यापूर्वी खासगी रीतीन विमानांतून लांब पल्ल्याच्या मजला मी मारल्या होत्या म्हणूनच माझ्यावर हें काम आलं माझी मतं आमच्या लोकाना माहीत होतीं म्हणूनच छापे कशा रितीनं घालायचे त्याच्या हालचाली मला कळवण्यांत आल्या नव्हत्या माझ्याबरोबर जे दोघे सैनिक होते त्यांच्या हातीं सर्व सूत्र होती मी नुसता मेकॅनिक होतों. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर गेल्या लढाईत एमडेन क्रूझरन जें काम केलं तेंच काम करण्यासाठी आम्हांला योजलं होतं एमडेनचा इतिहास म्हणजे गेल्या लढाईच्या इतिहासातील एक महत्त्वाचा भाग आहे असं आम्हा जर्मनांना वाटत. कोणता प्रांत बेसावध आहे हें अचूक ओळखून त्या प्रातावर अचानक छापा घालून नुसतं काहूर माजवायचं ही आमची योजना होती. पण अस करताना निरपराधी जीवांचे प्राण जाणार होते हें मला पटत नव्हतं माझ्या पटण्याला विचारतो कोण ? आपल्या हातीं जो अधिकार आहे तो चालवून घ्यायचा असा मी निश्चय केला आणि मोहिमेला निघालों. थोड्या तासांपूर्वी आम्ही काय केलं तुम्हाला माहीत आहे—!"

तो कांहीं वेळ स्तब्ध राहिला. त्याची मुद्रा भयानक झाली होती. कांहीतरी भयंकर दृश्य त्याच्या नजरेसमोर दिसत होतं.

तो पुढें म्हणाला, " साधे बॉंब यावेळीं आमच्याजवळ नव्हते. एखादा दुसरा बॉंब टाकून एमडेनसारखी नुसती खळबळ उडवायची हा आमचा बेत नव्हता. युद्धाच्या हत्यारांत अत्यंत भयानक असं हत्यार आम्ही आमच्या बरोबर घेतलं होत जें तोफांनाही साधलं नाहीं—सुरुगांना साधलं नाहीं—असं सरसहा जीवांचा नाश करणारं अमोघ अस्त्र आमच्यापाशीं होतं ! त्याचा मारा आम्ही करणार होतों. तो मारा करणं मला पसंत नव्हतं. युद्धाच्या पूर्वी वर्तमानपत्रांतून

येणाऱ्या हिंदुस्थानांतल्या हकीकती मी वाचल्या होत्या. इतर युद्धयमान झालेली राष्ट्र सर्व प्रकारच्या माऱ्यासाठीं जी सावधगिरी ठेवीत होती ती सावधगिरी हिंदुस्थानांत बाळगली जात नव्हती. प्राणघातक विषारी धुराचा मारा झाला तर इतर देशातून प्रतिकाराच्या योजना नागरिकांना शिकवल्या जात होत्या विमानाच्या ठाण्यावर हिंदुस्थानात जरी या योजना अमलांत आणल्या गेल्या होत्या तरी इतर ठिकाणचे लोक सर्वस्वी बेसावध होते हिंदुस्थान म्हणजे कांही इंग्लंड नव्हे. हिंदुस्थानच्या लाबीरुंदीची आम्हांला चांगली कल्पना होती. हिंदुस्थानांत मारा केला तर त्याचा फटका इंग्लडला लागेल याची कल्पना आम्ही पूर्णपणें केली होती. आणि म्हणूनच आम्हीं ही मोहीम सुरू केली—"

पुन्हां तो क्षणभर स्वस्थ बसला असें पाहून ब्रिजिट् म्हणाली, " म्हणजे ? आमच्या किनाऱ्यावर तुम्हीं विषारी धूर सोडला का ? "

गंभीरपणें स्लायशर म्हणाला, " तेंच आतां मी सांगणार आहें विमानांतून कोंकणचा किनारा आम्हांला दिसू लागला त्यावेळीं आश्रयासाठी कुठं तरी उतरण्याचा आमचा उद्देश होता. पोर्तुगाल आमच्या बाजूच आहे, म्हणून आम्ही गोव्याच्या किनाऱ्यावर उतरलों. तिथं पेट्रोल घेतलं आणि कोंकणच्या साऱ्या किनाऱ्यावर विषारी धुराचे बॅांब फेकण्याचा उपक्रम करायच ठरविल गोव्याची सरहद्द सोडतांच जें पहिलं गांव आम्हांला दिसलं तिथं जमिनीच्या शक्य तितक्या जवळ विमान घेऊन आम्ही सरसहा बॅांब फेकायला सुरवात केली त्या गांवांतील लोकांचा उडालेला हलकल्लोळ आम्हांला स्पष्ट दिसत होता फटाफट रस्त्यांत माणसं मरून पडत होती. सरसहा होत असलेली ती जीवांची हत्या पाहून माझ्या अंगावर शहारे आले. मी विमान एकदम उंचावर नेलं तरीही माझे जोडीदार बॅांब फेकीतच होते. विमानावरचा माझा हात स्थिर राहीना माझ्या हृदयांत कालवाकालव सुरू झाली. मागं फिरावं असा मी विचार केला. पण माझ्या बरोबर असलेल्या सैनिकांपैकीं एक वैमानिक होता. त्यानं मला धरून विमानाला गति दिली आणि आम्ही पुढं पुढं जाऊं लागलों."

हकीगत सांगत असतां त्याच्या कपाळावरील शिरा ताड्ताड् उडत होत्या. घामाच्या धारा त्याच्या मस्तकावरून वहात होत्या. गतस्मृतीचें तें दृश्य त्याच्या नजरेसमोरून जात होतें.

तो म्हणाला, "मी जिवावर उदार झालों होतों. स्वत. मेलों तरी बेहेत्तर पण हा अत्याचार करूं द्यायचा नाहीं असा मी निश्चय केला होता. रत्नागिरीचा किनारा दिसू लागला तशी माझ्या सोबत्यांनीं बॉंब फेकायची तयारी केली—आणि मोठ्या शिताफीनं विमान मी समुद्राच्या बाजूला वळवल—त्यामुळ फेकलेले बॉंब समुद्रात पडले. माझे सोबती चवताळून गेले त्यांची माझी हुज्जत सुरू झाली मी विमान वळवतों आहें असं पाहून वैमानिक असलेल्या माझ्या सोबत्यानं माझ्याशीं झटापट करायला सुरुवात केली. विमान डळमळू लागलं—गिरक्या घेऊ लागलं—तरीही मी चक्रावरचा हात सोडला नाहीं. झटापटीत मला भान राहिलं नाहीं जिवाची मला पर्वा नव्हती मेलों तरी बेहत्तर पण या गांवावर विषारी धुराचे बॉंब फेकूं द्यायचे नाहींत या निश्चयान मी चक्र उलटं सुलटं फिरवलं विमान कोसळू लागलं माझ्याशीं लगट करणारा वैमानिक कोलमडून पडला. दुसऱ्यानं बॉंब फेकायला सुरवात केली ते बॉंब पाण्यांत पडत होते हें जरी त्याला दिसत होतें तरी तो वेड्यासारखा बॉंब फेकीत राहिला होता. विमानाला एक जबर धक्का बसला आणि मी बसल्या जागेवरून उडून पाण्यांत पडलों.—"

ही हकीकत ऐकत असतां डॉक्टर हतबुद्ध झाले होते रत्नागिरीवरचें आज केवढें संकट टळलें, तें संकट टाळण्यासाठीं एका वैऱ्यानें आपला प्राण खर्ची घालण्याची तयारी केली आणि असा हा जिवावर उदार झालेला तरुण आपलाच एक कौटुंबिक निघाला, हें पाहून त्या योगायोगाबद्दल त्यांना आश्चर्य वाटलें

हिंदुस्थानांत आल्यापासून ब्रिजिट्नें जर्मनीचा लागाबाधा तोडला होता. हिंदुस्थान हीच आपली मायभूमि कल्पून तिनें मुंबईच्या किनाऱ्यावर पदार्पण केलें होतें. हिंदुस्थानासाठींच जगायचें आणि हिंदुस्थानासाठींच मरायचें, अशी प्रतिज्ञा करूनच तिनें हा शरीरसंबध केला होता.

जर्मनीबद्दलचा तिला अभिमान नव्हता असें नाहीं किती झालें तरी तो तिचा मायदेश होता—किंवा जर्मन भाषेत बोलायचें म्हणजे पितृदेश होता. गेल्या कांही वर्षांतल्या चळवळीमुळें आर्यत्वाचा अभिमान तिच्या अंत.करणांत जागृत झाला होता. म्हणूनच हिंदुस्थानांतल्या एका आर्याशीं तिनें विवाह केला होता.

आर्य म्हणवणाऱ्या जर्मनीनें—आर्यत्वाची प्रस्थापना करण्यासाठीं एकजात ज्यू लोकांची हकालपट्टी करणाऱ्या जर्मनीनें—आर्य अशा हिंदुस्थानावरच चाल

कां करावी हें तिला कळेना. आर्यांचा नाश करणं हीच कां आर्यत्वाची प्रतिष्ठा !

जर्मनीचें हें धोरण पाहून तिला दु:ख होत असे

अशा या विपरीत धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या आपल्या पितृदेशाची अब्रु आपल्या भावानें बचावली असेंच तिला वाटलें.

तिनें आपल्या भावाला धन्यवाद दिले त्यावेळीं तो म्हणाला,

" आर्यत्वाच्या अभिमानान मी हें कृत्य केलं नाहीं आर्य असो कीं अनार्य असो, सारेच मानवी जीव माझ्यालेखीं सारखे आहेत. जीवहत्येचा मला तिटकारा म्हणूनच मी माझ्या स्वत:च्या जिवावर उदार झालों. मी जिवंत राहीन असं मला वाटलं नव्हतं. जीवहत्या करायला सरसावलेल्या तीन जर्मन जिवांचीं प्रेत हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर आदळतील असंच मला वाटलं होतं मी जिवत राहिलों याचंच मला दु:ख होतं—" असं बोलून तो पुन्हां स्तब्ध झाला.

डॉक्टर म्हणाले, " एका गांवांत तुम्ही विषारी धूर फेकला तर ! कुठल्या गांवात ? "

" तें मी काय सांगू ? " स्लायशर म्हणाला, " गोव्याच्या सरहद्दीशेजारचंच तें एक गांव होतं. त्या गांवातले लोक मरून धडाधड पडत असलेले मला दिसले. त्याचाच माझ्या मनावर परिणाम झाला "

" काय झालं हें ! " डॉक्टर उद्गारले " आम्ही स्वस्थ कसे राहिलों ? विषारी धुराच्या प्रतिकाराची योजना जगभर चालत असतां हिंदुस्थानच एवढ बेसावध कां ? लढाईवर आमचीं माणसं गेली का नाहींत ? आघाडीवर तीं मरणारच आहेत—पण आघाडीवर न जाणाऱ्या माणसांचे बळी पडूं नयेत म्हणून आम्ही काय योजना केली ? कां आम्ही बेसावध राहिलों ? कुणी आम्हांला बेसावध ठेवलं ? या बेफाम जीवहत्येला जबाबदार कोण ? "

" तुम्ही–तुम्ही, तुमचे तुम्हीच ! " ब्रिजिट् आवेशानें म्हणाली, " गेल्या लढाईचा तुम्हांला अनुभव नव्हता का ? ही लढाई सुरू झाली आहे हें तुम्हांला माहीत नव्हत का ? इतर देशांतून प्रतिकाराच्या योजनांचं शिक्षण दिलं जात आहे हें तुम्हाला कळत नव्हतं का ? मग कां तुम्ही स्वस्थ राहलांत ? तयारी कां केलीत नाहीं ? कां लोकांना शिकवलं नाहीं ? डुकरासारख्या तोंडांचीं माणसं दिसतात म्हणून विषारी धुराच्या प्रतिकाराचा बुरखा घेतलेल्या लोकांचीं चित्रं पाहून तुम्ही नुसते

हंसत. रात्रलांत आपल्यालाही असेच बुरखे घातले पाहिजेत,—लढाईच्या वेळी असंच डुकराचं रूप घेतलं पाहिजे हें तुमच्या ध्यानी आल नाहीं भोगा आतां त्याची फळ!"

"वेडी आहेस. पोरी!" खिन्नपणानें हसून डॉक्टर मनोहर म्हणाले, "हा अपराध आमचा नाहीं. आम्हाला सारं काही कळत होत गेल्या अनुभवाचा फायदा आम्ही घ्यावा असं तूं म्हणतेस. पण खरं पाहिल तर गेल्या अनुभवानंच आम्हांला हा दगा दिला. गेल्या महायुद्धाची खरी झळ आम्हांला लागली नाही म्हणून आम्ही बेसावध राहिलों.—"

एक मोठा सुस्कारा टाकून ते म्हणाले, "काय होणार आहे कुणाला ठाऊक! नवा अनुभव मिळायला सुरवात झाली आहे. प्लेगनं काय थोडे लोक मेले? इन्फ्लुएन्झाच्या बळींची सख्या महायुद्धांतील कामास आलेल्या सैनिकांच्या सख्येच्या तोडीची ठरली, तरी आमचे डोळे उघडले नाहींत. एकदां लागूं देच ही लढाईची झळ! नुसत्या प्लेगन नव्हे—नुसत्या इन्फ्लुएंझानं नव्हे—पण लढाईत सुद्धां माणसं मरतात हें जेव्हां आम्हांला कळेल तेव्हांच लढाईच्या नांवाखाली होणाऱ्या अकारण राक्षसी जीवहत्येला आळा घालण्याची वृत्ति आमच्यांत उत्पन्न होईल"

डॉक्टरांचें बोलणें अर्धेंच राहिलें. स्लायशरला कैद करण्यासाठीं पोलीस ऑफिसर आला होता. स्लायशरला थोडें खाऊं घालीपर्यंत त्यानें वाट पाहिली आणि नंतर त्याला आपल्या ताब्यांत घेतला.

ब्रिजिट्च्या अंत:करणाला बाण बसला. तिच्यानें रहावेना. ती पोलीस ऑफिसरच्या समोर जाऊन उभी राहिली आणि म्हणाली, "मीही जर्मन आहें. मला कैद करा."

तिची जर्मन भाषा पोलीस ऑफिसरला कळली नाहीं.

स्लायशरला घेऊन जात आहेत असें दिसून येतांच ब्रिजिट्ही त्याच्या मागून जाऊ लागली. डॉक्टरनीं तिला मागें खेंचलें

"मी जर्मन आहें—मी जर्मन आहें" असें जर्मन भाषेंत ती सारखी ओरडत होती. मनाच्या आत्यंतिक उद्वेगानें ती मूर्च्छित पडली.

डॉक्टर मनोहर तिला सावध करूं लागले.

* * *

इतकें पाहून मी जागा झालों. एकूण—तें स्वप्नच तर!

# टेलिफोन

टेलिफोनच्या उपयुक्ततेबद्दल वर्तमानपत्रांतून ज्या जाहिराती प्रसिद्ध होत असतात त्या पाहिल्या म्हणजे मला ही हकीकत आठवते प्रत्येक उपयुक्त वस्तूचा यथास्थित दुरुपयोग होणेंही शक्य असतें हें कुणी ध्यानीं घेत नाहीं. अशा होणाऱ्या दुरुपयोगाचा प्रतिकार केला पाहिजे अशीही जाणीव कुणाला नाहीं.

मृदुला जोशी कांहीं विलायतेला जाऊन आली नव्हती मुंबईच्या ग्रँड मेडिकल कॉलेजची ती एल्. एम्. ॲन्ड् एस्. होती तरीही विलायतेच्या मोठमोठ्या डिग्र्या घेऊन आलेल्या डॉक्टर आणि डॉक्टरणींना मुंबईच्या पेठेत ती भारी होऊन बसली होती. नुसत्या बायकांच्या रोगांची ती चिकित्सा करीत असे असें नाही पुरुष रोगी देखील तिच्या दवाखान्यांत येऊन तिच्या औषधानें बरे होऊन जात असत आणि म्हणूनच पुरुष डॉक्टराना तिच्याबद्दल मत्सर वाटत असे.

प्रथितयश असलेल्या डॉक्टर लोकांना मृदुलाबाईबद्दल वैषम्य उत्पन्न होण्यास आणखी एक कारण होतें. श्रीमंतांकडून ती जरी भरपूर पैसे घेत असे तरी गरिबांच्या शुश्रुषेसाठी आणि औषधासाठीं पदरमोड करायची तिची तयारी असे. जितक्या उत्साहानें श्रीमंत लोक तिला पैसे देत असत तितक्याच उत्साहानें गरीब लोक तिला आशिर्वाद देत असत.

पहिल्यानेंच ज्या वेळीं तिनें दवाखाना थाटला त्या वेळीं तत्कालीन तरुण डॉक्टरांचा घोळका तिच्याभोवती जमा होऊ लागला एवढे मोठमोठे डॉक्टर आपल्याबद्दल सहानुभूति बाळगतात म्हणून तिला एक प्रकारें अभिमान वाटत असे. पण या सहानुभूतीच्या मुळाशीं त्या जमणाऱ्या घोळक्याचा कोणता डाव होता हें पहिल्यानें तिच्या लक्षांत आलें नव्हतें.

ती विद्वान होती—तरुण होती आणि विशेषतः सुस्वरूप होती.

विद्वत्ता आणि सौंदर्य यांचा मेळ सहसा पडत नाहीं असा त्या काळचा समज होता. तत्कालीन विदुषी बहुतेक साऱ्या कुरूपांत गणल्या जात होत्या. आणि कांहीं तर इतक्या कुरूप होत्या, कीं त्यांच्या तुलनेसाठीं अफ्रिकेचा किनाराच धुंडाळावा लागला असता !

असें होतें म्हणूनच तिचें सौंदर्य जास्त खुलून दिसत असे सुशिक्षित असो कीं अशिक्षित असो—हजारांनीं बायका उभ्या केल्या असत्या तरी त्यांत ती हिरकणीसारखी चमकून दिसली असती मग कुरूप विदुषींच्या मेळाव्यांत ती शुक्राच्या चांदणीसारखी चमकली यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

आणि म्हणूनच हा तरुण डॉक्टरांचा घोळका तिच्याभोंवतीं जमा झाला होता. त्यांत जसे अविवाहित होते तसेच विवाहितही होते विवाहितपणाच्या जोरावर अंतरंगांतली इच्छा उघडकीस न येण्याची खात्री असल्यामुळें विवाहित लोकच तिच्या मर्जीला जास्त पात्र झाले होते.

म्हणूनच तिची बदनामी होत होती. पुरुषाच्या चारित्र्याला जगाच्या दृष्टीनें विवाहितपणाचा बंधारा आड येत नाहीं. अविवाहितांवर भुकेल्या प्रेमाचे बुभुक्षित आरोप जरी सरसहा केले गेले तरी विवाहितांची बुभूक्षा कांहीं झांकून झांकली जात नाहीं.

मृदुलेला मात्र ती दिसत नव्हती. तिचें मन निर्मळ होतें. चार मैत्रिणी गोळा होणें आणि चार विवाहित अविवाहित तरुण पुरुष गोळा होणें यांत तिला भेद दिसत नव्हता.

घरची ती श्रीमंत होती. प्रॅक्टीस न करतांसुद्धां चांगल्या चैनींत आयुष्य कंठतां येईल एवढी दौलत तिच्या हाताशीं होती.

त्या दौलतीची तिला जितकी पर्वा वाटत नव्हती तितकाच अभिमानही वाटत नव्हता. गरिबांत गरीब आणि श्रीमंतांत श्रीमंत होऊन कसें मिसळलें जावें हें ती चांगलें जाणत होती.

म्हणजे हा तिचा दांभिकपणा नव्हता. तो तिचा स्वभावगुण होता. गरिबाची गरिबी मुद्दाम दाखवून दिली नाहीं, तर गरीब माणूस श्रीमंतांच्या सहवासांत बिचकत नाहीं, हें जसें तिला माहित होतें, तसें कोत्या विनयामुळें श्रीमंत लोक

खानदानी श्रीमंताला कसें तुच्छ लेखतात हेही ती जाणत होती. म्हणूनच दोन्ही दर्जाच्या लोकात तिची लोकप्रियता अबाधित राहिली होती.

तिच्या आजूबाजूला गोळा होणाऱ्या तरुणाना हा तिचा स्वभाव आवडत नसे ते तसें बोलूनही दाखवीत पण तिनें तें नुसतें हंशावारी न्यावें आपली मतें दुसऱ्या-वर लादण्याचा ती कधीही प्रयत्न करीत नसे या तिच्या स्वभावामुळेच तिचें मित्रमंडळ टिकून राहिलें होतें.

त्या मित्रमडळांत मात्र आपआपसात मोठी चुरस होती ते सगळे जरी एक-मेकांचे सुहृद् म्हणून मिरवीत असत तरी अंत करणापासून एकमेकांचा द्वेष करीत त्यातील प्रत्येकाचा तिच्या हातावर डोळा होता पण तिनें मात्र केव्हांही आपला हात मोकळा सोडला नाहीं.

या मित्रमंडळाशी वागण्यात तिनें ज्या प्रकारचें धोरण ठेवलें होतें त्या धोरणामुळे प्रत्येकाला वाटे, की तिचें आपल्यावर प्रेम आहे. प्रत्येक जण आपल्या मनाशीं मांडे खात असे या विषयाची त्यांनीं आपसांत केव्हांच चर्चा केली नव्हती पण प्रत्येकजण प्रत्येकाकडे टवकारून पहात होता.

वर्षावर वर्षें जात होतीं मृदुलेच्या वर्तनांत कांहीच फरक झाला नव्हता. पण तिची मित्रमंडळी मात्र बदलत चालली होती.

बहुतेक सर्वांची आतां लग्नें झालीं होतीं कांही जणानीं तिच्या घरीं येणेंही टाकले होतें काहीं जण तर तिचे शत्रू बनले होते मात्र पहिल्यापासूनच विवाहित असलेले काहींजण होते ते त्याही परिस्थितींत तिची मैत्री सपादून राहिले होते.

कुणी आक्षेप घेतले तर ते विवाहित लोक थट्टेवारी नेत असत आणि तिच्या चारित्र्याबद्दल बहुजनसमाजाचा गैरसमज करीत असत.

रोगी या नात्यानें येणाऱ्या लोकांत मात्र आतां दोन प्रकार झाले होते. ती उत्तम डॉक्टरीण आहे म्हणूनच ते तिच्याकडे चिकित्सेसाठीं येत होते. बऱ्याचशा लोकाचा तिच्या चारित्र्याबद्दल गैरसमज झाला होता

पण कांही असे होते, कीं त्यांची तिच्याबद्दलची निष्ठा अढळ होती. कुणी तिच्याविरुद्ध ब्र काढला तर तें त्यांना सहन होत नसे.

असे लोक मात्र फारच थोडे होते. साधारणपणें माणसाची वृत्ति कुत्सितपणाला जितका आश्रय देते तितकी निर्मळपणाकडे झुकत नाहीं. निंदा कुणाला प्रिय नाहीं?

कितीही जिव्हाळ्याचें माणूस असले तरी त्याची निंदा ऐकून घेण्यांत बहुतेक लोकांना एक प्रकारचा आनंद वाटत असतो. निष्कलक असा कोण आहे ? पण कुणी निष्कलंक आहे असें दिसून येऊं लागलें तर लोक हवालदिल होतात कलंक सर्वांनाच असतात म्हणून निष्कलंक असलेलें मनुष्य दिसलें म्हणजे त्याची निंदा करण्यांत बहुतेक लोकांना जितका आनंद वाटतो तितका उघड उघड दुराचारीं असलेल्या व्यक्तीवर आक्षेप घेण्यांत वाटत नाहीं.

या सार्वत्रिक प्रवृत्तीमुळें मृदुलेचा सर्व बाजूनीं छळ होत होता. पण त्याची तिला जाणीव नव्हती. ती आपल्याच व्यवसायात चूर होती. प्रॅक्टीस भरपूर असल्यामुळें आधीच तिला वेळ मिळत नसे. वाङ्मय आणि कला यांचें तिला एक प्रकारचें वेड असल्यामुळें तद्विषयक चळवळींत भाग घेण्यांत तिचा उरलासुरला वेळ जात असे सारा वेळ असा गुतला गेल्यामुळें स्वतःची निंदा ऐकण्याला सुद्धां तिला अवकाश राहिला नव्हता.

विलायतेहून परीक्षा पास होऊन येणारा प्रत्येक नवीन डॉक्टर आशाळभूत-पणानें तिची मैत्री सपादन करण्यासाठीं धडपडत होता खरें पाहिलें तर धडपडण्याची कुणालाच कांहीं जरूरी नव्हती मृदुलेची वृत्ति स्नेहसुलभ होती. कुणाचे दोष तिला दिसत नसत. कुणाच्याही गुणावर तिची पहिली नजर जात असे म्हणून प्रत्येक जण तिच्या मित्रमंडळांत सहज शिरकाव करूं शकत असे.

तरीही त्या अशा माणसाला वाटे, कीं धडपड करून आपण मृदुलेच्या मित्रमंडळांत शिरकाव करावा. मृदुला जरी सर्वसुलभ होती तरीही तिच्या मर्जीतल्या लोकांत मोडलें जाणें हें सुसंस्कृत समाजांत मानाचें समजलें जात असल्यामुळें त्या लोकांचा असा समज होत असे.

कुणीही जाऊन तिला भेटला असता तरी तो तिच्या मैत्रीला पात्र झाला असता. पण आजूबाजूच्या लोकांनीं तिच्याभोवतीं असें एक वलय तयार केलें होतें, कीं त्यामुळें ही स्नेहदुर्गम व्यक्ति आहे असा बाहेरच्या लोकांचा समज होत असे.

माझा तिचा ज्या वेळीं परिचय झाला त्याच वेळीं मला तिच्या स्वभावाचा ठाव लागला. बाहेर ज्या कंड्या होत्या त्यामुळें तिचा परिचय करून घ्यावा असें मला कधींच वाटलें नाहीं. पण एके दिवशीं माझ्या एका मित्राबरोबर सहज मी तिला भेटायला गेलों त्या वेळीं हें पटल दूर झालें.

तो माझा मित्र—तिचाही बालमित्र होता तिच्याबद्दल त्याला पूर्ण आदर होता तिच्याबद्दल उठविल्या जाणाऱ्या कंडथांवर त्याचा केव्हांही विश्वास नव्हता.

बाजारगप्पावर जरी माझा विश्वास नसे तरी डोळ्यांसमोर दिसणारी परिस्थिति ज्या प्रकारचे वातावरण निर्माण करीत होती त्या प्रकारच्या वातावरणांत मृदुले-सारखी सुदर, श्रीमंत आणि भावनाप्रधान व्यक्ति सोज्वळ राहिली असेल असे मला वाटत नव्हतें

सहज परिचय झाला आणि माझें जाणें येणें वाढूं लागलें. त्याच वेळीं माझा हा गैरसमज दूर झाला.

मी जात असें तेव्हां पूर्वीच्या मित्रमंडळीचा घोळका पहिल्या पहिल्यानें हजर असे बोलण्याचालण्यांत ती त्याच्याशी इतकी मिसळत असे कीं, स्त्री–पुरुष भेदाची कल्पना तिच्या मनांत नाही की जात्याच ती बेमुर्वत बायको आहे याचा अदाज मला पहिल्या पहिल्यानें होत नव्हना.

जसजसा परिचय होऊं लागला तसतसे लोकप्रवादांनी उत्पन्न झालेले माझ्या डोळ्यावरचे पडदे दूर होऊं लागले मित्रमडळी गोळा झाली असतां आनंदानें हंसणारी खेळणारी मृदुला ते लोक निघून जातांच एकदम उदासीन होत असे. एके दिवशी मी असा सर्वांबरोबर जायला निघालों असतां तिनें मला थाबायला सांगितले, त्याच वेळी हें माझ्या नजरेला आले

कुणाजवळ तरी तिला बोलून टाकायचें होतें. सारे जे तिचे मित्र म्हणून समजले जात होते त्यांच्याकडे अंतःकरण मोकळें करण्याइतका मनाचा प्रांजलपणा त्यांच्या समोर तिला वाटत नव्हता त्याच्या अंत·करणांतील वृत्ति तिला कळली होती. तिच्या नांवावर—तिच्या पैशावर आणि तिच्या अब्रूच्या भांडवलावर घाड घालून चैन करण्याकरितांच ते तिच्या आंवती भोंवतीं गोळा होत हें तिला आतां कळून यऊं लागलें होतें.

म्हणून तिनें मला थांबवून घेतलें. तिचा माझा परिचय अगदींच तुटपुंजा होता. त्या विद्वद्रत्नांच्या घोळक्याप्रमाणें मी तिच्या अंतरगांतला मित्र समजला जात नव्हतों म्हणूनच तिला माझ्याबद्दल विश्वास वाटला. आणि म्हणूनच तिने आपलें दुःख माझ्यापुढें मांडलें.

प्रॅक्टीसची पर्वा वाटण्याइतकी तिची गृहस्थिति नव्हती हें जरी खरें होतें

तरी अलीकडे तिनें प्रॅक्टीसकडे बरेंच दुर्लक्ष केलें होते स्वत:च्या दु:खानें चूर झाल्यामुळें दुसऱ्याचीं दु:खें हलकी करण्याइतकी ताकद तिच्या ठायीं राहिली नव्हती. ठराविक चारदोन केसिस् पलीकडे हल्ली ती केसिस् मुळीं घेतच नसे. आलेले रोगी ज्या वेळीं परतून जात त्या वेळी तिची बदनामीच करीत असत. उपकारांची आठवण अशी कोण आणि किती काळ राखून ठेवतो?

ती आतां प्रौढ झाली होती. तिचें लग्नाचें वय केव्हांच उलटून गेले होतें. तिच्या बरोबरच्या बायकांना यावेळीं नातवडे सुद्धां झालीं होतीं. आणि अशा परिस्थितींतही तिच्या वर्तनावर आक्षेप घेतले जात होते

ज्या व्यक्तींच्या सहवासामुळें तिच्यावर असे आक्षेप घेतले जात होते त्या व्यक्तींना दूर करणें तिला इष्ट वाटत नव्हतें. माणसांच्या सहवासाची तिला आवश्यकता होती कित्येक वर्षांपासून तीं माणसें तिच्या एकलकोंड्या संसारांत कुटुंबीय होऊन बसलीं होतीं त्यांना दूर करावें असें कोणतेंच कारण घडलें नव्हतें

तिला पेंच पडला होता तो हाच, कीं त्यांना दूर कां करावें? त्यांना दूर केलें नाही तर तिची बदनामी वाढत जात होती आणि त्याना दूर करावे तर तो अन्याय होत होता.

असल्या विलक्षण कैचींत ती सांपडलेली होती तिच्याबद्दल श्रद्धा बाळगणारे तिचे पुष्कळ रोगी या बदनामीमुळें तिच्याकडे पाठ फिरवू लागले होते. ज्या माणसांनीं एकाकाळीं आपल्याला देवाप्रमाणे मानलें तीच माणसें आपल्याला एखाद्या वेसवेच्या पंक्तीला नेऊन बसवीत आहेत हें पाहून तिचें अंतःकरण रक्ताचीं आसवें गाळीत होतें.

ती मला म्हणाली, " अशा या चक्रांत मी सांपडलें आहें. मी एकटी आहें. माझ्या घरी येऊन राहील असें माझ्या जवळच्या नात्याचं कुणीच नाहीं हेच मोठं दुर्दैव आहे. परक्याला जवळ केलं तर आधीच माझ्या नांवाची बदनामी झालेली! एकलकोंडं रहाणं मला शक्य नाहीं मला गर्दीची जरुरी वाटते. आजूबाजूला घोळका असावा, निरनिराळ्या विषयांवर वादविवाद करीत वेळ घालवावा, एवढाच माझ्या जिवाचा विरंगुळा. तोसुद्धां मला लाभूं देत नाहींत.

" पूर्वी मला ही जाणीव नव्हती. मी अंधारांत होतें. लोकांची माझ्या-विषयींची श्रद्धा पाहून मी स्वतःवर खूष होतें. माझं सर्वग्राही वर्तन लोकदृष्ट्या

टीकेला पात्र झालं आहे याची वर्दी मला लागली नव्हती —पण ती वर्दी जेव्हां लागली तेव्हांपासून माझ्या अत करणान ठाव सोडला केव्हा केव्हा असं वाटत कीं आत्महत्या करावी पण तितका भेकडपणा माझ्या रक्तांत नाही निर्भय वृत्तीनच मी मरेन मला अलीकडे जे सताऊन सोडण्यांत येतं आहे, त्यान मात्र मी बावरून गेलें आहे—"

तिने घड्याळाकडे पाहिले आणि ती म्हणाली, "मडळी जाऊन अर्धा तास झाला, नाही ? पहा आता टेलीफोन येईल या टेलीफोनची मी भीति घेतली आहे

"रोग्यासाठी म्हणून मी टेलीफोन ठेवला. पण या टेलीफोनमुळ आता मलाच रोग लागेल की काय अस वाटू लागल आहे टेलीफोनचा 'कॉल' आला की, उत्तर दिल्याशिवाय गत्यतर नसतं कुणी सांगाव कोण कराल्या प्रसगांत असेल तें! पण रिसीव्हर कानाला लावला कीं अस कांही ऐकू येत—"

ती असें म्हणते आहे तोच टेलिफोनची घटा सुरू झाली

ती टेलीफोनजवळ गेली आणि रिसीव्हर उचलून तिने हाती घेतला रिसीव्हर कानाजवळ नेला मात्र, तिला काय वाटलें कोणाला ठाऊक, तिनें मानेनें खूण करून मला बोलाविलें

कांही न बोलतां तिनें रिसीव्हर माझ्या हातीं दिला. मी वेड्यासारखा तिच्या-कडे नुसता पहात उभा राहिलो

ती अगदी हळूच म्हणाली, 'ऐका'

रिसीव्हर मी कानाला लावला आणि उत्तर द्यायला सुरवात केली

उत्तर देतांच मला जी भाषा ऐकू आली, ती अत्यत गलिच्छ आणि ओंगळवाणी होती माणसाच्या जातीला न शोभेल असली ती पिशाच्चाची भाषा होती त्यांतून भलभलते आरोप केले जात होते भलभलत्या मागण्या केल्या जात होत्या शरीरशास्त्राची सर्व प्रकारची विटंबना केली जात होती

तें ऐकताच माझ्या अंगावर शहारे आले आणि मी रिसीव्हर खालीं ठेवला

मी टेलिफोनवर ऐकत असतांच मृदुला आपल्या बैठकीवर जाऊन बसली तिनें मला उद्देशून विचारले, "ऐकलत ?—सारी रात्र हे असं चाललेलं असत! रात्रीं दोन तीन वाजतां देखील असेच कॉल येतात कुणी रोगी असेल म्हणून नाइलाजानं मला ऐकावं लागतं, आणि ऐकू येतं तें हे अशा स्थितींत माणसान

प्रॅक्टीस करावी कशी? मी प्रॅक्टीसबद्दल बेमुर्वत झालें आहें, असा माझ्यावर आरोप केला जातो. पण ही हकीगत मी कुठं कुठं म्हणून सांगत फिरूं? अशा या परिस्थितींत जीव द्यावा असं मला कां वाटू नये?—"

बोलतांना तिचा कंठ सद्‌गदित झाला. तिच्या त्या गंभीर चेहऱ्याकडे पाहिल्यावर मला देखील तिची दया आली

मीं म्हटलें, "मग तुम्ही दुसरीकडे जाऊन कां प्रॅक्टीस करीत नाहींत!—"

ती खिन्नपणानें हंसली आणि म्हणाली, "कुठंही गेल तरी पळसाला पानं तीन, अशी एक जुनी म्हण आहे, ती तुम्हांला माहीत आहे ना? कुठंही गेल तरी माझं हे दुर्दैव माझा पाठलाग करीत रहाणार! अविवाहित राहिल्याबद्दल मला मोठा अभिमान वाटत असे विवाहितेची गुलामगिरी पत्करण्याइतकी माझी वृत्ति नादान नाहीं पुरुषाप्रमाणं कर्तबगारी करून दाखवीन असा मला अभिमान असे आणि त्या अभिमानाच्या बळावर आजपर्यंत मी तस नांवही गाजवलं पण हें हिंदुस्थान आहे हें मी विसरलें होते सुखासमाधानांत राहायला अविवाहित स्त्रीला हिंदुस्थानांत जागा नाही हेंच खरे!"

सकृत्‌दर्शनीं गोष्ट क्षुल्लक दिसत होती. पण इतक्या वर्षांच्या तिच्या चरित्रक्रमाकडे पाहिलें म्हणजे तिनें किती क्लेशात दिवस काढले असतील याची कल्पना येऊन मला मोठें दु:ख झालें. तिच्या धीराबद्दल मला मोठा अभिमान वाटला.

बराच वेळ आम्ही बोलत बसलों होतों. विषय तोच होता तिनें आपले जे अनुभव सांगितले ते मला इथें नमूद करतां येत नाहींत. अविवाहित रहाण्याच्या पराक्रमाबद्दल समाजानें तिचा अमानुषपणानें छळ केला, एवढें मात्र मला पटलें

ती खचून गेली होती. आयुष्यांत तिला गोडी राहिली नव्हती. आत्महत्येची कल्पना पुन्हां पुन्हा तिच्या मनांत रंगण घालीत होती

शेवटीं तिनें आत्महत्याच केली. मी त्यावेळीं मुंबईत नव्हतों. काठेवाडांत फिरायला जायचें असा आम्ही बेत केला होता. तिचें पत्र आलें, कीं प्रवासाच्या तयारीनें मी निघणार होतों.

तिचें पत्र आलें--पण तें काठेवाडांत जाण्यासाठीं नव्हतें.

ती लग्नपत्रिका होती. जवळ जवळ चाळीशी उलटून गेलेल्या त्या निधड्या बाईनें अशाच एका पन्नाशीच्या घरांतल्या श्रीमंत बॅरिस्टरशी—मुंबईच्या नव्हे, उत्तर हिंदुस्थानांतल्या—लग्न करण्याची ती पत्रिका होती

माझी निराशा झाली गिरनार पर्वताचे कडे डॉ मृदुलाबाईच्या संगतींत चढत असता तिचीं काव्यमय वर्णनें ऐकण्याचा योग माझ्या नाशिबी नव्हता !

गिरनार पर्वतासारख्याच ससाराच्या अवघड पर्वताचे कडे उल्लघण्यासाठीं आयुष्याच्या उत्तर पथांत ती सरसावलेली पाहून मला दु:ख झालें क्लेशच भोगायचे हेंच बिचारीचें नशीब ! असें ना तसें ! मीं मनांतल्या मनांत म्हटलें, 'ईश्वरा, निर्भय वृत्तीच्या या सज्जन जीवाचें पुढील आयुष्य तरी सुखाचें होवो !'

# बिचारी शालिनी !

ती एवढीशी मुलगी होती तेव्हापासून पहातों आहें, तिचा स्वभाव होता तो आज तारखेपर्यंत बदलला नाहीं

चागुलपणा हा गुण आहे असे जरी समजले जाते तरी चांगुलपणा हा माणसाच्या दु खाला जितका कारणीभूत होतो तितका दुष्टपणा देखील होत नाही. किंबहुना दुष्ट माणसें जगात मोठ्या सुखासमाधानात वावरतात, तितकीच सज्जन माणस क्लेशात रहातात चागुलपणाच्या पायी माणसाची सुखदु खें काय आहेत हें बाहेर जगाला कळत नाही, आणि वरवर दिसणाऱ्या व्यावहारिक परिस्थितीच्या अनुरोधाने लोक त्या चांगल्या समजल्या जाणाऱ्या माणसालाच दोषी ठरवीत असतात. तसेंच बिचाऱ्या गौरीचें झाले होते

गौरी कलावतिणीची मुलगी तिची आई शारदा एक नांवाजलेली गायिका आहे घरी भावडाचे लेंढारही फार मोठे आहे गौरीपेक्षां वडील तीन बहिणी, लहान चार बहिणी, एक मोठा भाऊ, एक लहान भाऊ एवढ्या मोठ्या रिक्षाराचा कलावतिणीच्या घरचा प्रपच पाहून आजूबाजूच्या लोकांना देखील आश्चर्य वाटे.

शारदा कलावतीण होती,—नायकीण नव्हती, किंवा कसबीण नव्हती ती गाण्याच्या बैठकीत जितके सुदर गात असे तितकेच शातादुर्गेच्या देवळांत कीर्तनही उत्तम करीत असे शारदेची फार इच्छा, की आपल्या मुली संसाराला लागाव्या कुलधर्म म्हणून ती एका अविवाहिताच्या संसारांत पडली होती तिला त्याबद्दल दु ख वाटत नसे वैदिक किंवा पौराणिक विधी केले म्हणजेच कांहा लग्न होत नाही, असें म्हणणारी ती होती देवाचें नाव घेऊन ज्या माणसाशीं एकदा सबंध आला त्या माणसाबरोबरच पत्नी या नात्यानें तिनें आपला प्रपंच मांडला

होता. आणि म्हणूनच गरिबाच्याच घरात दिसणारें मुलांचें लेंढार तिच्याही घरांत गडबड वाढवीत होतें.

तिची इच्छा नव्हती, तरीही पहिल्या दोन मुली तिच्या जातीच्या कुलधर्माला बळी पडल्या तिनें प्रयत्न पुष्कळ केले, पण कायदेशीर विवाह करणें कांहीं शक्य झालें नाही त्या काळात तो प्रयत्न करणेंच शक्य नव्हतें. नुसती कल्पना होती, पण ती आचरणांत येऊ शकत नव्हती. त्या कुळधर्माला अनुसरून मोठ्या दोन मुलींना मुंबईला येऊन रहावें लागलें. आणि त्यांच्याबरोबरच गौरीही मुंबईला आली

मुबईला आल्यापासून ती इथल्या शाळेंत जाऊ लागली. शाळेंतल्या मुलींच्या सहवासाने तिनें आपली गोव्याची कोंकणी भाषा टाकून शुद्ध मराठी बोलायला सुरवात केली कांही दिवस ती घरीं आपली बोली बोलत असे. पण पुढें पुढें तिनें घरी सुद्धा शुद्ध मराठी बोलायचा आग्रह धरला घरचीं माणसें थट्टा करीत, पण त्यांची तिनें पर्वा केली नाही लहानपणापासूनच भाषा अशा रितीनें दुरुस्त झाल्यामुळें ती वेश्येची मुलगी आहे असें इतर माणसें ओळखीनाशीं झाली

तिचा नैसर्गिक आवाज चांगला होता पण तिला गाणें शिकवायचें नाहीं असें तिच्या आईने आणि बहिणींनीं ठरविले होतें. गाणें शिकवल्याच्या पायींच आपण आपल्या या कुलधर्मात पडलों असें त्यांना वाटे. आणि तो प्रसंग गौरीवर येऊ नये म्हणून त्यांनी तिला गाण्या बजावण्यापासून अलिप्त ठेवलें. घरी गाणेबजावणे चालत असे, तें गौरीच्या कानावर येत होतें; आणि रक्तांतील कलावंताची मूर्ति नकळत त्या कलेचें आकलन करीत होती.

हळूहळू ती वाढू लागली, आणि बाल्याची मर्यादा ओलांडून तिनें तिच्या जातीला भयप्रद असलेल्या तारुण्याच्या क्षेत्रांत पाऊल टाकलें.

नात्यागोत्याच्या कलावतिणी तिच्या आईमागें सारखी भुणभुण लावीत. कलावंतिणीचे भाऊ म्हणून एक मोठी भयंकर जात आहे. कलावंत समाजांतील स्त्रियांचा जर कोणी सत्यानाश केला असेल तर त्यांच्या या भावांनीं. हे भाऊ आयत्या पिठावर रेघा ओढण्यासाठीं आपल्या बहिणींच्या देहाचा विक्रा मांडून नफेबाजीचा सौदा करण्यासाठीं सदा तत्पर असतात. त्यावरच त्यांची चैन चालते.

त्यावर त्यांना कोणतीही नोकरी किंवा कामधाम न करता ऐषआरामांत रहाणें शक्य होतें.

हे भाऊ अगदी सख्खेच असावे लागत नाहींत. कुठल्याही कलावंतिणीचा कुठलाही भाऊ नात्यागोत्याचा संबंध नसतां कुठल्याही दुसऱ्या कलावंतिणीचा भाऊ होऊं शकतो. गौरीचा जो एक सख्खा वडील भाऊ होता, तो शाळेंत जाऊन शिकत होता आईच्या वळणामुळें या 'भाऊ' वृत्तीचा त्याला तिटकारा होता. तो असल्या भानगडींत पडत नसे किंवा कुणी अशा बाबतींत त्याला आमिष दाखविण्याचा प्रयत्न केला तर तो त्याचा धिक्कार करी म्हणून चाऊन चिकट आणि ओढून बळकट झालेले कांहीं भाऊ गौरीच्या घराभोंवतीं घिरट्या घालूं लागले तिच्या बहिणींनीं त्यांना हाकून दिले. त्यांची निराशा झाली तेव्हां त्यांनीं गौरीची बदनामी करावयाला सुरवात केली. ' सभ्य होऊं पहाणारी ही कलावंतिणीची मुलगी चोरून धंदा करीत असते ' असा डांगोरा पिटायला या हरामखोरांनी सुरवात केली

त्याचा परिणाम मोठा झाला गौरीला शाळेंतून काढावे लागलें. शाळेंतही कुज्यांचा बभ्रा झाल्यामुळें शाळेच्या अधिकाऱ्यांनी मुलीला शाळेतून काढायला भाग पाडलें.

गौरी शाळेंत जात होती तोंपर्यंत ती आपल्या अभ्यासांत गुतून राही पण शाळा सुटल्यामुळें तिला कांहींच उद्योग नाहींसा झाला. तिचें मन भ्रमण करूं लागलें. तें भरटकलेलें मन ताळ्यावर आणण्यासाठीं तिनें वाचनाचा अवलंब केला. जें हातीं पडेल तें वाचायला तिनें सुरवात केली. मराठीखेरीज ती दुसरें काय वाचणार होती ? इंग्रजीची तिला थोडीशी ओळख झाली होती पण तें ज्ञान इंग्रजी पुस्तके वाचायला पुरेसें नव्हतें.

मराठी पुस्तकांतही बहुतेक साप्ताहिकें आणि वर्तमानपत्रें तिला वाचावयास मिळत असत. सरसहा वाचण्याचा धोशा तिनें लावल्यामुळें विचाराला वळण मिळेल अशा प्रकारचें वाङ्मय तिच्या हातीं पडूं शकलें नाहीं.

अशीं पुस्तकें तिला आणून तरी कोण देणार होतें ? तिचा भाऊ आपल्या अभ्यासाच्या पुस्तकांपलीकडे केव्हांच कांहीं वाचीत नसे. तेव्हां तिनें तरी दुसरें काय करावें ?

बहिणीबरोबर ती अगदीं लहानपणापासून नाटकें पहावयास जात असे नाटकांची तिला फार आवड होती ती नाटक पाहू लागली कीं इतकी तन्मय होऊन जाई कीं नाट्यवस्तूशीं केव्हां केव्हां ती तादात्म्य पावत असे. जसजशी ही सहानुभूति वाढू लागली तसतसे नटांचे दोष तिच्या ध्यानीं येऊं लागले वर्तमानपत्रांतील नाटकावरील टीका जेव्हां तिच्या वाचनांत येई तेव्हां स्वतःच्या मताशीं ती तें मत पडताळून पाही आणि त्यामुळें तिचें असमाधान वाढे आपलेंच मत चुकत आहे की काय असा प्रश्न तिच्यासमोर उभा रहात असे

वारंवार तिच्या मनांत येई --नाटकांतील नटांचें स्त्रीभूमिकेचें काम पाहिल्यानतर तिच्या मनांत येई—की आपण हें काम केलें असतें तर कसें केलें असतें ? अंतःकरणपूर्वक त्या भूमिकेचा ती जेव्हां विचार करू लागे त्या वेळीं मराठी रंगभूमीवरील प्रत्येक नटाची स्त्रीभूमिका तिला अस्वाभाविक, निर्बुद्ध आणि क्वचित् ओंगळ वाटूं लागे

स्त्रियांच्या भूमिका स्त्रियानी कराव्या या विषयावरील माझे लेख त्या वेळीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत होते ते तिच्या वाचण्यांत आले. आपण रंगभूमीवर काम करावें असें तिला वाटूं लागलें

तिनें आपल्या वडील बहिणीजवळ ही गोष्ट काढली. तिनें तिला दटावून गप्प बसविलें ती कल्पना मात्र तिच्या डोक्यांत सारखी खेळत राहिली होती नाटकें पहाण्याची जी जी संधी येईल ती ती, ती चुकवीत नसे हा तिचा अभ्यास चालला होता आणि त्या अभ्यासाचा परिणामही होत होता.

गौरीला रंगभूमीवर काम करायची इच्छा आहे, हें मला कळले नव्हते. ज्या वेळीं कळले त्या वेळी मी तिच्या वडील माणसांकडे ही गोष्ट काढली. पूर्वी तिला नाटकमडळींत ये म्हणणारीं जीं माणसें होती त्यांच्यावर तिच्या घरच्या माणसांचा विश्वास नसल्यामुळें आपण नकार दिला असें तिची बहीण म्हणाली. ‘ पण आजूबाजूची मडळी योग्य मिळत असेल तर तीच काय—पण आपणसुद्धां रंगभूमीवर काम करायला तयार आहोंत ’ असं तिच्या बहिणीनें सांगितलें.

आजपर्यंत असे बरेच अनुभव आले असल्यामुळें मी त्या तिच्या म्हणण्यावर फारसा विश्वास ठेवला नाहीं. धंदेवाईक नाटक मंडळ्यांत सामील होऊन गांवोगांव मंडळीबरोबर फिरायला त्या तयार नव्हत्या. आणि स्थानिक अशी मुंबई-

तील नाटक मंडळी मुळीं अस्तित्वांतच नव्हती. त्यामुळें ती कल्पना तशीच राहिली.

गौरीला मात्र सारखी तळमळ लागली होती. त्यावेळीं मुंबईत काही सुशिक्षित मडळींनीं एका इग्रज नटीच्या सहकार्यानें इग्रजी नाटकें करून दाखविण्यास सुरवात केली होती. त्या नाटकांच्या हकीगती वर्तमानपत्रातून येत होत्या मराठी वर्तमानपत्रांनीं त्या नाटकाची फारशी दाद घेतली नव्हती गुजराती–इग्रजी वर्तमानपत्रें त्यांचीं भरपूर स्तुति करीत होतीं

मराठीत एकच पत्र होतें, कीं जे या नाटकांबद्दल काहीं लिहीत होतें

त्या पत्रांतील हकीगतीमुळेंच तिला ती बातमी कळली तिने मला विचारलें, आणि मी जाऊन त्या इंग्रजी नाटकमंडळीतील माणसांची चौकशी करून आलों

गौरीचा तिथें कांहीच उपयोग झाला नसता तिला इग्रजी येत नव्हतें थोडासा सस्कार झाला होता खरा, पण तो रगभूमीवर काम करायला पुरेसा नव्हता. माझ्या निकालानें तिची निराशा झाली. या नाटकाची हकीगत प्रसिद्ध करणारा मराठी वर्तमानपत्राचा सपादक माझ्या माहितीचा होता रगभूमीवर काम करावयास तयार असलेल्या महाराष्ट्रीय स्त्रियाही आहेत याचा पत्ता त्याला माझ्याकडून लागला

त्यानें गौरीची मुलाखत घेतली आणि ती आपल्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली. ती मुलाखत घेण्याचें काम त्यानें ज्याच्याकडे सपविलें होतें तो त्या मडळींतील एक नट होता.

अगदीं अप्रसिद्ध असलेली गौरी त्या मुलाखतीमुळे सर्वांच्या टीकेचा विषय होऊन बसली. तिची जात–गोत काय आहे, कुळी–थळी काय आहे, याची चर्चा त्या मुलाखतीत केलेली नव्हती म्हणूनच महाराष्ट्राचें त्या लेखाकडे लक्ष वेधलें.

बिचारा संपादक मागें पडला आणि मुलाखत घेणारा आपलें महत्त्व प्रस्थापित करून बसला इंग्रजी शिकण्याचें महत्त्व त्यानें त्या साऱ्या कुटुंबाला पटवून दिलें तो म्हणाला, " जें इंग्रजी आलं पाहिजे तें परीक्षा देण्याजोगं नसलं तरी चालेल. साधारण अर्थ कळून वाचतां आलं म्हणजे शिकवणारे जे कुणी आहेत ते अशा रीतीनं काम करून घेतील, कीं काम करणारी नटी सुविद्य नाहीं असं कुणालाही वाटणार नाहीं."

गौरीच्या वडील माणसांना तें पटले आणि शिक्षणाला सुरुवात झाली.

सपादकाकडून ही हकीगत मला कळली तोंपर्यंत गौरीला रंगभूमीवर आणण्याची माझी योजना अंमलात येण्याचा समय आला होता केरोपत—म्हणजे तो सुशिक्षित नट—गौरीला इंग्रजी शिक्षण देतो आहे हे गौरीनें किंवा तिच्या वडील माणसांनी मला मुळीच सांगितलें नाहीं आणि तीं कुणी सांगेपर्यंत आपण काहीच बोलायचें नाहीं असे मीही ठरविलें

माझ्या योजनेप्रमाणे कामाची वांटणी झाली आणि त्या दोन्ही बहिणींना नकला देण्यांत आल्या.

तालीम सुरू झाली तरीही कोणी मला सागेना. मी जात असें त्या वेळी केरोपत तिथें केव्हांच येत नसे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय संपादकाच्या शब्दावर विश्वासून शब्दांत सांपडायचें नाही असा मी निश्चय केला होता.

एके दिवशी तसा योग आला आणि मी सरळ सरळ विचारलें. गौरीची बहीण म्हणाली, " इंग्रजी शिकवताहेत ते ! त्यांत काय तुम्हांला सांगायचं म्हणून मी बोललें नाहीं "

मीही त्या बाबतीत विशेष चर्चा केली नाहीं तालमी तशाच चालू ठेवल्या होत्या. पण केरोपंत आणि गौरी या प्रत्येक नाटकाला, सिनेमाला, बॅकबेवर, हॅंगिंगगार्डनवर, अपोलो बंदरवर जोडीनें फिरू लागत असल्याचें ज्यावेळीं मला दिसलें, त्यावेळीं मात्र माझ्यानें रहावेना

गौरीच्या बहिणीला विचारलें, पण तिने ती गोष्ट हंसण्यावारी उडवून दिली माझ्या विचारण्याचें महत्त्व त्यावेळीं तिला वाटलें नाहीं.

गौरी स्वत च्या ताब्यांत राहिलेली नाही हें जेव्हां मला दिसून आले तेव्हां माझी योजना रद्द करून मी तालमी बंद केल्या अर्थातच त्या दोघींना त्यामुळे राग आला आणि त्या घरातील केरोपंताचें अधिष्ठान जास्त बळकट झालें.

गौरीचें आणि केरोपताचें लग्न ठरल्याची बातमी मला संपादकानेच सांगितली. मला त्यांत आश्चर्य वाटलें नाही. अपेक्षित गोष्टच घडून येत होती. असें कांहीं होण्यापूर्वी स्वतःच्या नावानें गौरी प्रख्यातीला येणें जरी इष्ट होतें तरी ती परिस्थिति आतां बदलू पहात होती.

वर्तमानपत्रांत नोटीस प्रसिद्ध झाली. त्यावेळीं मी तिच्या बहिणीला

सांगितलें आणि तेव्हांच तिचे डोळे उघडले तिच्या वडील माणसांचा स्वभावधर्म जागा झाला हातातोंडाला आलेली मुलगी आतां हातची जाणार हे पाहून ती घाबरून गेली आणि माझा सल्ला विचारूं लागली

गौरी सज्ञान होती तिला अडथळा करणें शक्य नव्हतें. तिच्या वडील माणसांना आतां पश्चात्ताप झाला. केरोपंताला पूर्वी त्यांनीं झाडून झटकून विचारलें होतें. पण शिक्षणाच्या पवित्र ध्येयाखेरीज आपल्या मनांत दुसरा कोणताच हेतू नसल्याचें केरोपंत पुन्हा पुन्हां बजावून सांगत असे. म्हणूनच तीं सगळीं माणसें गौरी हातची निसटेपर्यंत विश्वासून राहिलीं होतीं.

गौरीचें लग्न झालें — ती शालिनी झाली. गौरी पूर्ण कबजांत आल्या-शिवाय केरोपंतानें आपलें उद्दिष्ट प्रगट केलें नव्हतें लग्न होतांच ते सारे बेत बाहेर आले एक स्वतंत्र नाटकमंडळी काढण्याची सर्व योजना लग्नापूर्वीच त्यानें तयार करून ठेवली होती नटवर्ग निराळा होता. केरोपंत नुसता डायरेक्टर होता

मी जी योजना आंखली होती ती योजना जर अस्तित्वांत आली असती, तर गौरीला प्रत्येक खेळाला पन्नास रुपये मिळाले असते. तसा करारच झाला होता. म्हणजे महिन्याकांठीं आठ खेळांत काम करण्यासाठीं गौरीला चारशें रुपये मिळाले असते.

हें केरोपंताला कळलें होतें आणि म्हणूनच ही चलती हुंडी बगलेंत मारण्याचा त्यानें यशस्वी प्रयत्न केला. नव्या कंपनीत देखील त्यानें गौरीच्या नांवावरच प्रवेश केला होता. नायिकेचें काम करणारी नटी केरोपंतामुळे मिळत आहे म्हणूनच त्या मंडळीनें केरोपंताला डायरेक्टर म्हणून कसला तरी शिक्का मारून आपल्या जमावांत घेऊन पचवलें होतें. तो नाहीं तर ती नाहीं—म्हणूनच तो तिथें रहाणें शक्य झालें होतें—नाहींतर कुण्यानें सुद्धां त्याला विचारले नसतें. पण नवीन मंडळीचें नाटक रंगभूमीवर आले आणि शालिनीच्या स्त्रीभूमिकेने सारे प्रेक्षक दिपून गेले. स्त्रियांचीं कामें स्त्रियांनी करूं नयेत असें म्हणणारे देखील त्या भूमिकेची तारीफ करूं लागले.

माझ्या कल्पनेचा—कुणाकडून कां होईना—जरी हा विजय झाला तरी मला त्यामुळें आनंद झाला नाहीं. तो लौकिक गौरीचा व्हावा अशी माझी इच्छा

होती पण श्रेय मिळालें तें ' शालिनी गोळे ' हिला केरोपंत गोळेची विवाहित पत्नी म्हणून ती प्रख्यातीला आली—आज पिढ्यान् पिढ्या गायननृत्यादिकाला महाराष्ट्रांत टिकवण्यासाठीं स्वत:चें देहदान करून त्यामुळें पतित ठरलेल्या कलावंतिणी-च्या जातीत जन्माला आलेली गौरी म्हणून नव्हे—म्हणूनच मला वाईट वाटलें. जातिवंत कलावंतिणीला तें श्रेय मिळालें पाहिजे होतें. एका कलावंताची पत्नी म्हणून जरी तिला कलावंतीण म्हटले जात नव्हते तरी ती कलावंतिणीचीच मुलगी होती हें महाराष्ट्राला कळले नाहीं

दोन तीन वेळां मी तो प्रयोग पाहिला आंत जाऊन गौरीला शाबासकी द्यावी असें दर वेळेला माझ्या मनात येत होतें पण मी तरी काय करणार? मलाच कुणी आंत बोलावलें नाही तर मी जाणार कसा ?

एका खेळाच्या दिवशीं एक सन्मान्य पाहुणे आले होते त्यांच्याबरोबर मी रंगभूमीवर गेलों. इतर प्रतिष्ठित नटांशीं गप्पा मारीत आम्ही बसलों होतों. मी आंत आलेला पहाताच गौरी मला हांक मारीत धांवत आली.

' कस झालं माझं काम ? ' म्हणून ती उल्हासानें मला विचारते आहे तोंच बाणासारखा केरोपत तिथें धांवत आला आणि भर सभेतून द्रौपदीला ओढून नेणाऱ्या दु:शासनासारखा गौरीचा हात धरून तिला खेंचून ओढून घेऊन गेला.

जात असतां ती केंविलवाण्या मुद्रेनें माझ्याकडे पहात होती—

त्या भूमिकेनें तिची प्रख्याति झाली. पण काय झालें कोणाला ठाऊक, तिनें काम करण्याचें सोडून दिलें.

रंगभूमीला दिपवून टाकून नवीन परपरा उत्पन्न करण्याचें श्रेय जिनें मिळविले होतें, ती असामान्य नटी रंगभूमीच्या कोणत्याही परंपरेंतून तुटून पडलेल्या तारकेप्रमाणें नाहींशी झाली.

# मुलगा कीं जांवई !

वात्सल्याचा विचार केला तर आई आणि वडिलांच्या दोघांच्याही मनो-भावनांत अपत्यांच्या आकर्षणाच्या बाबतींत केवढें तरी मोठें अंतर असते असे जें म्हणतात, त्याचा या गोष्टीवरून मला प्रत्यय आला.

त्यावेळीं आम्ही हायस्कुलांत होतों. माधव माझ्यापेक्षां वयानें मोठा होता. वर्गांतील साऱ्या मुलांत मीच वयानें लहान होतो आणि तो मोठ्यांत मोठा होता

आमच्या रहाण्याचीं घरें जवळजवळ असल्यामुळें शाळेंत जाण्यायेण्याच्या बरोबरीमुळें आमचा स्नेह वाढत गेला होता. वयाप्रमाणें आमच्या मनांत देखील साम्य नव्हतें. तरीही आमचा स्नेह या वयापर्यंत टिकून राहिला होता

हायस्कुलांत जाणाऱ्या मुली आमच्याकडे बहुतेक नव्हत्या मराठी शाळेची मजल निभावली म्हणजे पुष्कळ झालें, असें त्यावेळी समजण्यांत येत असे पण त्याच काळांत मुंबईला आणि क्वचित् पुण्याला—शाळेंतच नव्हे तर कॉलेजांत जाणाऱ्या मुली—तुरळक का होईनात— पण दिसून येत असत

अशीच एक मुंबईच्या कॉलेजांत असलेली मुलगी योगायोगानें आमच्या गांवीं आली. त्याकाळीं पेन्शन घेतल्यानंतर गांवीं येऊन वास्तव्य करणें, थोडीशी वतनवाडी घेणें, हें एक पेन्शनराचें कर्तव्य समजले जाई व अजूनही जात आहे. त्याला अनुसरून सखारामपंत—म्हणजे प्रभेचे वडील—गांवीं येऊन राहिले होते

आम्ही त्यावेळीं मॅट्रिकच्या वर्गांत होतों व त्याच वर्षी मॅट्रिकला बसणार होतों. पण प्रभा मॅट्रिक झाली होती आणि कॉलेजांतही जाऊं लागली होती.

सखारामपंत माधवाच्या जातीचे होते. म्हणजे चित्पावन ब्राम्हण होते. माधवचे वडील आणि सखारापंत या दोघांचा बाळपणापासून स्नेह होता. तेव्हां माधव आणि प्रभा या दोघांचा विवाह घडून यावा, असें त्या दोन्हीही बापांना वाटणें

साहजिक होतें—आणि झालेंही तसेच

पण, त्यातून निष्पन्न काहीच झालें नाही

दोन्ही घरांतून लग्नाची बोलणी नुसती बोलली जात होतीं

प्रभेचा आणि माधवचा लहानपणापासून नेहमीचा परिचय होता नित्याचा परिचय होता असे नव्हे, तर मुंबईच्या ऑफिसांना मोठ्या सुट्या पडत किंवा हक्काची रजा घेऊन सखारामपंत घरी येत, त्यावेळी शेजारघरची दोन मुले या नात्यानें जेवढा परिचय व्हायचा तेवढाच त्या दोघांचा परिचय झाला होता

लग्नाची गोष्ट निघाली त्यावेळी माधवला आनंद झाला. प्रभा दिसायला मोठी सुंदर होती असे नव्हे पण तिला कुणी कुरूप तर म्हटलें नसतेंच इतकेच नव्हे तर डोळ्यांत दिसणारी बुद्धीची चमक ठसठशीत नाकडोळे आणि सुदृढ प्रकृति यामुळे नाजुक दिसणाऱ्या पुष्कळशा मुलींपेक्षा ती कुणाच्याही सहज डोळ्यांत भरत असे—आणि म्हणूनच माधवला लग्नाच्या वाटाघाटीमुळे आनंद झाला

लग्नाचें बोलणें चालत असे. पण तें नुसतें शिळोप्याच्या गप्पा होऊन बसलें आहे असें दिसून आल्यामुळें माधव मोठा नाराज झाला होता सखारामपंतांच्या घरी पूर्वी मोठमोठ्यानें त्याचें बोलणेंचालणें, थट्टामस्करी चालत असे पण लग्नाची गोष्ट निघाल्यापासून साहजिकच तें बंद झालें

म्हणजे प्रभा मोठी लाजत होती असें काहीं नाहीं तर त्या काळच्या शिष्टाचाराला अनुसरून माधवाशीं बोलणे तिला अशक्य होऊन बसलें होतें.

माधवची आणि प्रभेची बोलण्याचालण्याच्या बाबतीत जरी बंदी झाली होती तरी मला तसा अडथळा नव्हता पहिल्यानें, मी त्यांच्या जातीचा नव्हतो. दुसरे, प्रभा आणि मी समवयस्क होतों आणि तिसरें, या लग्नाच्या बोलण्याला सुरवात झाली तीं माझ्या मार्फतच झाली म्हणजे सखारामपंतांनी प्रभेच्या बाबतीत माधवचा मनोदय काय आहे, याचा अंदाज घ्यायला मलाच सांगितले होतें

लग्नाची बोलणीं फलद्रूप न व्हायला प्रभेची आईच मुख्यत्वेकरून कारणीभूत झाली होती प्रभा मॅट्रिक झालेली. पाचसहा महिने कॉलेजांत गेलेली आणि माधव मात्र अजून सातवीतच होता. प्रभेच्या आईला हें पटत नव्हतें. शिवाय माधवची गृहस्थितीही सखारामपंतांशी तुलना करतां बरीच कमी दर्जाची होती.

सखारामपतांचा या बाबतींत कांही विरोध नव्हता. दोघांच्या वयांत चांगले चार वर्षांचें अन्तर होतें, ते सखारामपतांच्या दृष्टीनें पुरेसें होतें. शिक्षणाचा कमीजास्तीपणा ते कांहीं हिशेबीं धरीत नव्हते. ते म्हणत, 'आतां प्रभा इथं येऊन पडली आहे. इथं कांही कॉलेज नाही पण माधव उद्यां मॅट्रिक झाला कीं कॉलेजांत जाईल आणि बी. ए होईल—एल्एल् बी. होईल. इथं तो येऊन ज्यावेळीं वकिली करूं लागेल, त्यावेळीं प्रभा मॅट्रिक झालेली आहे याची कुणाला आठवणही रहाणार नाहीं. आम्ही आपलं मुलींना शिक्षण कां दिलं? एक मुंबईची फॅशन म्हणून! शेजारच्या मुली शाळेंत जात असत म्हणून हीही जाई त्याही पास झाल्या—हीही पास झाली त्या कॉलेजांत गेल्या—म्हणून हिलाही कॉलेजात पाठविलं. आतां इथं गांवीं आलों, त्यावेळी साराच बाजार आटोपला. मुलगा असता, तर त्याला बोर्डिंगांत ठेवावा लागला असता पण मुलीला कांहीं कुणी बोर्डिंगांत ठेवीत नाहीं. आतां परिस्थितीच्या बाबतीत पहायचं तर नोकरीला लागलों त्यावेळीं आम्ही कुठ श्रीमत होतों! आतां इथं जी माणस नांवालैकिकाला आलीं आहेत, तीं कांही श्रीमंतांच्याच कुळांत जन्माला आली नव्हतीं. उद्यां माधव नांवलैकिकाला कशावरून नाहीं येणार?—'

पण सखारामपतांच्या बायकोला हा युक्तिवाद कांहीं पटत नसे. तिला वाटे, माझी मुलगी जास्त हुषार आहे, तेव्हां तिच्यापेक्षांही जास्त हुषार असलेला नवरा तिला मिळाला पाहिजे.

स्वभावानें माधव खरोखरच मोठा प्रेमळ होता. मोठा गोड बोलणारा, सदा आनंदी, सर्वांशीं दोस्ती जोडणारा असा त्याचा स्वभाव असल्यामुळें शैक्षणिक वैषम्याबद्दल प्रभेला कांहीं वाटत नव्हतें.

आमच्या घरीं येऊन हळू हळू तीं एकमेकांना चोरून भेटूं लागलीं. एकमेकांचें एकमेकांबद्दल आकर्षण वाढूं लागले.

आमच्या गांवीं वयानें एवढी वाढलेली मुलगी क्वचितच दिसून येई. तसाच एवढ्या मोठ्या वयाचा अविवाहित तरुण क्वचितच दिसे हायस्कुलमधल्या सातव्या यत्तेंतील शेंकडा पन्नास मुलांचीं लग्नें झालेलीं होतीं. आणि ज्यांचीं झालेलीं नव्हतीं त्यांचीं वयें लग्नाला योग्य नव्हतीं. म्हणूनच आमच्या गांवासारख्या मागासलेल्या

गांवांत वयोमानाच्या दृष्टीनें हे जोडपें अनुरूप आहे असें मला त्यावेळीं वाटलें आणि म्हणूनच त्यांच्या भेटी–गांठी घडून येतील असे प्रसंग मी मुद्दाम आणूं लागलों. योगायोग असा काहीं चमत्कारिक होता, कीं आम्हां सर्वांची इच्छा असूनही हें लग्न घडून यावें अशी ईश्वरी इच्छाच नव्हती सखारामपंत मृत्यू पावले आणि प्रभेला घेऊन तिची आई मुंबईला आपल्या भावाकडे गेली.

मॅट्रिक होऊन माधव मुबईच्या कॉलेजांत जाऊं लागला आणि एके दिवशीं योगायोगानें त्याला कळून आलें, कीं प्रभाही पुन्हां कॉलेजात जाऊ लागली होती.

माधव ज्या कॉलेजात होता त्या कॉलेजात ती जात नव्हती एक टर्म खलास होतांच माधवनें कॉलेज बदललें आणि पुन्हां त्यांच्या गांठीभेटी होऊं लागल्या

प्रभेच्या आईला पसत पडत नव्हतें. हें मधलें वर्ष-दीड वर्ष फुकट गेल्यामुळे माधव आणि प्रभा जरी एकाच क्लासांत आलीं होतीं, तरी आपली मुलगी माधव-पेक्षा जास्त हुषार आहे, ही प्रभेच्या आईची कल्पना कांही नाहीशी झाली नव्हती

तिनें आपल्या भावाचा पाठपुरावा केला आणि एका नुकत्याच पदवी घेतलेल्या वकिलाशीं—बी ए एल्एल् बी शीं प्रभेचा विवाह होऊन गेला

याच वेळीं माधवचे वडीलही कैलासवासी झाले. हे दोन धक्के मिळाल्यामुळें तो अत्यत उदासीन झाला आणि एका व्यापाऱ्याबरोबर आफ्रिकेला निघून गेला.

कित्येक वर्षें त्याचा मला पत्ता नव्हता. आफ्रिकेंत चांगली पुंजी करून ज्यावेळीं तो परत आला, त्यावेळीं त्यानें मुंबईतच ठाण मांडलें. मधल्या काळांत त्याचें लग्न झालें होतें आणि त्याला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन मुलें होतीं आफ्रिकेंतच त्याची बायको मृत्यु पावली होती

परत आल्यानंतर त्याला कळलें, कीं प्रभाही हयात नाहीं. तिलाही काहीं मुलें झाली होतीं, पण कसोशीनें जास्त चौकशी करणें त्याला बरें वाटलें नाहीं.

त्याचा मुलगा प्रभाकर यावेळी कॉलेजांत जाऊ लागला होता.

माधव आतां म्हाताऱ्याच्या सदरांत चांगलाच मोडूं लागला होता आणि मीही वार्धक्याच्या सीमेवर उभा होतों. आम्हा दोघांचीही गांठ पडली म्हणजे जुन्या गोष्टी निघत, त्यावेळीं माधवच्या चेहऱ्यावर खेदापेक्षा तिरस्काराचीच छाया जास्त दिसत असे. प्रभेच्या आईच्या दुराग्रहामुळें प्रभेला आपण मुकलों असा

समज झाल्यामुळें त्याला स्त्रीजातीबद्दल तिटकारा वाटत होता असें जरी होते तरी त्यानें आपल्या मुलाचें ठेवलेले ' प्रभाकर ' हे नाव पाहून प्रभेबद्दलचे त्याचे आकर्षण त्या परिस्थितींतही कुठें तरी जागे राहिले होते अशी अटकळ मला आल्यावांचून राहिली नाही

माधवची मुलगीही कॉलेजात जात होती तिचा स्वभाव माधवसारखाच मोठा लाघवी असल्यामुळे तिनें कॉलेजांतील मैत्रिणीचा परिवार बराच वाढविला होता. या मैत्रिणी सुट्टीच्या दिवशी तिच्या घरी गोळा होऊन धुडगूस घालीत असत. प्रभाकरचा स्वभाव बराचसा एकलकोंडा असल्यामुळे त्याला मित्रांचा परिवार तर नव्हताच पण इदूच्या--त्याच्या बहिणीच्या—मित्रमैत्रिणीच्या परिवारापासूनही तो सदोदित दूर रहात असें माधव स्वत आपल्या मुलाच्या बाबतीत फारशी कळकळ दाखवीत नसे त्याचा सारा वेळ कुठे तरी क्लबांत-जिमखान्यात जायचा त्यामुळें घरी काय चालतें याची त्याला दादही नव्हती, किंवा तशी दाद घेण्याचा त्यानें कधीं प्रयत्नही केला नाहीं मुलांच्या चारित्र्यावर त्याचा विश्वास होता आणि आयुष्यांत आलेल्या अनुभवामुळे मुलाना बधनें घालायचीं नाहीत, असे त्याचें मत होऊन बसलें होते

मी आणि माधव एके दिवशीं बोलत बसलो असतां प्रभाकर माझ्याकडे आला आणि त्यानें एकांतांत माझी गांठ घेण्याची इच्छा प्रदर्शित केली अर्थातच यांत कसली चोरी नव्हती. त्याने सांगितले तें बापाच्या अगदीं समोर सांगितलें आणि माधवच्यां स्वभावानुसार त्यानेही त्या बाबतीत फाजील जिज्ञासा प्रदर्शित केली नाही प्रभाकर मला भेटला आणि त्यानें जी हकीकत सागितली ती बापाच्या इतिहासाहाची पुनरावृत्तीच होती तशीच त्याच्यापेक्षा एक वर्ष कॉलेजात पुढे असलेली एक मुलगी, तिचा बापही त्याच कारणासाठी त्या लग्नाला विरोधी होता. स्वत-च्या बापाबद्दल प्रभाकरला खात्री होती म्हणून त्याने ही गोष्ट कांहीतरी एक निकाल लागेपर्यंत आपल्या बापाला कळवायची नाहीं असें ठरविलें.

त्या मुलच्यिा बापाचा आणि माझा परिचय असता तर कांही प्रयत्न करून पाहिला असता. प्रभाकरच्या सांगण्यावरून तो माणूस बराच घमेंडखोर असावा, असें मला वाटलें. आणि म्हणूनच मुद्दाम त्याचा परिचय करून घेऊन या बाबतीत

मध्यस्ती करणें मला इष्ट वाटले नाहीं.

माझा हा निष्कर्ष प्रभाकरलाही पटला आणि कांहीं दिवसपर्यंत आम्हीं स्वस्थ रहायचें असें ठरविले

माधव फारसा घरीं रहात नसे पण एक दिवस राहिला होता नित्या-प्रमाणें इंदूच्या मैत्रिणी त्या दिवशीं गोळा झाल्या होत्या. त्यांतील लीला नावाच्या एका मुलीला पहातांच तो आश्चर्यचकित झाला त्या मुलीच्या आणि प्रभाच्या चेहऱ्यात विलक्षण साम्य होतें. लहानपणीं प्रभेचा जो चेहरा त्यानें पाहिला होता, तो चेहेरा प्रौढपणी न पाहिल्यामुळें त्याला प्रभाच पुन्हां भेटली असें वाटलें

चौकशी करता ती प्रभेचीच मुलगी होती हे त्याला कळलें स्वतःच्या मुलीच्या बाबतींत उदासीन रहाणारा माधव लीलेच्या बाबतीत विशेष कळकळ दाखवू लागला इंदूच्या मैत्रिणी घरी येण्याच्या दिवशी तो हटकून घरीं राहूं लागला

नैसर्गिक आकर्षण असो किंवा माधवच्या वर्तनाचा परिणाम असो, लीला त्याच्याशी फारच खेळीमेळीनें वागूं लागली

माधवची दृष्टी बदलली होती ती वात्सल्याची नव्हती. वात्सल्याच्या नजरेनें लीला कदाचित् त्याच्याकडे पहात असण्याचा संभव होता तरीही माधव मात्र आपलें वार्धक्य विसरला असल्यामुळें पूर्वीच्या काळांतील हायस्कुलांत असलेला माधव बनला होता.

त्या दोघांच्या वर्तनांत परकी माणसाला अनिष्ट दिसेल असे कोणतेच प्रकार घडून येत नव्हते पण एवढें मात्र खरें, कीं त्याची वृत्ति चळली होती. प्रभाकरनें मला जसें विश्वासांत घेतलें होते, त्याचप्रमाणें माधवनेंही आपलें अंतःकरण माझ्या-जवळ उघडें केलें

मला मोठा धक्का बसला मी त्याला आरशांत पहायला सांगितले.

प्रामाणिक असा आरसा देखील त्याची खात्री पटवायला समर्थ झाला नाही.

दोघांचाही लळा वाढत होता आणि माधवला वाटत होतें—माधव आपल्याला फसवून घेत होता—कीं लीलेचें आपल्यावर प्रेम आहे. तो मला म्हणाला, " नुसतं मीं विचारायचीच खोटी की ती होय म्हणेल अशी माझी खात्री आहे ! "

माधव आत्मवंचना करतो आहे असें मला वाटले

पुन्हां प्रभाकर मला भेटायला आला. त्यानें स्वत जाऊन आपल्या भावी सासऱ्याची समजूत घातली होती मुलीच्या हट्टामुळे तिचा बाप या लग्नाला समति द्यायला तयार झाला होता मीं मुद्दाम जाऊन त्यांची भेट घ्यावी आणि त्यांची समजूत घालावी—मन·पूर्वक त्यांना पटवून द्यावें, अशी प्रभाकरची इच्छा होती.

पहिल्यानें त्या मुलीला भेटावें असें मला वाटलें. माझ्या घरीं तिला घेऊन येण्यास मी प्रभाकरला सांगितले.

प्रभाकर ज्यावेळीं तिला घेऊन आला त्यावेळीं मला धक्का बसला मूर्तिमंत प्रभाच माझ्यापुढें उभी राहिली आहे असे मला वाटलें.

ती प्रभेची मुलगी लीला होती

मला मोठें सकट पडलें बापलेकांत तेढ येणार असें वाटूं लागलें. हें कोडें कसें सोडवावें याचा मला मोठा विचार पडला

माधव अविचार करीत होता—अन्याय करीत होता—किंबहुना त्याच्या मनोभावनेची मजल निसर्गाच्या विरुद्ध जात होती, असें मला वाटत होतें. प्रभाकर आणि लीला या दोघांचा विवाह वाटेल तें करून घडवून आणायचा असे मीं ठरवलें आणि त्याप्रमाणे उद्योगाला लागलों

माधवची भावना काय होती हें जरी मी प्रभाकरला सांगितलें नाही, तरी त्याचें मन थोडेंसें तयार करण्याच्या उद्देशानें मीं त्याला विचारलें, "समज, तुझा बाप या लग्नाला कबूल नसला—त्यान विरोध केला तर तू काय करशील? इस्टेटीवरचा वारसाहक्क तुला मिळूं नये असं त्यान केलं तर त्याला तुझी तयारी आहे?"

प्रभाकर म्हणाला, "असं व्हायला काहीं कारण नाही आमच्या इंदूची लीला ही मैत्रीण आहे ती वारंवार आमच्या घरीं येते. तिला बाबांनीं पाहिलं आहे—नव्हे तिच्यावर त्यांचा लोभ आहे. आणि तिला जर आतां तिच्या बापाची इस्टेट मिळणार असेल तर बाबा विरोध कां करतील, हेंच मला कळत नाहीं!"

वस्तुस्थिति काय आहे हें प्रभाकरला सांगणें शक्य नव्हतें. मी नुसतें म्हटलें, "आपण नुसती अशी कल्पना करू. तसा प्रसंग आला तर स्वतःच्या

पायावर उभं रहाण्याची तुम्हा दोघांची तयारी आहे का ?"

प्रभाकर म्हणाला, 'माझी तयारी आहे. पण लीलेलाही मला विचारलें पाहिजे'

" नुसत्या भावनेवर जाऊं नको " मीं म्हटलें, " मनावरच्या तात्कालिक परिणामानें आपण वाटेल ते निश्चय करायला तयार होतों पण त्याचा पुढे पश्चात्ताप होता कामा नये कारण काय आहे तें मला आतां सांगतां येत नाही. पण असं कांहीं तरी होणार हें निश्चित समज आणि मग मला काय ते उत्तर दे"

लीलेचा विचार घेऊन प्रभाकरनें मला शेवटचें उत्तर दिलें. वाटेल त्या परिस्थितीला तोंड द्यायची दोघांचीही तयारी होती

मी लीलेच्या बापाला भेटलों. पूर्वीच्या परिचयाची ओळख दिली तो मला प्रत्यक्ष ओळखत नव्हता पण बायकोच्या तोंडून त्याने माझें नांव ऐकले होतें

त्याची कबुली मिळाली

प्रभाकरप्रमाणेंच माधवही हातघाईला आला होता आयुष्यांत ज्यानें कधीही अविचार केला नाही त्या माधवने त्या दिवशीं लीलेला सरळ सरळ प्रश्न टाकला.

ती घाबरून गेली तिनें कांहीच उत्तर दिलें नाही शरमेनें ती बोलत नाहीं असा माधवनें आपला समज करून घेतला आणि तिचें मौन हेंच संमतीचें लक्षण आहे असें समजून तो ती हकीकत मला सांगायला मोठ्या आनदानें आला

मी मोठ्या पेंचांत सांपडल्यासारखा झालों वस्तुथिस्ति सागावी कीं न सांगावी, याचा मला निश्चय करतां येईना

मी तेवढेंच ऐकून घेतलें आणि स्वस्थ राहिलो.

लीलेचा बाप लग्न ठरविण्यासाठीं ज्यावेळीं माधवला भेटायला आला त्यावेळीं सारें रहस्य बाहेर पडलें.

अगदीं निर्लज्जपणाने माधवनें लीलेला मागणी घातली लीलेच्या बापाला मनस्वी संताप आला आणि त्याच्या भरात त्यानें माधवच्या अंगावर हात टाकला.

लीलेचा बाप निघून जातांच माधवची नजर मुलीकडे वळली. योगायोगानें लीलाही त्याच वेळीं आली होती आणि ती तिथें हजर होती.

सर्वांत त्रेधा उडाली ती माझी. समजूत घालण्याच्या पलीकडे माधवाची वृत्ती गेली होती. कुणाचेंच ऐकायला तो तयार नव्हता. लीला आपल्याशीं लग्न करायला तयार आहे अशी त्याच्या मनाची ठाम समजूत झाली होती.

मी लीलेला सरळ प्रश्न केला तेव्हां ती म्हणाली, बाबासाहेबांनीं गैरसमज करून घेतला आहे माझ्या आईच्या आठवणीमुळें "त्यांचा माझ्यावर लोभ आहे असंच मी समजत होते—"

माधव भडकला आणि त्यानें त्याच क्षणाला मुलाला घरातून घालवून दिलें.

प्रभाकर आणि लीला आज दारिद्र्याशीं झगडत आपला संसार चालवीत आहेत

# यमुनेचे विवाह !

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचा तो काल होता. व्हिक्टोरिया राणीच्या राज्यांत सर्वत्र आबादीआबाद आहे, काठीला सोनें बांधून हिंदुस्थानच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत बिनधोक जावें, आतां कुणाला कसलाच त्रास होणार नाहीं, अशी प्रत्येकाची खात्री झाल्याचा तो काल होता.

असंतोषाचें बीज रोवावें म्हणून प्रयत्न करणारी एकाददुसरीच व्यक्ति त्यावेळीं निर्माण होत होती. आजच्यासारखी वर्तमानपत्रांची मुबलक पैदास त्यावेळी नव्हती. 'मुंबई टाइम्स' आणि 'मुंबई गॅझेट' हें त्यावेळच्या सुशिक्षितांचें अन्न होतें. त्याच काळांत 'केसरी' निघाला मराठी वर्तमानपत्राना देखील इंग्रजी वर्तमानपत्रांप्रमाणेंच लेख लिहितां येतात, राजकारणाची चर्चा करता येते असें 'गॅझेट,' 'टाइम्स' वाचणारे सरकारी नोकरसुद्धां म्हणू लागले.

साडेतीन महिन्यांची शिक्षा भोगल्यानंतर टिळक–आगरकर सर्वत्रांच्या नजरेंत भरूं लागले विचारांची खळबळ जरी जोरांत सुरू झाली नाही, तरी विचारणा होऊं लागली आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक, हा प्रश्न निर्माण झाला आणि केसरींतून आगरकर बाहेर पडले.

आगरकरांच्या सुधारक पत्रानें राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही विषयांची चर्चा करण्यास सुरवात केली. प्रचलित चाली, रूढी आणि परंपरा यांत एकजात सुधारणा झाली पाहिजे, असें 'सुधारकां'तून ज्यावेळीं घोषित करण्यांत येऊं लागलें त्यावेळीं क्वचितच चमकणारा एखादा पदवीधर तें पत्र लक्षपूर्वक वाचूं लागला.

शिक्षणाचा त्यावेळी दुष्काळ झाला नव्हता. परीक्षा आणि पदवी हा माल हिंदुस्थानच्या बाजारात जरी येत होता, तरी गिऱ्हाईकांची वाणच होती जो एकादा दुसरा पदवीधर विश्वविद्यालयाचें शिक्कामोर्तब घेऊन बाहेर पडत असे तो आपण

इतरांपेक्षां कांही निराळ्या कोटीतली व्यक्ति आहो या समजानें जगांत वावरूं लागे. आणि त्यामुळे पदवीधरांबद्दल उत्पन्न होत असलेल्या अभिमानाला कुठें ना कुठें तरी पायबंद पडे.

या कालातलाच दिनकर हा एक पदवीधर होता. लहानशा तालुक्याच्या गावी त्याचे घर होतें. तो बी ए झाला म्हणून त्याच्या आईबापाना मोठा आनद वाटला तो बी ए झाला म्हणून त्याच्या सासऱ्याचें अंत·करण अभिमानानें फुलून गेलें होतें —आणि तो बी ए. झाला म्हणून गांवातील लोक जितके त्याला वचकत, तितके तो ' सुधारक ' पत्र वाचतो म्हणून मागून त्याची निंदा करीत

फारच अल्पवयात त्याचें लग्न झाले होतें. लग्नाच्या वेळीं त्याचें वय सोळा वर्षांचें होते पत्नी यमुना ही अकरा वर्षांची होती. वयाच्या एकविसाव्या वर्षी तो बी ए. झाला—विश्वद्यालयाची पदवी त्याला मिळाली आणि त्याच वर्षी निसर्गाच्या विश्वविद्यालयांत यमुनाही पत्नीपदाची पदवी मिळती झाली.

दिनकर लौकर पदवीधर झाला म्हणून जसें त्याचें कौतुक केलें जात असे, त्याचप्रमाणे यमुनेला पत्नीपदाची पदवी मिळविण्यासाठी तिच्या बरोबरीच्या मुलींच्या मानाने जास्त कालावधि लागला म्हणून सासर–माहेरची सारीच माणसें नाराज असत यमुना स्वत देखील या बाबतींत मोठी खंत घेऊन राहिलेली होती. पण ज्या वेळीं तो प्रसंग आला, साखरा वाटल्या गेल्या, दिनकरच्या इस्त्रीच्या नव्या शर्टवर त्याच्या कोणी मित्रानें तांबड्या शाईची दौत फेकली, तेव्हा सर्वांचाच आनद गगनांत मावेनासा झाला.

आपल्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं, असें दाखवायचा दिनकर जरी प्रयत्न करीत असे, तरी मनातल्या मनात तो हुरळून गेला होता. आयुष्यांतील कांहीं विशिष्ठ सवेदना त्याच्या हृदयांत उत्पन्न झाली होती. ज्या एका विशिष्ठ प्रकारच्या कालाची तो इतके दिवस वाट पहात होता, तो काल आल्यामुळे त्याचे अतःकरण थरारून गेले होतें.

इंग्रजी वाङ्मयाचा तो अभ्यासू होता स्कॉट, डीकन्स, थॅकरे, जॉर्ज मेरिडिथ, टॉमस हार्डी, प्रभृति ग्रथकारांचे वाङ्मय त्यानें चागलेंच वाचून काढलें होतें. त्याच्या मनावर त्या वाङ्मयांतील विशिष्ठ परिस्थितीचा परिणामही तितक्याच मोठ्या प्रमाणात झाला होता. पाश्चत्यांची कौटुंबिक परिस्थिति आणि आपली परिस्थिति

यांची तुलना करतांच जें वैषम्य दिसते, त्या वैषम्याबद्दल सार्वत्रिकरीत्या चर्चा होत असल्यामुळें तत्कालीन हिंदु कुटुंबाच्या गृहस्थितीबद्दल तो उदासीन झाला होता पाश्चात्य प्रियाराधनाच्या ज्या कथा प्रसिद्ध होत, त्याच्या अवलोकनाने तशी परिस्थिति आपल्या समाजांत नाही, याची उणीव त्याला तीव्रतेनें जाणवत होती

एकादी परिज्ञात यौवना तरुणी भेटावी, तिचा आपला परिचय व्हावा, त्या परिचयांत एकमेकाच्या हृदयकथा एकमेकांना पटाव्या, त्याचे वाङ्निश्चय व्हावे, आणि मग विवाह करून संसार थाटावा, अशा प्रकारची कल्पनाचित्रें तो रेखाटीत होता.

पण, ती परिस्थिति त्याला साध्य नव्हती आधीच त्याचें लग्न झाले होतें. अकरा वर्षांच्या एका मुलीशी लग्न झाले होतें तेव्हा तो सोळा वर्षांचा एक बच्चा होता तेव्हांपासून पाच वर्षेपर्यंत यमुना त्याच्या घरीं येत जात होती, पण तिचा परिचय त्याला झाला नव्हता तिच्या चेहऱ्याची रूपरेषाही त्याला चांगलीशी नजरेसमोर आणतां येत नसे गावातल्या साऱ्या मुलींची रुपरेषा पक्की ओळख होण्या-इतकी जरी त्याला माहीत होती, तरी पत्नी म्हणून घरांत वावरणारी यमुना नाकीडोळीं कशी आहे हें देखील त्याला सांगता आले नसतें तत्कालीन आचारा-प्रमाणें तिनें त्याच्यासमोर येणे देखील शक्य नव्हतें. तिच्यासारखी दुसरी एकादी मुलगी त्याच्याबरोबरच उभी राहिली असती, तर आपली पत्नी कुठली व परकी मुलगी कुठली हें देखील त्याला ओळखता आलें नसतें

पण ह्या परिचयाचा प्रसंग ज्यावेळी आला त्यावेळी तो घाबरून गेला. त्यानें तिच्याकडे डोळे टवकारून पाहिलें नाहीं, किंवा तिनेही त्याच्या डोळ्याला डोळा दिला नाही दोन अपरिचित व्यक्तींचा ज्यावेळीं सक्तीनें परिचय करून दिला जातो, त्यावेळी त्यांची जशी तारांबळ उडते, जो संकोच उत्पन्न होतो, तितक्याच संकोचानें त्यांनीं संसाराच्या विश्वविद्यालयांतील पहिले ‘ कॉन्व्होकेशन ’ पार पाडलें.

तीं दोघें रोज एकत्र येत होती पण कित्येक दिवसांपर्यंत त्यांचा परिचय होत नव्हता पाश्चात्य वाङ्मयांतील प्रेमकथा वाचून पतिपत्नींच्या एकांतिक भेटींचे प्रसंग त्यानें आपल्या मनांत रेखाटले होते. त्यांतील एकही प्रसंग वास्तवता पावेना म्हणून तो उद्विग्न झाला जसजसा सहवास वाढत होता, तसतसा यमुनेच्या ठिकाणचा संकोचही वाढत होता. जिकडे जावें तिकडे चोरी. दिवसाचा अर्धा भाग जरी तीं दोघें एकत्र रहात होतीं तरी बाकीच्या अर्ध्या भागांत आपलें निकटवर्ति नातें

सर्वांसमोर उघड करण्याची त्यांना चोरी होती. पत्नीला नांवानें हांक मारावी, असें कितीतरी वेळ त्याच्या मनांत येई, पण त्याला बंदी होती. आपल्या बहीण-भावंडांशीं आपण जशा प्रकारें बोलतों, तसेंच यमुनेशींही बोलत बसावें, असे दिनकरच्या मनांत येई. पण त्या मानवी जीवनांतील अतिशय साध्यासिध्या अशा पतिपत्नींच्या परस्पर सभाषणाच्या व्यवहाराला देखील आर्यसंस्कृतीच्या परंपरेनें अडथळा केला होता

दिवसेंदिवस दिनकरची तळमळ वाढूं लागली. औदासीन्याची छाया त्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें दिसू लागली मामलेदार कचेरीत एकदम पंचवीस रुपयांवर त्याची नेमणूक झाल्यामुळे इतर लोक त्याचा हेवा करीत होते, तरी तो मनातल्या मनांत खचून गेला होता त्यावेळीं मॅट्रिक झालेल्याची संख्या देखील कांहीं फारशी नव्हती तरीही बारा रुपयांची नोकरी चटकन् मिळणें मॅट्रिक झालेल्या माणसाला सुलभ झाल्यामुळे इतर लोक त्याचा हेवा करीत, तिथें ज्या पगारासाठी आणखी दहा वर्षें वाट पहावी लागली असती तो पंचवीस रुपयांचा पगार एकदम मिळाल्यामुळे दिनकरचा हेवा सर्वच करूं लागले असल्यास आश्चर्य नव्हतें

मॅट्रिक झालेल्या किंवा न झालेल्या इतर कारकुनांना पगारवाढीची जरी खात्री होती तरी मामलेदारी त्यांना सहजसाध्य नव्हती पण दिनकर मात्र बी. ए. असल्यामुळें मामलेदार होणार हे निश्चित होते आणि म्हणूनच त्याचा गौरव आणि हेवा केला जात होता.

एक वर्ष निघून गेलें तरीही दिनकर आणि यमुना यांचा परिचय होईना या एक वर्षापूर्वी ज्यावेळीं त्यांना एकत्रित आणण्यांत येत नव्हतें त्यावेळीं तीं दोघें एकमेकांपासून जितकीं दूर होतीं, तितकींच यावेळींही होतीं संभाषणाचीं चार वाक्येंसुद्धा या एक वर्षाच्या काळांत परस्परामध्यें बोलली गेलीं नाहींत. एकदां यमुनेची प्रकृति बिघडली होती, तिला ताप आला होता. अंगाला हात लागल्यामुळें तिला ताप आला आहे हें दिनकरला कळलें, त्यावेळीं त्यानें तिला विचारलें, “ काय, ताप आला आहे वाटतं ? ”

यमुना म्हणाली, “ हं ! ” एवढेंच संभाषण. दुसऱ्या दिवशीं ‘ तिला काल

रात्री ताप आला होता कांहीं औषधपाण्याची सोय वगैरे करा ' असे आपल्या घरच्या वडील माणसांना सांगणेही दिनकरला शक्य नव्हतें. आपल्याला ताप आला आहे असें तीही बोलली नाही दररोजची राबणूक सुरू होती पण ताप अनावर झाला, ती मूर्च्छा येऊन पडली, त्यावेळीं कुठें घरच्या माणसांना कळलें कीं यमुना आजारी आहे. आणि मग उपचार सुरू झाले

प्रेममीलनाच्या, विरहाच्या आणि पुनर्मीलनाच्या–वाङ्मयांतून परिचित झालेल्या काव्यमय कल्पना दिनकरच्या अंत·करणांतून पहांटेच्या धुक्याप्रमाणें वितळून गेल्या. त्याला जीवन नीरस वाटू लागलें. यांत्रिक नित्यक्रमाचा त्याला तिटकारा आला !

सर्व दृष्टीनें त्याचे मन भांबावून गेले होतें. यमुना आनंदी आहे की तुसडी आहे, बुद्धीवान आहे की निर्बुद्ध आहे, शिक्षित आहे कीं अशिक्षित आहे, याचा कोणताच पुरावा त्याला सांपडेना

त्याला वाटलें किती दिवस हें असें चालणार ! देव–ब्राह्मणांच्या साक्षीत विवाहग्रंथीनें बद्ध झालेली दोन माणसें आणखी किती काळपर्यंत अशीं अपरिचित रहाणार ?

आजूबाजूला तो पहात होता तिकडेही असेंच चाललें होतें. दोन दोन मुले झालेल्या पतिपत्नींत सुद्धां परिचयाचा मागमूस नव्हता. हाच का आमचा संसार ? हेंच का कौटुंबिक जीवन ? प्रेम म्हणून कांहीं आहे का ? असल्यास त्याला कांही बंधनें आहेत का ? नसल्यास तें किती प्रतिबधित आहे ?

त्याला वाटले, हा काय जुलूम ? वाटेल त्याच्याशीं परिचय करतां येतो, पण प्रत्यक्ष आपल्या पत्नीबरोबर आपण बोलूं नये ? कां ?

का–? कां–? कां–? कां–? त्यानें पुन्हा पुन्हां प्रश्न करून पाहिला. त्याला उत्तर सांपडेना. ही आर्यसंस्कृति, यांत मुग्धता आहे, यांत आवृत प्रणयाची प्रचीति आहे, असेच सांगण्यांत येत होतें.

पण तें त्याला पटेना. त्याचा जीव जाजावून गेला. नोकरीकडे त्याचें लक्ष लागेना मामलेदारीच्या अपेक्षित वैभवाबद्दल त्याला अभिमान वाटेनासा झाला पितृपदप्राप्तीच्या मोहक कल्पना त्याला दुःसह वाटूं लागल्या. पत्नीशीं नुसतें बोलतां येत नाहीं–आपलें एखादें गोजिरवाणें मूल हातीं घेऊन खेळवतां येईल का आपल्याला ?

त्यानें शेजारींपाजारी पाहिलें तरुण पित्याने आपलें मूल घेऊन खेळवणें हा समाजाच्या दृष्टीनें गुन्हा होता. अप्रस्ततुता होती.

त्याचें मन भडकून उठलें त्या भडकलेल्या मनाच्या समाधानासाठी त्या अल्प व वृद्धांच्या हाती शोभणारीं तत्त्वज्ञानाचीं पुस्तकें तो हाताळू लागला

त्यात त्याचें मन रमूं लागलें संसार हा मायाभास आहे, याचे प्रत्यतर तो प्रत्यक्ष पहात होता. संसारांत सौख्य नाही, संसार हें जीवित–सर्वस्व नव्हे, ससार दु:खमूल आहे, त्यागातच मानवी जीविताची इतिकर्तव्यता आहे, हें तत्त्वज्ञान परंपरागत रूढाचारामुळें त्याला पटू लागले

एके दिवशीं त्यानें नोकरी सोडली आणि तो कुठेंतरी निघून गेला

दिनकर नापत्ता झाल्यावर सासरीं यमुनेचे हाल होऊ लागले. दळभद्री, पांढऱ्या पायाची, अवदसा, अशा सुसस्कृत विशेषणांनीं तिची सभावना होऊ लागली. पतिवियोगानें आधींच भांबावलेल्या त्या एकट्या पोरीला वडील माणसांकडून मिळणाऱ्या टोंचण्या असह्य होऊं लागल्या

लिहितां आलें असतें तर तिनें माहेरीं पत्र पाठवून आपल्याला घेऊन जाण्याची विनंति केली असती

पण तेंही शक्य नव्हतें. तिला लिहिता वाचतां जवळजवळ येत नव्हतें आणि आलें असतें तरी तिला पोष्टाचें पाकीट कुणी आणून दिलें असतें ?—तिचें पत्र कुणी टपालांत टाकलें असतें ? एखाद्या लहानशा दिराला तिनें हे काम सांगितलें असतें आणि त्यानें त्याचा बभ्रा केला असता, तर वडील माणसांनीं तिला जीव नकोसा करून टाकला असता शेजारच्या एका सूनबाईनें असेंच आपल्या माहेरीं पत्र पाठविल्यामुळें तिला घराला मुकावें लागलें होतें, हें यमुनेनें प्रत्यक्ष पाहिलें होतें

दिनकर निघून गेल्याची बातमी त्याच्या बापानें त्याच्या सासऱ्याला कळवली नव्हती. पण कर्णोपकर्णी ही बातमी जेव्हां त्याला कळली, त्यावेळीं तो यमुनेच्या सासरीं आला. दिनकरच्या बापानें, चुलत्यानें तोंडासमोर, व आईनें, चुलत्यांनीं आणि बहिणीनीं दाराआडून, हजारों शिव्या दिल्या

यमुनेला घेऊन तो आपल्या घरीं गेला आणि पुढें त्या दोन्ही कुटुंबांत

कोणत्याही प्रकारची आवकजावक बद झाली दोन कुटुबें दोन बाजूला राहिली. आणि त्या दोन कुटुबाचा मधला दुवा होऊन बसलेली यमुना आधार असताही निराधार ठरली.

माहेरचे जीवन यमुनेला दु सह होऊ लागलें तिला एक वडील भाऊ होता भावजय होती त्याना एक लहान मुलगा होता त्या मुलाचे लाड करण्यांत, त्याला खेळविण्यांत तिला जरी आनंद होई तरी अपत्यप्रेमाच्या उसनवारीने तिच्या मनाचें समाधान होत नव्हते तिची भावजयही तिच्यासारखीच होती. तिला मूल झालें होते तरी तिच्या नवऱ्याचें व तिचें कधी सभाषण होत नसे तरीही ती सुखी होती, आनदी होती

आपला नवरा आपल्याला कंटाळून गेला, याची कल्पना यमुनेला आली नव्हती. एका शब्दानें सुद्धां त्याने आपले हृद्गत तिच्याकडे व्यक्त केलें नव्हतें. आपल्या ठिकाणी कांहीं तरी उणीव आहे व ती उणीव आपल्या नवऱ्याला जाणवली, दु सह झाली, म्हणूनच तो आपल्याला टाकून निघून गेला असें तिचें मन तिला सांगत असे ती उणीव कोणती याची चांगलीशी कल्पना तिला येत नव्हती. तिच्या परिस्थितीहून तिच्या आजूबाजूची परिस्थिति भिन्न नसल्यामुळें आपल्या नवऱ्याला असमाधान व्हायला कोणतें कारण झालें हें तिला कळतही नव्हते

भाऊबिजेसाठीं तिच्या भावजयीचा भाऊ आला. त्याची बायकोही त्याच्या बरोबर आली होती तोही एक पदवीधर होता मुंबईला कोणच्याशा कॉलेजात तो प्रोफेसर होता त्याची बायकोही चागली शिकलेली होती सारा दिवस ती कांही ना काही तरी वाचीत बसलेली असे. सहसा इतर बायकात मिळत नसे. बोलायची काय ती आपल्या नवऱ्याजवळ अगदीं चारचौघांत उघडपणें तीं दोघेंही मजा मारीत बसत असल्याचें पाहून यमुनेच्या अगावर पहिल्यानें शहारे येत तिला वाटे ‘ काय हा स्वैराचार ! ’

तिची भावजयही तसेंच म्हणे, “ आपल्याला काय करायचं आहे ? तीं शिकलेली माणसं ! तो आहे प्रोफेसर आणि तिलाही इंग्रजी येत ' म्हणे ! पाहिलत ना वन्स ! ते आपल्या घरीं मोठें इंग्रजी वर्तमानपत्र येते तें वाचण्यासाठीं तिची कोण धडपड चालते. किती झाल तरी तो माझा दादा म्हणून बोलता येत नाहीं— पण—आपला उघड उघड बोलत बसतो--ती सुद्धां इंग्रजी बोलते !

मेलीं एकमेकांबरोबर संध्याकाळीं फिरायला जातात ! गांवांतलीं लोकं मला फाडफाडून खाऊं लागलीं आहेत ! मेली जशी कांही लाज कोळून प्यायली आहे भररस्त्यांत नवऱ्याबरोबर बोलत जाते ! आणि त्याला त्याचे कांहींच वाटत नाहीं. कांयसा यम. ए. झाला आहे ना तो !—

" म्हणजे बी. ए. पेक्षा जास्त का ? " यमुनेने विचारलें

" असच वाटतं ! " तिची भावजय म्हणाली, " हा सारा या यमये. बी ये चा परिणाम ! मुंबईला—मी दोनतीन वेळा गेले होतें दादाकडे त्यावेळीं पाहिलं, सगळे यमये बीये हे असेच ! बायकोला बरोबर घेऊन हिंडायला हवं त्यांना ! बायकोनं पुस्तक वाचायचं, नवऱ्यान ऐकत बसायचं, आपल साऱ्या जगानं पाहायचं ! त्यांतच त्यांना धन्यता वाटते—"

भावजयीची टकळी यमुनेच्या कानीं जात नव्हती. तिच्या डोक्यात प्रकाश पडला होता. कोणत्या उणीवेमुळें आपला नवरा असतुष्ट झाला याची तिला अंधुकशी कल्पना आली. त्या कल्पनेवर जसजसा ती विचार करू लागली तसतशी तिची खात्री पटूं लागली. दिनकर तिला केव्हां केव्हां कांहीं प्रश्न करीत असे ते तिला आठवूं लागले. पत्नीधर्माला अनुसरून तिनें कधींच त्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं नव्हतीं. त्यांत कांहीं अवास्तव आहे असे त्यावेळीं तिला वाटलें नव्हतें.

आतां तिला पटलें आपली चूक कुठें झाली हे तिला उमगलें

तिचीं लहान भावंडें शाळेंत जात होतीं. त्यांचीं पुस्तकें घेऊन तीं वाचायचा ती प्रयत्न करूं लागली. लहानपणीं तिला थोडीशी अक्षरओळख झाली होती. त्या ज्ञानाला जिल्हई देण्याचा प्रयत्न ती करूं लागली

लहान भावंडें न म्हणतां त्यांच्याकडून धडे घेऊ लागली. नुसती एक गंमत म्हणून पहिल्या पहिल्यानें तीं तिला शिकवीत असत. पण पुढं पुढं तिची धाकटीं भावंडें देखील ज्यावेळीं तिची थट्टा करू लागलीं त्यावेळीं स्वावलंबनाचा मार्ग तिला पत्करावा लागला

मुलें पुस्तकें देतनाशीं झालीं, तेव्हां तिची जिज्ञासा प्रबळ होऊं लागली. मग दुसरें काय करणार ? घरीं वर्तमानपत्रें येत असत तीं घेऊन ती वाचूं लागली. केसरी येत असे, सुधारक येत असे. त्या घरांत सुधारकाला मज्जाव नव्हता. तिचा भाऊ आपण आगरकरांचा भक्त आहें, असें मिरवित असे.

आगरकराच्या सुधारकनें तिला नवी दृष्टि दिली. नव्या कल्पना तिच्या मनांत उदय पावू लागल्या. आपल्या गतचरित्राचें ती सिंहावलोकन करू लागली आणि आपले कुठे चुकले याची कल्पना तिला येऊं लागली.

त्यांच्या घरीं आपव्यांची करमणूकही येत होती. त्यांत 'पण लक्षांत कोण घेतो ?' ही कादबरी चालू होती तिचे वाचन तिनें सुरू केलें आपल्या सारख्याच एका मुलीचे चरित्र त्यात पाहून ती त्या चरित्राशी आपल्या चरित्राचा पडताळा घालू लागली

एके दिवशीं ती आपल्या भावाला म्हणाली, "ही करमणूकींतली गोष्ट तू वाचलीस का रे, दादा ?"

तिच्या दादाच्या डोळ्यात चटकन् पाणी आलें. तिनें हा प्रश्न का केला, हे त्याला कळलें

दुसऱ्या दिवसापासून तिचा दादा तिला शिकवूं लागला. भावजय तिची थट्टा करू लागली. दादानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. आणि यमुना इतक्या आनंदांत होती, की भावजयीच्या थट्टेकडे तिचे कधीच लक्ष गेलें नाही

यमुनेचे शिक्षण सुरू होतें परका मास्तर शिकवणीला आणून त्याला घरी सवलत देणें त्या काळच्या परिस्थितीत शक्य नव्हतें, म्हणून तिचा दादाच तिला फुरसतीच्या वेळी जितके शिकवणें शक्य होतें तितके शिकवीत असे.

कुठून तरी चांगलें लिहितांवाचता आलें म्हणजे झालें. एवढीच गोष्ट ध्यानांत धरून तिचा दादा तिला शिकवीत होता तिला कांहीं परीक्षा द्यायच्या नव्हत्या जसजशी ती चांगली लिहू वाचूं लागली तसतशी तिची भावजय तिचा जास्त जास्त द्वेष करूं लागली.

सासरचीं माणसें यमुनेची मुळीच खबर घेत नव्हतीं. एकदां तिनें सासरीं जाऊन येण्याचा प्रयत्न केला पण दुसऱ्याच दिवशीं तिला परत यावें लागलें.

नवऱ्याचा कांहींच पत्ता नव्हता.

वर्षांवर वर्षे निघून गेलीं. यमुनेचे आईबाप मयत झाले. वाढत्या कुंटुबाचा चरितार्थ चालविण्यासाठीं तिचा दादा सर्वांना घेऊन नागपूरला गेला. दोनतीन

ठिकाणीं नोकऱ्या करून शेवटीं तो तिथल्या एका गिरणींत चांगल्या वाढत्या पगारावर प्रतिष्ठित झाला.

यमुनेची भावजय तिला शक्य तितका त्रास देत असे. मुलांकडून देखील तिचा होईल तितका छळ करविण्यास तिने कमी केले नाही

यमुनेचा भाऊ खंबीर होता म्हणून होतील ते कष्ट सोसून ती आयुष्यातले दिवस कंठीत होती घरीं पोराबाळाचें लेंढार वाढत चालले होतें, त्यामुळें त्यांच्या खस्ता काढायला कुणींतरी पाहिजेच होतें. तिची भावजय तिला त्रास देत असे, तरी पण ती निघून जावी अशीं मात्र तिची इच्छा नसें अन्नवस्त्राच्या मोबदल्यांत आयती एक चांगली नोकर मिळाली आहे, असे दिसून आल्यावर तिनें तरी तिला जा कां म्हणावें ?

आणि यमुना जाणार होती कुठें ? कित्येक वर्षांत सासरची तिला कांही खबर कळली नाव्हती. तिच्या सासरचीं माणसे आतां तिला पारखीं झाली होतीं तिचा एक दीर तिला कुठेंसा चुकून भेटला होता पण त्यानें कांहीं तिला ओळखलें नाहीं आणि तिनेंही त्याला ओळखलें नाहीं तिच्या दादानें सांगितलें म्हणून तिला कळले, कीं हा आपला दीर.

तेवढीच काय ती सासरची जुनी आठवण. आपल्याला एक सासर होतें तिथें आपण काही वर्षे नांदलों होतों. नवरा या नात्यानें कोणा एका माणसाचा वर्षभर सहवास झाला होता—पण परिचय मुळीच झाला नव्हता—यापलीकडे जुन्या जीवनाची तिला आठवण सुद्धां राहिली नव्हती

याही आठवणी येत, त्या चुकून स्वप्नासारख्या–भावजयी बोलल्यामुळे–केव्हां तरी मनाला असमाधान झालें म्हणजे. खरें पाहिलें तर तिच्या आयुष्याला आता जें वळण लागलें होतें, त्यामुळें ती सर्वच बाबतींत उदासीन होऊन बसली होती. भावाचा संसार ती चालवीत होती. पण त्यात तरी तिचें अंत:करण कुठें होतें !

लिहिण्यावाचण्याचा क्रम मात्र तिनें सारखा चालू ठेवला होता. सर्वकाळ एकांतांत कुढत राहिल्यामुळें तिची कल्पनाशक्ती वाढूं लागली होती. आणि त्या वाढत्या शक्तीला फांटा पोंचण्यासाठीं, जें मनांत येई तें ती लिहून काढी.

एकदां तिच्या दादानें ते तिचे लेख पाहिले. तो आश्चर्यचकित झाला. चांगल्या कसलेल्या लेखकालाही थक्क करून सोडील अशा प्रकारची विचारसरणी

त्या लेखांतून मांडली गेल्याचें पाहून त्यानें ते एका प्रमुख मासिकाकडे पाठविले.

त्या लेखांचे संकलित व्हॉल्यूम्स् प्रसिद्ध होऊं लागले

त्यांना चांगला खप मिळू लागला आणि अल्प कां होईना पण लेखनावर मिळणाऱ्या मोबदल्यामुळें आपण आतां कोणावर भार नाहीं असे यमुनेला वाटूं लागलें.

हळूहळू ती सार्वजनिक कार्यांत वावरूं लागली हल्ली बऱ्याचशा सामाजिक चळवळींत अग्रभाग घेतल्यामुळें आधींच लेखिका या नात्यानें मिळालेल्या प्रसिद्धिला जोड मिळू लागली. वर्तमानपत्रातून तिचें नांव वारंवार चमकू लागले

त्यावेळीं नागपूरांत हिंदुधर्मावर व्याख्यानें देत एक संन्यासी आला होता भारतीय तत्त्वज्ञानावर त्याची व्याख्यानमालिका नागपुरांत सुरू झाली होती. योगायोगानें ह्या व्याख्यानमालेसाठी यमुनेचीच अध्यक्षस्थानीं योजना झाली होती व्याख्यानमाला चांगली पधरा दिवस सुरू राहिल्यामुळें अध्यक्ष या नात्यानें दररोज तिला या सभेला हजर रहावें लागत असे

त्या संन्याशाचा आणि तिचा अर्थातच परिचय घडून आला. यमुनेचा दादाही त्या संन्याशाच्या विद्वत्तेवर भाळून गेला होता. आपल्याच घरीं रहाण्याचा त्यानें त्याला आग्रह केला आणि तोही येऊन राहिला. त्या संन्याशाचीं व्याख्यानें हिंदींतून होत असत. त्याला मराठी भाषाही थोडी येत होती मराठी जाणणाऱ्या माणसाशीं बोलतांना मराठींतच बोलायचा आपल्याकडून तो शक्य तितका प्रयत्न करी. यमुनेच्या दादाच्या घरीं येऊन राहिल्यापासून शक्य तितकें मराठींतच बोलायचें असा त्यानें निश्चय केला. यमुना त्याला मराठी शिकवूं लागली

थोड्या मुक्कामासाठीं आलेला संन्यासी नागपूरचाच रहिवासी होणार कीं काय असें वाटूं लागलें. तो निघून जावा असें दादालाही वाटत नव्हतें. दादा अगदीं त्याच्या भजनीं लागला होता

तत्त्वज्ञानाची यमुनेला मुळींच आवड नव्हती—किंबहुना तिटकाराच होता. तत्त्वज्ञानाविषयक चर्चा चालूं लागली म्हणजे ती बहुधा त्यांत तोंड घालीत नसे.

दादाला त्याचें आश्चर्य वाटे. तो म्हणे. "आपल्या भाच्यानें एवढा मोठा विद्वान

साधू आपल्या घरीं आला आहे तुझं हें अस कोसळलेलं आयुष्य, तत्त्वज्ञानाचा थोडासा अभ्यास केलास, त्यांत मन रमल, तर अंत करणाला तेवढीच शांति मिळेल "

तो सन्यासीही तसेच म्हणे पण यमुनेला तें केव्हांच पटलें नाही. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासानें माणूस घमेंडखोर बनतो असा तिचा समज होता.

तत्त्वज्ञानाची किती तरी पुस्तकें त्या साधूच्या संग्रहाला होती. त्याने एके दिवशीं त्यांतील काहीं पुस्तकें नजरेखालून घालण्याची यमुनेला विनवणी केली, तेव्हां ती म्हणाली, " या वेदातामुळ आमच्या हिंदुस्तानच्र जेवढं नुकसान झालं आहे, तितक ब्रिटिशांनीसुद्धां केल नाहीं कशाला पाहिजे हें समाधान ? समाधानामुळें माणूस कर्तृत्वशून्य बनतो जितक असमाधान वाढेल, तितकी कर्तबगारी वाढत जाते असमाधानामुळें—असंतुष्टतेमुळे—जसजसी मनाची तळमळ वाढते, तसतशी दृष्टीची व्यापकताही फांकत जाते. नवी कामें दिसू लागतात. नवीं कर्तव्यें उत्पन्न होऊ लागतात— नाविन्याची आई म्हणजेच असंतुष्टता—"

तिच्या त्या उद्गारांचा त्या साधूच्या मनावर परिणाम झाला. तो म्हणाला, " खरं आहे, यमुनादेवी. असा एक काळ होता, की ज्यावेळी माझ्या मनांत असमाधान वाढलं होत त्या असमाधानाच्या परिपूर्तीसाठी मी वेदाताचा आश्रय केला मला वाटल, मला समाधान मिळाल. मी सबध हिंदुस्तान हिंडलो. तिबेटांतून प्रवास करतांना मोठमोठ्या बुद्ध भिक्षूंची आणि माझी गांठ पडली बुद्धाच्या शिकवणीचा माझ्या मनावर बराच परिणाम झाला मी चीनांत गेलों, जपानांत गेलों, तिथून अमेरिकेचाही प्रवास केला सर्वत्र उपदेश करीत हिंडलों माझ्या जिवाला जें स्वास्थ्य मिळालं होतं, त्याचा फायदा माझ्या जगांतील भाऊबंदाना देऊ लागलों. माझ्या उपदेशामुळं मोठे कर्तबगार व्यापारी आपला धंदा टाकून घरीं बसून ईश्वरचिंतनांत निमग्न होऊं लागले. मला वाटलं, माझ्या उपदेशाचा हा जय झाला आज मला असा प्रश्न पडतो आहे, हा माझा जय झाला कीं माझ्याकरवीं पाप झालं ! "

यमुनेनें त्याची सर्व हकीकत ऐकून घेतली आपण कोण, कुठला आणि पूर्वी काय करीत होतों, याचा मात्र त्यानें थांगपत्ता लागूं दिला नाहीं

तो जी आपली हकीकत सांगत होता ती प्रवासाची प्रवासांतील अनुभवांची.

यमुनेनें आपलीं पुस्तकें त्याला वाचायला दिलीं. तेही असंतुष्ट जिवाच्चेच

उद्गार होते 'सॉरोज ऑफ वेरतेर' या जर्मन पुस्तकाच्या धर्तीवरच एका असंतुष्ट जीवानें आपल्या मनाच्या तळमळीचा लिहिलेला तो इतिहास होता त्या इतिहासातून त्या असंतुष्ट जीवाला जो नवीन प्रकाश दिसला—परंपरेच्या जुलूम-शाहीमुळें भारतवर्षांत सर्वत्र प्रसृत झालेल्या गुलामगिरीच्या वृत्तीचा नायनाट करण्याचा जो मार्ग दिसला, त्याचे जे उद्गार त्या प्रथात दिसले ते वाचून त्या संन्याशाच्या अंत करणाला चटका लागला निष्क्रियतेचा त्याला तिटकारा आला वेदांताची परिभाषा त्याला कर्णकटु वाटू लागली

हळुहळू त्याच्या व्याख्यानांत यमुनेच्या पुस्तकांतील विचारांचेंच प्रतिबिंब पडू लागलें.

ते पाहून यमुना चमकली

गुरुस्थानाच्या उच्चासनावरून खाली उतरून तो यमुनेचा शिष्य म्हणून मिरवायला तयार झाला. त्या सान्निध्याच्या जिव्हाळ्यामुळें यमुनेच्या जिव्हेवर स्फूर्ति नाचू लागली त्याच्या प्रश्नामुळें तिला नवे नवे विचार सुचू लागले. तिच्या उत्तरांमुळें त्याचें समाधान होऊ लागलें

तासाचे तास तो तिच्या सहवासांत घालवीत असे हें पाहून यमुनेची भावजय अस्वस्थ होऊ लागली तिनें आपल्या नवऱ्याकडे तक्रार केली.

त्या सन्याशाच्या वृत्तींत बदल झालेला पाहून यमुनेचा दादा देखील अस्वस्थ होऊ लागला होता बायकोच्या तक्रारीमुळें त्याची अस्वस्थता दुणावली.

एके दिवशीं त्यानें त्या साधूला प्रश्न केला, "आपला मुक्काम आणखी किती दिवस इथं होणार आहे ?"

"तुम्ही घालवून देईपर्यंत" साधू म्हणाला "साऱ्या जगावर मी परिभ्रमण केल. पण ज्या समाधानाच्या शोधार्थ मी हिंडत होतों तें समाधान मला इथं मिळाल. लोक मला गुरुस्थानीं मानीत होते—मलाही वाटत होतं कीं उपदेश करण्याचं सामर्थ्य माझ्या अंगीं आल आहे—पण तुमच्या बहिणीनं माझा गर्व नाहींसा केला मी तिचा शिष्य बनलों. संसार असार आहे असा डांगोरा पिटीत जगावर फिरणारा मी, त्या मला आतां संसार हेंच सर्वस्व आहे असं वाटूं लागलं—"

दादाच्या उरांत धडकी भरली.

यमुनेला वाटलें, इतक्या दिवसांच्या आपल्या तपश्चर्येचें सार्थक झालें. एका

संन्याशाला संसारी बनविण्याचें जरी नाहीं तरी संसाराकडे लोभनीय दृष्टीनें पहाण्याची प्रवृत्ति झाली हें काय थोडे झालें !

एके दिवशीं त्या साधूनें आपल्या दाढीमिशा काढून टाकल्या कफनी फेंकून दिली. संसारी माणसांप्रमाणें तो धोतर–सदरा घालून आलेला पहातांच यमुनेला आनंद झाला

दादाच्या पायाची तिडीक मस्तकाला गेली.

साऱ्या नागपूरांत या एकाच गोष्टीची चर्चा चालली होती प्रत्येकजण आपआपल्या परीनें या प्रसंगाला निरनिराळे डूब देत होता

कुत्साकुमारीचे ते प्रलाप दादाच्या कानीं येत होते त्यानें मनाचा निश्चय केला, कीं या माणसाला आतां आपल्या घरातून घालवून द्यायचें

त्यानें सरळसरळच यमुनेला प्रश्न केला. पण त्या प्रश्नाचें उत्तर ती काय देणार होती ! ती एक विवाहित स्त्री होती सवाष्ण होती. आपण सवाष्ण आहों कीं विधवा आहों, हें तिला सागतां आलें नसतें.

त्याच्या भक्तीनें तिचें अंत.करण द्रवू लागलें. तिचें मन त्याच्याकडे ओढूं लागलें.

तो अगदी उतावीळ झाला होता. पण त्याला उपाय काय होता ? ती विधवा असती तर तिनें त्याच्याशीं पुनर्विवाह केला असता इतकी तिच्या मनाची तयारी झाली असती पण तिच्या सासारिक स्थितीचा पेंच बिकट होता

ती हिंदु होती—चागली प्रौढ होती—नुकतीच चाळीशी उलटलेली होती.

तिनें विचार केला, तारुण्याच्या ऐन अमदानीचा काळ वैधव्यात काढला. वार्धक्याच्या सीमेवर उभें राहिल्यावर काय आतां संसारांत पडायचें ? आणि तें तरी कुठें साध्य आहे ?

कित्येक दिवसपर्यंत तीं उभयतां या बिकट परिस्थितींतून मार्ग कसा काढावा याचा विचार करीत. तिला जगाची पर्वा वाटत नव्हती. त्यालाही जगाची पर्वा वाटत नव्हती. ती म्हणाली, “ जग कांही का म्हणेना ! मला काय करायचं आहे जगाशीं ? हिंदूंच्या संसारावर मी जन्मभर विचार केला. जे जे विचार आले ते ते

मी लिहून जगापुढें मांडले परंपरेचीं सामाजिक बंधनें खोटीं आहेत, स्वाभाविक जीवन हेंच खरं अध्यात्म, असं मी मुक्तकंठानं जगाला सांगतें आहे. आतां मीं कुणाची कशाला पर्वा करूं ?"

यमुनेच्या दादाला त्या दिवशी धक्का बसला

एके दिवशीं कुणालाही न विचारतां तीं दोघेंही निघून गेलीं होतीं

मोठमोठथा हेड–लाईन्स घालून वर्तमानपत्रांनीं ती हकीकत जगजाहीर केली
'लेखिकेला घेऊन एक प्रख्यात साधू पळला दोघाचाही पत्ता नाहीं.'

नवनीतीच्या फैलावामुळें हिंदुसमाजांतील मोठमोठथा माणसांचा कसा अध:पात होत आहे याची चर्चा पुराणवादी वर्तमानपत्रांनीं मनमुरादपणें केली.

नवमतवादी लेखकांनीं त्या अविवाहित वधूवरांना आशिर्वाद दिला.

यमुनेच्या दादाला पुन्हां दुसरा धक्का बसला. तिच्या सासरहून पत्र आलें होतें.

'आमचे बंधू दिनकरराव आपल्या पत्नीसह इतक्या वर्षांनीं आज सुखरूप घरीं येऊन पोहोंचले.'

# प्रेमाचा बळी !

तो एक भोळा जीव होता.

कौटुंबिक परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें त्याचें शिक्षण फारसें झालें नव्हतें. एक दोन वर्षें त्यानें इंग्रजी शाळेंत काढलीं होतीं खरी पण इंग्रजीवर व्यासंग करण्याइतकें इंग्रजीचें ज्ञान त्याला झाले नव्हतें.

वाङ्मयाचा तो मोठा भोक्ता होता मिळालेले पुस्तक एकदां वाचून टाकल्या-शिवाय जेवायचें नाहीं, अशी त्याची प्रतिज्ञा असे--मग तें पुस्तक कोणत्याही विषयावरचें असो त्यामुळें मराठी भाषेंतील वाङ्मयाचें वाचन त्याच्याकडून भरपूर होत होतें बहुश्रुतपणा त्याच्या अगीं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत आला होता

तो स्वत फारसा बुद्धिवान नव्हता पण वाचलेल्या पुस्तकातील वाक्येंच्या वाक्यें मुखोद्गत झाल्यामुळें आणि दररोजच्या भाषणांत ती वापरण्याचा सराव केल्यामुळें तो विद्वान आहे असा लोकाचा गैरसमज होई

प्रत्येक जण त्याची तारीफ करी त्याचा परिणाम असा झाला, कीं आपण विद्वान आहों असें खरोखरच त्याला वाटू लागलें

घरचा तो मोठासा श्रीमंत नव्हता. उदरनिर्वाहासाठीं कांही तरी धंदा करणें त्याला भाग होतें.

कोणता धंदा करावा हें त्याला कांहीं सुचेना कोणतीच परीक्षा पास झालेली नसल्यामुळें नोकरीचे प्रयत्न सारे फुकट गेले धंदा करावा म्हटलें तर भाडवल नव्हतें आणि कुटुंबांत जी चार माणसें होतीं त्यांचा उदरनिर्वाह सर्वस्वी त्याच्यावर अवलंबून होता

तो वेडापिसा झाला. आपल्या भाग्यांत काय आहे हें समजून घेण्यासाठीं तो ज्योतिष्यांचे उंबरठे झिजवूं लागला. प्रत्येक ज्योतिषी त्याच्या भाग्याचीं फळें

इतक्या भिन्न प्रकारानें वर्तवीत असे, कीं आपण एक आहों कीं अनेक आहों याची त्याला हळुहळू भ्रांत पडूं लागली.

ज्योतिषी लोकांवरचा त्याचा विश्वास उडाला. पण ज्योतिषी झाल्यावर ती त्याची श्रद्धा मात्र वाढूं लागली त्याला वाटे ज्योतिषशास्त्र खरें आहे. पण ज्योतिषीच निर्बुद्ध आहेत

ज्योतिषाचा अभ्यास करायला त्यानें सुरवात केली ज्योतिषी लोकांवरचा विश्वास उडाल्यामुळे ज्योतिषशास्त्राकडे पहाण्याची त्याची दृष्टि इतर ज्योतिष्यांपेक्षां वेगळी झाली शास्त्रांचीं जेवढीं प्रमाणें आहेत तेवढ्याच प्रमाणांवर अवलंबून रहायचें, आपलें स्वत:चें डोकें चालवायचें नाहीं असा निश्चय करून तो भविष्यें वर्तवूं लागला. ज्योतिषी म्हणून हळुहळू त्याची प्रख्याति होऊं लागली धंदेवाईकपणा त्याच्या अंगीं मुरला नव्हता. ज्योतिषी लोक ज्योतिषशास्त्राच्या नियमाला धरून न रहातां भविष्यें वर्तवितात आणि त्यामुळेंच हास्यास्पद होतात हें अनुभवानें पटत असल्यामुळें इतरांचीं भविष्यें वर्तवितांना तो फार काळजी घेऊ लागला.

पहिल्या पहिल्यानें त्याचीं भविष्यें तंतोतंत उतरूं लागलीं. लोकांची त्याच्यावर श्रद्धा बसत चालली.

यशाचा कैफ त्याला पचवितां आला नाहीं लोकप्रियतेची दारू त्याच्या मेंदूवर अंमल करूं लागली. आणि हळुहळू इतर ज्योतिष्यांच्या बौद्धिक हातचलाखीचा तोही अवलंब करूं लागला.

कांहीं दिवसपर्यंत तेंही पचत गेलें. घरीं आई म्हातारी होती—भावंडें लहान होतीं तोंपर्यंत असलेल्या वतनवाडीवर त्याचा कसाबसा चरितार्थ चालत होता. भावंडें मोठीं होऊं लागली. त्यांचा खर्च वाढूं लागला. नोकरी कुठें मिळेना. तेव्हां इच्छा नसतांही ज्योतिष्याचा धंदा करणें त्याला भाग आलें.

धंद्याची सुरवात केल्याबरोबर धंद्यांतील वैगुण्येंही वाढत चालली. पण कीर्ति मात्र कमी होत नव्हती. हळुहळू पैसाही मिळू लागला होता.

म्हातारी आई मरून गेली तेव्हां त्याला घर असें पडल्यासारखें वाटूं लागलें. स्वतः चूल फुंकायचें काम दिवसेंदिवस त्याला जास्त कठीण होत चाललें.

घरीं चार मोठीं माणसें येणार—त्यांना चार दोन कप चहा द्यायचा म्हणजे बाहेर तसेंच तिष्ठत बसवायचें आणि आपण आंत जाऊन चूल फुंकायची हा

प्रसंग त्याला दुर्घट वाटूं लागला. घरीं एखादा स्वयंपाकी ठेवण्याइतकी मिळकतही होत नव्हती

लग्न करावें असें त्याच्या मनांत येत असे पण त्याला कुणीच मुलगी सांगून येत नव्हती शहराबाहेरची वस्ती असल्यामुळें इस्टेट, वतनवाडी, नोकरी असल्याशिवाय कोण आपली मुलगी सांगून येणार !

लग्न जुळविण्यासाठीं मुलींच्या कुंडल्या दाखवायला लोक ज्यावेळीं त्याच्याकडे येत असत त्यावेळीं त्याचें हृदय दाटून येई ही संधि आपल्याला केव्हां येणार ? दुसऱ्यांचीं लग्नें आपण जुळवतों—किंवा मोडतों त्याप्रमाणें आपलें लग्न कों जुळणार ?

त्याला वाटलें, दुसऱ्यांचीं लग्नें मोडण्याचें जें पाप आपल्या हातून घडतें आहे त्यामुळें तर असें होत नसेल ? इतर फलादेशाच्या बाबतींत जरी तो आपली वैयक्तिक बुद्धि चालवीत असे, तरी लग्नाच्या कुंडल्या आल्या म्हणजे अगदीं निर्धारानें शास्त्रावर बोट ठेवून राही. त्याला वाटे जन्माच्या गांठी आहेत, संसार मोडायचा आहे किंवा जोडायचा आहे, दोन जीवाचें भवितव्य सर्वस्वी आपल्या शब्दावर अवलंबून आहे; अशा वेळीं आपण प्रामाणिक राहिलें पाहिजे.

पण जसजशा जास्त जास्त कुंडल्या लग्न जुळवण्यासाठीं त्याच्याकडे येऊं लागल्या—तसतसा तो बेभान होत जाऊं लागला. लग्नाच्या अभावीं आपण तळमळत पडावे आणि दुसऱ्या वेलीवृक्षाच्या गांठी आपल्या हातून बांधल्या जाव्या या दैवदुर्विपाकाचें त्याला आश्चर्य वाटत असे

एके दिवशीं तो आपली कुंडली मांडून बसला आपल्या सप्तम स्थानाचें भवितव्य काय आहे हें पहाण्याचा त्यानें निश्चय केला. चूक होऊं नये म्हणून स्पष्ट ग्रह करून घेण्यासाठीं आकडेमोडी करतांना त्यानें यत्किंचितही चूक न होण्याची खबरदारी घेतली

स्पष्ट ग्रह तयार झाले. त्या त्या वर्षाच्या त्या त्या महिन्याच्या कुंडल्या तयार झाल्या आणि फलादेश पहाण्यासाठीं तो त्याच्यावर नजर फिरवूं लागला. त्यावेळीं त्याच्या काळजांत धस्स झालें !

त्यानें सर्व कुंडल्या फाडून टाकल्या. स्वत:चें भविष्य यथातथ्य स्वरूपांत जाणून घेण्याची त्याला भीति वाटली. केलेली मेहेनत फुकट गेली—वेळ फुकट

गेली---एका दमडीचीही प्राप्ति झाली नाही याचे त्याला कांहीं वाटलें नाहीं

त्याला वाटले आपण बचावलों कांहीतरी वाईट फलादेश कळण्यापेक्षां मुळीच भविष्य न कळलेलें बरें !

त्याच्यासमोर प्रश्न उभा राहिला. आपल्याकडे येणाऱ्या गिऱ्हाईकांना अशाच प्रकारे समाधान देण्याचा प्रयत्न आपण कधीं केला होता का ?

स्वतःशींच तो हंसला. असें केले तर धंदा कसा चालेल ! जे गिऱ्हाईक येतें त्याचें समाधान झालें नाहीं—मग तें आनंद वाटल्यामुळें असो किंवा भीति वाटल्यामुळें असो—तर भविष्याचा पुरुषार्थ तो काय राहिला ?

त्याचा धंदा सुरळीतपणें चालला होता पण मन मात्र दिवसेंदिवस जास्त जास्त अस्वस्थ होत होतें कुणीच त्याच्या लग्नाची गोष्ट काढीत नव्हतें कुणी थट्टेनें विचारलें तर तो म्हणत असे, "वैद्य दुसऱ्याला औषध देतो पण स्वतः आजारी पडला तर त्याला दुसरा वैद्य आणावा लागतो तसंच आम्हां ज्योतिष्याचं आहे" 'स्वतःचें भविष्य स्वत पाहू नये तर दुसऱ्याला आपली कुंडली कां दाखवीत नाही ?' असें कुणी विचारलें तर तो म्हणे, "माझा ईश्वरावर भरवसा आहे—दैवावर भरंवसा आहे जें दैवीं असेल ते झाल्याविना टळणार नाही ! ज्यांचा ईश्वरावर भरंवसा नाहीं—प्रारब्धाच्या फटक्यांनी ज्याच्या डोळ्यांसमोर अंधेरी येते ते ज्योतिष्याकडे धाव घेतात हे शास्त्र अशा लोकांसाठीं आहे भविष्यकाळांत खांचखळगे कुठें आहेत ते अशा लोकाना दाखवून द्यायचे आणि तिथें सावध रहाण्याविषयीं बजावायचें, हें आम्हा ज्योतिष्यांचें काम आहे, आणि तेच मी बजावीत असतों दुसऱ्यांची सेवा करताना—दुसऱ्यांना योग्य मार्ग दाखवितांना स्वतःच्या सुखदुःखाची चाड बाळगीत जर मी राहिलों तर मी पत्करलेलें सेवा-धर्माचें व्रत माझ्या हातून पार पडणार नाहीं"

तो असें उत्तर देत असे. पण तें उत्तर दिल्यावर त्याला प्रश्न पडे, कीं आपण प्रामाणिक आहोंत का ? अंतरांतून कुणीतरी सांगे, कीं वेड्या, दांभिकपणा करतो आहेस तो अंतरींचा सवाल ऐकून तो घाबरून जात असे. स्वतःचें भविष्य जाणण्यासाठीं त्याचें मन उतावीळ होत असे.

पण स्वतःचें भविष्य जाणण्याची त्याला भीति वाटत होती. ती भीति दिवसेंदिवस इतकी प्रबळ होत चालली, कीं स्वतःच्या कुंडलीकडे नजर टाकणेंही

त्याला अशक्यप्राय होऊन बसलें. त्याने आपली कुंडली सगळ्या बाडांच्या तळाला घालून टाकली

आपलें भविष्य अशा प्रकारें पायतळीं घालून प्रारब्धाबरोबर झगडण्याचा त्यानें निश्चय केला

एके दिवशीं एका गृहस्थानें त्याला रस्त्यांतच गांठलें आणि मुलगी पहाण्यासाठीं येण्याचा आग्रह केला

तो आश्चर्यचकित झाला. इतक्या अनपेक्षित रीतीनें ही गोष्ट घडून येईल असें त्याला वाटलें नव्हतें मुलगी पहायला तर जायचें आणि काळवेळ पाहिलेला नाहीं. यामुळें त्याचें मन त्याला खाऊं लागलें त्यानें अंदाजानें होरा पाहिला. तो शुक्राचा होरा होता त्याला वाटलें लग्नाच्या कामाला हा होरा बरा आहे

मुलगी चांगली सुशिक्षित होती इंग्रजी सहावींत होती. आणि कांहींना कांहीं तरी करून मॅट्रिक व्हायचें असा तिचा निश्चय होता

पहाण्याचे मामुली प्रकार झाल्यानंतर त्यानें मुलीच्या बापाजवळ कुंडली मागितली मुलीचा बाप ज्योतिषाचा मोठा द्वेष्टा होता. त्याच्या घरीं कांहीं कुंडल्या होत्या. पण कुठल्याच ज्योतिष्याचें भविष्य पटत नाहीं असें दिसून आल्यामुळें त्यानें त्या एके दिवशी जाळून टाकल्या होत्या

तो मनांत चरकला. ज्योतिषाचा द्वेष करणारा माणूस आपली मुलगी पहाण्यासाठीं आपल्यासारख्या एका ज्योतिष्यालाच बोलावतो कसा याचें त्याला आश्चर्य वाटलें तो म्हणाला, "कुडली नाही असं कसं झाल? आपल्या हिंदु लोकांत मूल जन्माला आलं, कीं त्याची कुंडली मांडली जात नाहीं असं क्वचितच होतं. निरक्षर कुणबी लोक सुद्धां नुसती साधी कुंडली तरी तयार करून घेतात."

मुलीच्या बापाने उत्तर दिले, "कुडल्यांवर माझा विश्वास नाहीं—ज्योतिषावर माझा विश्वास नाहीं, आणि ज्योतिषी लोकांवर मुळींच नाही. तुम्ही ज्योतिषी आहांत, तरी मी माझी मुलगी तुम्हांला देऊं करतों आहे तो एक गृहस्थ माणूस म्हणून. ज्योतिषी म्हणून नव्हे. मला कुंडल्या जुळवायच्या नाहीत. मला लग्न जुळवायचं!—'

एका अर्थी त्याला बरें वाटलें. मुलीची कुंडली पहायची म्हणजे आपलीही

कुंडली दाखविली पाहीजे होती. त्याने विचार केला, ' दैवीं असेल तसें होईल ! आजवर कुणी चौकशीसुद्धां करीत नव्हता. आज पहिल्यानेंच हा दाराशीं चालून आला तिथें कुंडलीची उगीच भानगड कशाला ? '

त्यानें मुलगी पसंत असल्याचें सांगितलें देवघेवीच्या अटी विचारतां त्यानें कांहींच नसल्याचें सांगतांच मुलीच्या बापाला आनंद झाला. पण मुलगी मोठी खट्याळ होती आणि त्याचा धंदा तिला पसंत नव्हता. त्यांतून स्वारी दिसायलाही फारशी कुणाच्या डोळ्यांत भरण्यासारखी नव्हती मुलीनें स्वच्छ सांगितलें,

" मला हा माणूस पसंत नाहीं. त्याला धड इंग्रजीसुद्धां येत नाहीं. मी आतां मॅट्रिक होणार म्हणतें. कॉलेजांत जावं अशी देखील माझी महत्त्वाकांक्षा आहे या माणसाबरोबर माझं कसं जमणार ? "

बापालाही तें पटलें.

तो बिचारा वाट पहात राहिला होता तिथिनिश्चयासाठीं मुलीचा बाप कांहीं आला नाहीं वाट पाहून पाहून तो दमला—अति निराश झाला.

त्या निराशेच्या भरांत ज्योतिषाचा आसरा शोधण्याखेरीज दुसरा उपाय नव्हता. पुस्तकांच्या आणि कुंडल्यांच्या बाडाच्या तळाखालीं घातलेली स्वतःची कुंडली त्यानें बाहेर काढली

आपल्या कुंडलीकडे पहाण्याची त्याची नजर आतां बदलली होती. ज्योतिषाचा अभ्यास करायला त्यानें ज्यावेळीं सुरवात केली त्यावेळीं ज्या नजरेनें आपली कुंडली तो पहात होता ती नजर आतां राहिली नव्हती. कोणतीही कुंडली पहातांना जी त्याची धंदेवाईक दृष्टि असे त्याच दृष्टीनें तो आपली कुंडली पाहूं लागला. फारसें खोलांत जायचें नाहीं असा विचार करून त्यानें आपल्या कुंडलीवर उडती नजर फेंकली त्याला वाटलें, आपल्याला प्रेमयोग आहे.

त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला अशक्य असें कांहींच नव्हतें. ज्योतिषी या नात्यानें त्याची फार प्रख्याति झाली होती. सर्वांच्या तोंडीं त्याचें नांव झालें होतें. मोठमोठे जाडजूड ग्रंथकार एम्. ए. च्या परीक्षेला लागण्याची लायकी असलेल्या पुस्तकांतून सध्या त्याचा नामोच्चार करीत होते ! त्याला वाटलें, इतकी प्रख्याति मिळविलेल्या विभूतीवर कोणती मुलगी भाळणार नाहीं

त्याची खात्री झाली प्रेमयोग असणें अशक्य नाही आणि म्हणूनच ते लग्न मोडलें. झालें तें बरें झालें एकंदरींत नशिबाचा जोर विलक्षण असतो खरा!

'प्रेम' या शब्दाचा जिथें जिथें उल्लेख सांपडेल असें प्रत्येक पुस्तक आणून तो वाचूं लागला प्रेमविषयक कादंबऱ्या लिहिण्यांत ज्या ज्या लेखकांची प्रख्याति होती त्या त्या लेखकांची प्रत्येक कादंबरी आणून त्यानें ती वाचली. फलादेश वर्तविल्यामुळे ज्योतिष्यावर प्रेम जडल्याचें एकादें उदाहरणही त्याला त्या पुस्तकांत आढळून आलें नाही

सौंदर्याला मुली भाळल्या जातात पराक्रमाला भाळल्या जातात. शरीरयष्टीवर बेहद्द खूष झालेल्या मुलींची उदाहरणें होतीं राजकीय चळवळींत पडून तुरुंगात गेल्यामुळें कित्येकांच्या गळीं अशा मुली पडल्या होत्या बडी नोकरी आणि बडी श्रीमंती ही तर अनादि कालापासून मुलींना आमिषासमान होऊन राहिलीं होतीं पण ज्योतिष्याच्या फलादेशाचें उदाहरण सांपडना त्याला वाटलें, पूर्वी नव्हतें ते यापुढें होणार नाही असें कसें म्हणावें? आगगाडी पूर्वी कुठे होती? फोनोग्राफ कुठें होता? रेडिओसारखे शोध आतांच ना अस्तित्वात आले? विमानांच्या आणि वैमानिकांच्या गोष्टी कांही वर्षांपूर्वी दंतकथा नव्हत्या का वाटत? विमानें आणि रेडिओ यांच्याप्रमाणे ज्योतिषाचा फैलावही अलिकडे अलिकडेच झाला आहे ना? मग ह्या परंपरेची सुरवात करण्याचा अग्रमान आपल्यालाच मिळणार नसेल कशावरून?

त्यानें आपली कुंडली पुन्हां पुन्हां पडताळून पहाण्यास सुरवात केली ती कुंडली आपली आहे ही आठवण तो विसरून गेला होता. त्याला वाटलें, कुणीतरी कुंडली आपल्याला दाखवायला आणली आहे, आणि आपल्याला प्रेमयोग आहे कीं नाहीं असें तो विचारीत आहे आपण त्याला उत्तर देत आहों, 'या कुंडलीचे ग्रह पहातां हा माणूस असामान्य असला पाहिजे. लहानपणी आपल्या आयुष्यांत जरी यानें कष्ट भोगले असले—आजही त्याचा उदरनिर्वाह मोठ्याशा समाधानानें होत नसला, तरीही हा माणूस असामान्य कीर्ति मिळवीत असला पाहिजे. कीर्ति आणि संपत्ति एका जागीं असतातच असें नाहीं कीर्तीचा भरपूर पुरवठा याच्या नशिबीं आहे. हा स्वतः फारसा शिकलेला नसला, तरी मोठमोठे विद्वान आणि धनवान याच्या पायावर लोळण घेतील असा याला योग आहे. याच्या नांवावर वाङ्मयाच्या व्यवहारांत भयंकर उलथापालथी होतील आणि कित्येक

प्रकाशकांची दिवाळीही वाजतील. कित्येकांची अब्रु जाईल. कित्येक अब्रुदार बनतील. पण याला मोठा जो योग आहे तो प्रेमविवाह. कुणीतरी तरुणी त्याच्या गुणावर लुब्ध होऊन त्याच्याशीं लग्न करण्यासाठीं धांऊन येईल. त्यानें नाही म्हटलें तर ती आत्महत्या करायला तयार होईल असे त्याचे विलक्षण ग्रहयोग आहेत.'

तो फलादेश पाहून त्याला आनद वाटला त्याकडे येणारी गिऱ्हाइकी अशीच आनदून जात होती, याची त्याला आठवण झाली. कोणालाही नाराज करायचें नाही अशी त्याची वृत्ति होती मग तो स्वतःलाही कां वगळील ?'

एके दिवशी एका सद्‌गृहस्थांच्या घरीं एका मुलीची कुडली पहाण्यासाठीं त्याला आग्रह करकरून नेण्यात आलें ज्योतिषी या नात्यानें सरसहा तो दुसऱ्या कुणाच्याही घरी जात नसे कुणी झाले तरी आपल्याच घरी आलें पाहिजे, असें त्याचे ब्रीद होतें पण कुंडली मुलीची आहे आणि लग्नासाठीं पहायची आहे असें कळल्यानें त्याचें प्रेमी मन विरघळले आणि त्यानें आपला शिरस्ता मोडला

मुलीची कुडली त्यानें पाहिली आणि धदेवाईक ज्योतिष्याला शोभण्याजोगे सर्व फलादेश त्यानें वर्तविले मुलीचें लग्न याच महिन्यांत होईल असें भविष्य वर्तावितांना 'ग्रहा' पेक्षा त्याने 'गृहा'कडेच पाहिले होतें! मुलीच्या आईचा चेहरा आनदाने प्रफुल्लित झालेला पाहून त्यालाहा समाधान वाटलें तो घरीं आला आणि ती गोष्ट विसरून गेला किती तरी मुलींच्या कुंडल्या पहाण्याचे ते दिवस होते मुहूर्त ठरविण्यासाठीं देखील किती तरी मुलांमुलींच्या कुडल्या त्यावेळीं त्याच्या नजरेसमोरून जात होत्या. चार पैसे मिळण्याचे ते दिवस होते. अशा वेळी कोणा तरी एका सामान्य मुलीची कुंडली त्याच्या आठवणीच्या पडद्यावर आपला ठसा उमटवू शकली नसती

ती कुंडली पाहिल्याला ज्या दिवशीं एक आठवडा झाला त्या दिवशीं त्या मुलीची आई त्याच्या घरीं आली तिला पहातांच त्याला धक्का बसला.

त्या बाईचे डोळे आसवांनी डंवरले होते—चेहऱ्यावर करुणरस मूर्तिमत फांकून राहिला होता ती जी आली, ती ज्योतिषीबुवाचे पाय धरून रडूं लागली.

तो बावरला काय प्रश्न करावा हें त्याला सुचेना एक पोक्त बाई आपले पाय

धरून हुंदके हें देऊन रडत आहे, हें पाहून त्याचें कोवळें अंतःकरण द्रवलें

ती बाई म्हणाली, "मला दुर्बुद्धि झाली आणि कुंडली दाखविण्यासाठीं मी तुम्हांला आपल्या घरीं घेऊन गेलें !"

तो आधींच घाबरला. आपण काय भविष्य वर्तविलें होते याची आठवण करूं लागला त्याच्या आठवणीप्रमाणें कोणत्याही प्रकारचा भयकर फलादेश त्यानें सांगितला नव्हता.

ती बाई म्हणाली, "त्या दिवसापासून तिनें हाय घेतली आहे"

"कुणीं ?"

"माझ्या मुलीन ! दाराआडून तिनं तुम्हांला पाह्यल ! मोठी सालस आहे बिचारी. कधीं कुणाच्या नजरेसमोरसुद्धां उभी रहात नाहीं तुम्ही तिचं भविष्य वर्तवीत होतां. ती दाराआडून ऐकत होती तुम्ही सांगितलत, 'तिला चांगला नवरा मिळेल, प्रख्यात मिळेल' तेंच मनात घेतलं तिनं. आणखी कोण प्रख्यात ? तुमच्यासेरीज सर्वत्र प्रख्याति झालेला असा दुसरा कोण ?"

त्याच्या हृदयांत कालवाकालव सुरू झाली.

ती बाई पुन्हां बोलूं लागली "तिनं आपल्याला मनानं वरल आहे. आतां इतरांशीं विवाह होण म्हणजे व्यभिचार करणं असं ती शपथ घेऊन म्हणते आहे ! पहिले दोन तीन दिवस तिनं रडून काढले. त्यापुढ अन्न टाकल. आज तीन दिवस झाले. पाण्याला सुद्धां तिनं स्पर्श केला नाहीं तुमच्या प्रेमान अगदीं वेडी झाली आहे—"

'प्रेमानं' हा शब्द ऐकतांच त्याच्या सर्वांगांत वीज झणकली. तो आपल्याशींच म्हणाला, 'आहे—आहे. मला प्रेमयोग आहे. आतां तिचा सूड उगविला जाईल ! अशिक्षित म्हणून मला तिनं झिडकारलं म्हणतात ! तिच्या नाकावर चांगलीं मिरीं वांटलीं जातील !'

काकुळतीला येऊन ती बाई रडूं लागली. याच क्षणाला साखरपुडा केला नाहीं तर मुलगी जगणार नाहीं असें साऱ्या कुलदेवतांची शपथ घेऊन जेव्हां तिनें सांगितलें, त्यावेळीं आपण होऊन चालत तो त्यांच्या घरीं गेला.

दोन्ही पत्रिका जुळवून पहाण्याचें भान त्याला राहिलें नाहीं.

साखरपुडा झाला त्यावेळीं जरीची शाल सर्वांगाला लपेटून मुलीला समोर

बसविण्यात आलें होतें सहा दिवसांची उपाशी मुलगी धनुकली झाल्यासारखी कशी नाही दिसणार? प्रेमाच्या कल्पनेने त्याचें अंग शहारून निघालें. त्याला वाटलें, 'काय हें अलोट प्रेम ! आणखी एक दोन दिवस उपास केला असता तर बिचारी मरूनसुद्धां गेली असती ! अशा मुलीचं पाणिग्रहण करायचं नाही तर काय चढेल आणि खट्याळ अशा शाळा-कॉलेजातल्या पोरींच?'

तिथिनिश्चय झाला लग्नपत्रिका वाटण्यांत आल्या.

लग्नमंडपात मित्रांची गर्दी झाली

मंगलाष्टकें म्हणण्यांत आलीं अंतरपट दूर झाला त्यानें पाहिले. त्याला वाटले, अजून बिचारीची प्रकृति सुधारली नाहीं

सप्तपदीच्या वेळी ती लंगडत होती. त्याला वाटलें, उपास करीत असतांना बिचारीला कुठें तरी ठेंच लागली असेल !

सर्वांनीं शुभाशिर्वाद दिले त्याच्या तोंडून निघणाऱ्या फलादेशासाठीं आतुरलेल्या गिऱ्हाईकानी थाळ्या भरभरून त्याला भेटी दिल्या

तेवढीच कायती कमाई !

घरी गेला आणि त्याचे डोळे उघडले नववधूच्या शुभदर्शनानें त्याच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली तिच्या तोंडावर देवीनीं टांकी घातली होती. देवीच्या कृपेसाठीं तिनें आपल्या एका डोळ्याचें बलिदान केले होतें गुरु झाल्यामुळें तिचा उजवा हात थोटा झाला होता डावा पाय जन्मतःच लंगडा होता.

ज्योतिष-पुस्तकांच्या आणि कुंडल्यांच्या गठड्या बांधून त्यानें आपल्या दारासमोर त्यांची रास केली आणि घासलेटचा एक डबा वर ओतून त्यांना काडी लावून दिली.

त्या धगधगणाऱ्या ज्वालांत प्रेमविवाहाची त्यानें कल्पनेनें आंखलेलीं रम्य चित्रें जळून जात असलेलीं त्याला दिसून येत होतीं

# त्याचें उत्तर ?

एम्. बी बी एस् झाल्यापासून दवाखाना उघडून नोकरी सुरू करावी असें रोज तिच्या मनांत येत असे पण कित्येक वर्षे गेलीं तरी तो निश्चय कांहीं अमलांत आला नाही

उदरनिर्वाहासाठीं धंद्याची जरूरी नसली—पोटाला चिमटा लागत नसला म्हणजे माणसाला कोणत्याही गोष्टीबद्दल उत्कंठा वाटत नाही तसेंच तिचें झालें होतें. सायन्सच्या अभिमानानें इंटरसायन्सकडे ती गेली इंटरसायन्स पास झाल्यावर कुणीसें म्हटलें, कीं मेडिकल कॉलेजांत जावे म्हणून मेडिकल कॉलेजांत गेली. बुद्धिवान असल्यामुळें दरवर्षी परीक्षा पास होत गेली.

पुढें दवाखाना काढण्याच्या गोष्टी निघाल्या. दुसऱ्या कुठल्या तरी डॉक्टर किंवा डॉक्टरणीकडे कांहीं दिवस उमेदवारी करावी अशीही वाटाघाट झाली पण त्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं

घरांत गडगज संपत्ति असल्यामुळें कोणता तरी धंदा करण्याबद्दल आंच लागली नव्हती. ती पुरुष असती तर लोकांसाठीं म्हणून दवाखाना काढणें किंवा नुसती कन्सल्टिंग प्रॅक्टीस करणें तिला भाग आलें असतें श्रीमंताचीं पुष्कळ मुलें डॉक्टर होऊन वडिलोपार्जित संपत्तींत आणखी भर टाकीत असल्याचीं उदाहरणें कांहीं थोडींथोडकीं नाहींत.

पण प्रश्न असा होता, कीं वडिलोपार्जित संपत्तींत भर टाकण्याची तिला जरूरी होती काय ? आणि शक्य होतें काय ?

मुलीचें म्हणजे तिचें लग्न झालें पाहिजे हा त्रिकालाबाधित सिद्धांतच आहे. कांहीं सुशिक्षित मुलींच्या बाबतींत हा सिद्धांत खोटा ठरला आहे. विशेषतः डॉक्टरणींच्या बाबतींत बऱ्याच स्त्रियांनीं हा सिद्धांत खोटा ठरविण्याचा

यशस्वी प्रयत्न केला आहे हें जरी खरें असलें, तरी अखंड ब्रम्हचारिणीचें व्रत चालवितील असें वाटत असलेल्या डॉक्टरणींनी आयुष्याचा वसंतऋतु संपल्यानंतरही ऐन रखरखीत उन्हाळ्यात कुठल्या तरी डॉक्टरच्या गळीं पडून निश्चित ब्रह्मचर्याची ग्वाही देणाऱ्या आपल्या मित्रमंडळीचे दांत चांगलेच घशांत घातले आहेत.

कुसुमच्या बाबतीत असेंच कांहीतरी होईल, अशी पुष्कळांची अपेक्षा होती. दवाखाना उघडीत नाही. कन्सल्टिंग प्रॅक्टीस करीत नाहीं. मग ही करणार तरी काय ?

उत्तर एकच एक असे लग्न !

बरेच तरुण डॉक्टर तिच्याभोवती सारखे घोटाळत असत. कॉलेजांतली ओळख काढून कधी चहाच्या निमित्तानें, कुणी सणासुदिनाची संधि साधून, कुणी वर्षकांठींचा दिवस पकडून कुसुमची भेट घेण्याचा प्रयत्न करीत गृहस्थाच्या धर्माला अनुसरून तिच्या घरीं त्यांचें आदरातिथ्य होई

पण यापेक्षां जास्त काही होत नसे कटाळून कंटाळून हे तरुण डॉक्टर जी मिळेल ती मुलगी पकडून एकदाचे ससारात पडत कुसुमच्यासाठीं वाट पहात रहाण्याइतकी आत्मसंयमनाची ताकद त्यांतील कोणाच्याच अगीं असल्याचें दिसून आले नाही.

बरोबरीच्या डॉक्टरांप्रमाणेच काही थोडेसे जुने डॉक्टर अलीकडे अलीकडे कुसुमकडे ' काणाडोळा ' करू लागले होते. त्यांची प्रॅक्टीस चांगली चालत नसे हेच त्याचें कारण होतें कुसुमच्या स्वत:च्या मालकीच्या दोन मोटरी, तिच्या नांवावर करून दिलेले दोन बगले आणि एक मोठी चाळ वगैरे वगैरे गोष्टी ध्यानीं येतांच, या प्रौढ तरुणांचीं अत करणे प्रेमानें फुलून निघत असत.

डॉ सुदररावानें तर कुसुमचा पिच्छा पुरवला होता त्याच्या दवाखान्यांत येण्याचें धैर्य करणारा रोगी फारच क्वचित् निघत असल्यामुळें त्याला मुबलक वेळ होता. हा रिकामा वेळ तो कुसुमची आराधना करण्यांत घालवित असे.

चहा तयार झाला आणि घरांतला ब्राम्हण ट्रेमधून तो घेऊन येत असला, म्हणजे त्याच्या हातचा कप काढून घेऊन तो कुसुमच्या हातीं देई. तिची निघण्याची वेळ झाली कीं ड्रायव्हरला हांक मारणें, मोटर दारांत आली कीं

तिचा दरवाजा उघडून कुसुमला रस्ता करून देणें, मुक्कामावर गेल्यावर मोटरखालीं चट्कन् उतरून दरवाजा उघडून मोटरच्या दारांत तिला खडी ताजीम देणें, वगैरे वगैरे महत्त्वाच्या कामांत आपल्या आयुष्याचा तो सद्व्यय करीत होता. तरीही देवता कांहीं प्रसन्न होत नव्हती

डॉ सुंदररावाला दिसून आलें, रिकाम्या काळाचा आपण जसा सद्व्यय करीत आहोंत त्याचेंच अनुकरण डॉ. कुसुमही करीत आहे

डॉ. कुसुमच्या डोक्यांत एकच वेड होतें असें त्याच्या नजरेला आले. तिला आय. एम् एस् नवरा पाहिजे होता. अशा एका आय. एम् एस्. च्या मागून ती घिरट्या घालते आहे असें डॉक्टर सुंदररावाला ज्यावेळीं आढळून आलें त्यावेळी तो हताश झाला, आपल्या गावी गेला, आणि आपली सांपत्तिक स्थिति ज्याला माहित नाही अशा एका गृहस्थाच्या मुलीशी लग्न करून पुन्हां मुबईला आला

डॉ कुसुमची प्रच्छन्न प्रियाराधना सुरू होती, ज्या आय एम्. एस् डॉक्टरवर तिनें डोळा ठेवला होता तो मुबईतील एका बड्या दवाखान्याचा बडा अधिकारी होता नुसत्या सपत्तीसाठीं कुणाशीं लग्न करण्याची तिला जरूरी नव्हती. तिला अधिकाराची लालसा होती. आणि त्या अधिकारलालसेनें पूर्वीच्या स्थळांकडे तिनें काणाडोळा केला होता.

या आय एम्. एस् अधिकाऱ्याचें नांव डॉ. मधुकर असें होतें मितभाषी म्हणून त्याची फार प्रख्याति होती कामाशिवाय सहसा कोणाशी कधींही न बोलणारा हा माणूस कुसुमबरोबर तासचे तास बोलत, बसतो आहे, असें दिसून येतांच सर्वांनाच एक प्रकारें आनंद झाला. आतां हें लग्न होणार अशी सर्वांची खात्री पटूं लागली

लग्नाच्या वेळेला जांवयाला देणग्या काय काय याव्या याचा कुसुमचे आईबाप विचार करूं लागले

कुसुम देखील मोठ्या आनंदांत असल्याचें दिसून येत होतें निराश होऊन संसार थाटलेले कुसुमचे पूर्वीचे भक्त सर्वी साधून कुसुमचें अभिनंदन करायला उद्युक्त होत असत.

कुसुम कांहींच बोलत नसे. त्याचप्रमाणें मधुकरही फारसा घोंगावलेला

कोणाला ऐकूं आला नाहीं

डॉक्टर सुंदरराव मात्र म्हणत असत,

" आमच्या डॉक्टर कुसुमनं कवीचं थोबाड फोडून टाकलं आहे कुसुमा-भोंवतीं मधुकर घिरट्या घालतो असं म्हणणारे कालिदासापासून तों तहत सोम्यागोम्यापर्यंत सगळे कवी आता पार चीत होणार ! घरच्या देवाचा असलेला आश्रय सोडून हें कुसुम आतां मधुकराभोंवतींच घिरट्या घालू लागलं आहे. पण त्यावरून यांतून कांही निष्पन्न होईल, असं मात्र मला तरी वाटत नाहीं. मी मधुकराला चांगला ओळखतों तो अट्टल लबाड आहे कुणी म्हणतात, त्याची कांहींतरी विलायतेंतली भानगड आहे पण ती हकीकत खरी आहे म्हणायला माझ्याशीं कांहीं पुरावा नाहीं निम्मं वय होऊन गेलय बेट्याच—इतक्या मुली सांगून आल्या—हजार दशकांत हुंडा मिळणार होता—पण हा मूर्ख माणूस लग्न करीत नाहीं. आज हें घबाड देखील अगदीच वाईट नाहीं इतकीं वर्षे ती त्याच्या-भोंवतीं घोंटाळते आहे. आज लग्न होईल उद्यां लग्न होईल असं तिला वाटतंय, तिच्या आईबापांना वाटतय, शेजाऱ्यापाजाऱ्यांना वाटतंय—मलासुद्धां वाटतंय, पण अजूनही कांहीं शुभमंगल होत नाहीं मग काय हा बेटा तिला असाच घुमवीत ठेवणार—"

डॉ. सुंदररावांचें हें म्हणणें कोणाला पटत नसे. जोडपें मोठें अनुरुप होतें. दोघेंही कांहीं तरुण नव्हतीं. वार्धक्याची सीमा आधीं कुणी ओलांडावी याबाबत दोघांचा जसा कांहीं चुरशीचा सामना सुरू होता.

वर्षांवर वर्षे जात होतीं. पण या प्रियाराधनाचा कांहीं शेवट होत नव्हता. कांहीं दिवस डॉक्टर मधुकरनें कुसुमची गांठभेटसुद्धां घ्यायची नाहीं, असा बेत केल्याचें लोकांना दिसून येत होतें. निराश होऊन कांही दिवस तिनें उपासनीबाबांचें शिष्यत्वसुद्धां पत्करलें. पण मधुकराची असो कीं उपासनीबुवांची असो, कुठलीच उपासना तिला फलद्रुप झाली नाहीं. तसें पाहिलें तर डॉ. मधुकर कांहीं म्हाताऱ्याच्या सदरांत येणारा नव्हता. त्याची चाळिशी उलटून गेली तरी त्याचा एकही केंस पिकला नव्हता, कीं चेहऱ्यावर एक सुरकुती पडली नव्हती.

साधारण नजरेनें पहाणाऱ्याला तो पंचविशी—तिशीच्या दरम्यान कुठेंतरी असल्याचें वाटलें असतें.

डॉ कुसुम कुठें तरी पस्तीशीच्या घरांत येऊन पोहोचली होती पण तिला पंचवीस वर्षे झालीं आहेत असें कुणी सांगितलें असतें, तरी तें देखील खरें वाटलें नसतें, इतकी ती टवटवीत दिसत असे

लहानशी कुजबुज वाढत जाऊन डांगोऱ्याच्या सदरापर्यंत आली, तरीही कुसुमनें जगाची पर्वा केली नाही.

—आणि डॉ मधुकरनेंही कुसुमची पर्वा केली नाही.

ती वेडीपिशी झाली होती.

तो बेछूट आनदांत होता. शस्त्रक्रिया करीत असताना रोग्याला कितीही यातना झाल्या तरी एकादी विशिष्ट प्रकारची केस मिळाल्यामुळें एकाद्या सर्जनला जितका आनंद होतो, तितकाच आनद डॉ मधुकरला होत होता पुढल्या आशेवर आपलें भवितव्य आधारून ती आपला निश्चय सोडून द्यायला तयार नव्हती पण डॉ. मधुकरच्या या चाळवाचाळवीमुळें सर्वत्र तिची निष्कारण बदनामी होत होती

डॉ. मधुकरनें दुसऱ्या कुणाशीं लग्न केलें असतें तर कोणाला कांहीं वाटलें नसतें. पण तोही लग्न करीत नव्हता आणि तीही आशा सोडीत नव्हती

तिची चिकाटी जबरदस्त होती. लोकांनी नांवें ठेवलीं, निंदा केली, क्वचित् आरोप केले तरी देखील ती पर्वा करीत नव्हती.

दोघांचें संगती-सोबतीचें हिंडणें फिरणें जरी निश्चित स्वरुपाचें नसे, तरी केव्हां ना केव्हां तीं एकमेकांना भेटत असत. घरोब्याच्या नात्यानें बोलत चालत असत—पण तोही नकार देईना आणि तीही कांहीं विचारीना

डॉ. कुसुमचा बाप अगदीं घायकुतीला आला. एवढी संपत्ति होती, पण तिला कुणी वारस नव्हता दत्तक घेण्याची त्याची इच्छा नव्हती आपल्या वंशांतील कुठल्याही व्यक्तीला—म्हणजे मुलीच्या मुलाला, लांब दूरच्या नातेवाईकाला नव्हे—आपली इस्टेट मिळावी असें त्याला वाटत होतें आणि डॉ. कुसुमचें लग्न तर होत नव्हतें.

डॉ. कुसुमचें लग्न होत नाहीं असें तरी कुठें ठरत होतें !

एके दिवशीं तिच्या बापानें तिला विचारलें, " हें चाललंय तरी काय ? तो होय म्हणतो कीं नाहीं म्हणतो, याचा कांहींतरी एकदां निकाल नको का लागायला ? आणि तोच हवा हा तरी तुझा आग्रह कां ? आतां तुझं वय होत चाललं आहे.

तुझ्या वयाच्या बायका पूर्वी म्हाताऱ्याच्या सदरांत मोडत असत चांगल्या नातुरवाळ्या झालेल्या असत मग तू आता आणखी किती वर्षं वाट पहात रहाणार ? आमच तरी आतां कितीस आयुष्य राहिलं आहे ? एकादं नातवंड पाहून डोळे मिटावेत एवढं तरी आमचं भाग्य आहे कीं नाही, हें नको का निश्चित व्हायला ? तोच कशाला इतका हवा तुला ? आणि आय. एम् एस् तरी कशाला पाहिजे ? कुणी का असेना ? तुला दु ख न होईल असा कुणी तरी असला म्हणजे झाल ''

डॉ कुसुम अगदी रडकुडीला आली. अंत करणांतली सारी व्यथा मोठ्या निग्रहानें दाबून ती म्हणाली, " मला आश्चर्य वाटत तें हेच ! मधुकर कांहींच बोलत नाहीं ! नाही म्हणन नाहीं कीं होयही म्हणत नाहीं—लग्नाची गोष्टच मुळीं काढीत नाहीं गोष्ट काढायचा मी प्रयत्न केला तर इतक्या शिताफीन ती उडवून देतो, कीं मी हतबुद्ध होऊन बसतें. अगदीं दोन मित्रांपलीकडे आमच दोघांचं नात कधीच गेलं नाही. कधीं त्यानं लघळपणा केला नाही हल्लीं हल्लीं मला शंका येऊ लागली आहे, कीं तो नुसताच पुरुषाच्या जन्माला आला आहे का ? "

बाप म्हणाला, " बोलतेस काय तूं हे ? अस भलतंच कांहीं बोलू नकोस. चांगला धडधाकट दिसतो—"

" दिसण्यावर काय आहे ?" डॉ कुसुम संतापून म्हणाली, "पूर्वीच्या माझ्या जोडीदारांची आठवण झाली म्हणजे याच्याबद्दल मला शंकाच येऊ लागते कांहीं मन म्हणून आहेच ना ? पण हा नुसता दगड दिसतो "

बोलता बोलतां तिला एकदम रडूं कोसळलें. साऱ्या आयुष्यांत ती ही पहिल्यानेच रडली तिच्या बापाच्या हृदयाला धक्का बसला. प्रकरण अगदींच विकोपाला गेलें असें त्याला वाटलें.

संधी साधून त्यानें डॉ मधुकरला गांठलें आणि विचारलें, " अरे हें तुम्हीं दोघांनीं चालवलं आहे काय ? आम्हीं म्हाताऱ्यांनीं आतां किती वेळ तिष्ठत रहायचं ? आतां तुम्ही कांहीं लहान राहिलां नाहींत ! तुम्हाला नातवड झालीं पाहिजे होतीं यावेळीं ! "

डॉ. मधुकर नुसता हंसला.

तो कांहींच उत्तर देत नाहीं असें पाहून कुसुमचा बाप म्हणाला, " मला

निश्चित उत्तर पाहिजे आहे ”

“कसल उत्तर ?” डॉ मधुकरनें विचारलें. त्याच्या एक थोबाडींत भडकवावी इतका कुसुमच्या बापाला त्याचा राग आला होता पण करतो काय बिचारा? पस्तीस वर्षांच्या का होईना पण तो मुलीचा बाप होता.

त्यानें पुन्हां विचारलें, “आणखी दुसर कसलं उत्तर ? त्या बिचारीला हुलकावण्या दाखवतो आहेस—ती तुझ्यावर विश्वासून राहिली आहे!—आतां तुमच हें लग्न होणार आहे तरी कधीं ?”

“माझ्या मनाचा निश्चय अजून होत नाहीं !” मधुकर गंभीरपणें म्हणाला.

“म्हणजे ? तुझा नकार समजायचा का ?”

“छे छे ! असं कुठं मी म्हटलं ?”

“मग काय म्हटलस ?” तिरसटपणें कुसुमच्या बापाने म्हटलें, “तुझ्या पाया पडतो. बाबारे, एकदा कांहीं तरी म्हण ! नाहीं म्हण—पण एकदा कांहीं तरी म्हण !”

ओठांतल्या ओठांत हंसतांना डॉ मधुकरच्या गालाला खळी पडली. तो म्हणाला,“ कांही तरी कसं म्हणूं ? मनाचा निश्चय झाला पाहिजे ना ? नाही म्हणावं असं काहीं मला वाटत नाहीं. होय म्हणण्याची मनाची तयारी होत नाही—”

“मग तुझं हें अडलंय कुठं ?” त्रासिकपणें कुसुमचा बाप म्हणाला, “किती किती दिवस तिचा आतां अंत पहाणार आहेस ? पुरुषाला कांहीं वाटत नाहीं—पण तिचं आतां वय होत चाललं आहे ! थोडे दिवसांत ती म्हातारी दिसूं लागेल——”

“तीच भीति मलाही वाटते आहे ना !” डॉ. मधुकर हळूच म्हणाला.

“मग करना कोणत्या तरी एका सोळा वर्षांच्या पोरीशीं लग्न ! पण तिला एकदांची मोकळी कर. जोंपर्यंत तुझं लग्न झालं नाहीं तोंपर्यंत तिची आशा काहीं सुटत नाहीं. आणि जोंपर्यंत आशा सोडायची तिची तयारी नाही तोंयंत दुसर स्थळ पहाणं मला शक्य नाहीं, आणि तिलाही शक्य नाहीं. ‘स्थळ पहाणं’ म्हणायला सुद्धां मला शरम वाटते ! हें कसलं स्थळ पहाणं ! यावेळीं तिच्या मुलीचं स्थळ पहायला पाहिजे होतं—”

म्हातारा सारखा बडबडत होता संधि साधून डॉ. मधुकर हळूच निघून गेला.

ती अगदी जिवावर उदार झाली होती एकदां कांही तरी सोक्षमोक्ष करायचाच असा मनाचा निश्चय करून तिनें एक बेत योजला.

त्या दिवशी तो आला होता चहा झाला इकडच्या तिकडच्या गोष्टी निघाल्या कांही रोग्यांच्या हकीकती निघाल्या सर्जरीची एक नवी केस यशस्वी केल्याच्या अभिमानांत फुलून जाऊन डॉ मधुकर बोलत असतां एकदम कुसुम उठली आणि त्याच्या गळीं पडली

एकाद्या संयमी योग्याला तपभ्रष्ट करण्यासाठी आपले पाश टाकणाऱ्या इंद्रानें पाठविलेल्या अप्सरेप्रमाणें जरी तिनें आपलें जाळें त्याच्यावर टाकलें तरीही त्याचें मन ढळले नाही

हळूच तिचे हात सोडवून तो उठला आणि म्हणाला, "माफ कर कुसुम, मला एक केस पहायला जायच आहे आता उद्यां येईन !"

तो एकदम निघून गेला

बिचाऱ्या कुसुमचा शेवटचा उपायही फुकट गेला तिला वाटलें, यापुढें तो कांही पुन्हां येणार नाहीं

पण अजूनही तेंच चालले आहे तो पूर्वीप्रमाणेंच दररोज येतो एकाद्या जिव्हाळ्याच्या आप्ताइतकाच लोभानें बोलतो तिला घेऊन सिनेमाला जातो—तीही तितक्याच जिव्हाळ्यानें त्याच्याशीं बोलते—तितक्याच आशेनें त्याच्याबरोबर फिरते, सिनेमाला जाते

पण तो अतिप्रसंग सुद्धा करीत नाहीं

आणि त्याची कसोटी पुन्हां पहाण्याचें डॉ कुसुमलाही धैर्य होत नाहीं.

त्यांचें लग्न केव्हां होणार याची वाट पहात तिचीं आईबापें अजून जीव धरून राहिलीं नाहींत.

शेजारीपाजारी यापूर्वी थट्टा करीत होते—निंदा करीत होते. ते देखील आतां थकले आहेत. त्यांचें लग्न होणार कीं होणार नाहीं याची चर्चा आतां कुणी करीत नाहीं.

तिला आशा वाटते आहे--

पण तो कांहींच उत्तर देत नाहीं.

# दरोडेखोर !

तो एक कुणब्याचा मुलगा होता दुसऱ्याच्या शेतावर काम करून कसेंबसें पोट भरणाऱ्या आईबापाच्या पोटीं त्याचा जन्म झाला होता पांढरपेशांची मुलें रस्त्यावरून शाळेंत जाऊं लागलीं म्हणजे त्याला मोठे वैषम्य वाटे. शाळेंत हे लोक जातात कशाला हें त्याला कांहीं माहीत नव्हतें शाळेच्या खिडकीच्या बाहेर उभे राहून तो आत डोकावून पहात असे मांडी मोडून पुस्त्या लिहिणारीं मुलें, कविता म्हणणारीं मुलें, पुस्तकें वाचून दाखवीत असलेलीं मुलें पाहिलीं म्हणजे त्याचा जीव कासावीस होत असे

मास्तर मुलांना मारीत असतांना देखील केव्हां केव्हां त्याच्या नजरेस पडलें होते पण एवढी गमत चालली असतांना त्यांत एक दोन फटके मिळाल्यास काय वाईट, असें त्याला वाटे, उठतां लाथ आणि बसतां बुक्की असा त्याच्या घरचा खुराक असे. त्यानें त्या दोन्ही खुराकांची तुलना करून पाहिली; त्यावेळीं त्याला वाटलें, घरीं राहून आईबापांच्या हाताखालीं काम करण्यापेक्षा शाळेंत जाणें बरें

एके दिवशीं सकाळींच तो बापाला म्हणाला, " मी शाळेंत जाणार आहें."

बाप नुसता आ वासून पहात राहिला. मुलाच्या डोक्यांत हें कसलें वेड शिरलें आहे याची त्याला कल्पनासुद्धां येईना

शाळेंत जाणार ?—कुणब्याचा मुलगा शाळेंत जाणार ? मग हीं शेतावरचीं कामें करणार कोण ? तो मोठ्यानें खेंकसला, "गप्प बैस. भलतंच कांहीं बोलू नकोस."

सखाराम गप्प बसण्यास तयार नव्हता. तो म्हणाला, " बामणांचीं इतकीं मुलं शाळेंत जात आहेत—"

त्याचा बाप मध्येच म्हणाला,"पण आपली कुणी जात आहेत का शाळेंत—?"

सखाराम बेफाम झाला होता तो म्हणाला, "हो आपल्या जातवाल्यांचीं देखील मुलं आहेत तिथं"

बापानें विचारलें, "कुणाची मुलं? शेतकऱ्यांची मुलं आहेत का? आमच्यासारख्या मजुरांचीं मुल आहेत का?"

सखारामाला उत्तर देतां येईना. खरोखरच शेतावर राबणाऱ्या कुणाही माणसांची मुलें त्या गांवच्या शाळेंत जात नव्हतीं ज्या कुणब्यांची मुलें जात होतीं ते कुणबी जमीनदार होते, श्रीमत होते जातीपलीकडे पांढरपशांत आणि त्यांच्यांत कांहीच फरक नव्हता.

त्यानें विचार केला. त्याला कांहीं मुद्दे सुचेनात दांतओठ खाऊन तो मोठ्या जोरानें उद्गारला, "मी शाळेंत जाणार!"

आई म्हणाली, "जाईना का शाळेंत! थोडसं लिहायला वाचायला शिकला तर शेजाऱ्यापाजाऱ्यांची पत्रं तरी लिहील"

"तूं गप्प बैस" त्याचा बाप ओरडला, "सखाराम शाळेत जायला लागला तर इथं कोण तुझा बाप काम करायला येणार आहे! पत्र लिहील म्हणे. कुणाला पत्रं लिहील? कुणाचीं पत्रं लिहील? गांवचीं शेतं टाकून मरायला जातात सारे. त्यांना कशाला कळायला हवी आहे इकडची हकीकत? कांही नकोत कुणी कुणाला पत्रं लिहायला! कांहीं नकोस जाऊं शाळेंत.." खांद्यावर फावडें टाकून घराबाहेर पडतांना त्याच्या बापानें पुन्हां एकदां त्याला दटावलें.

बाप गेला असें पाहून आई म्हणाली, "तूं जा शाळेंत सख्या. काय कुणाचा राग होईल तो मी पाहून घेईन"

सखारामाला आनंद झाला त्याला वाटलें, आई आहे म्हणून हें जग चाललें आहे जगांत जर सारेच बाप असते तर सगळ्या जगाचा सत्यानाश झाला असता.

तो शाळेंत जाऊं लागला बाप ओरडत होता. आई त्याची समजावणी करीत होती. बैलाच्या जोडीनें नांगराला जुंपलेल्या त्या कणखर कुणब्याला चीड येत होती. पण बायकोच्यापुढें त्याचें कांहीं चालत नव्हतें. तिनें सत्याग्रह केला असता तर साराच संसार जागच्या जागीं थिजला असता. कुणा जोडीदारानें

विचारले तर तो म्हणे, " हिचा आग्रह आहे, जातो आहे शाळेत जाऊन जाऊन किती दिवस जाईल? मास्तराच्या छड्या बसल्या म्हणजे आपणच शाळा चुकवायला लागेल. आणि एक दिवस जर का त्यान शाळा चुकविली तर दुसऱ्या दिवशी कांहीं मी पुन्हां त्याला शाळेत जाऊ देणार नाही."

बापाचे हे शब्द सखारामाच्या कानी गेले होते त्यानेंही निश्चय केला होता, प्राण गेला तरी बेहेत्तर. मास्तरानी छड्या मारल्या, खुर्ची दिली, घोडीवर टांगले तरीदेखील शाळेंत जायचे म्हणून चुकवायचेंच नाही.

त्याच्या या निश्चयाने त्याला हात दिला. मार खायचा प्रसगच कधी त्याला आला नाहीं. प्रत्येक मास्तर त्याच्यावर खुष असे. 'कुणब्याचा मुलगा आणि इतका बुद्धिवान कसा!' असे सर्व म्हणत असत ब्राह्मणाच्या मुलांनादेखील त्याचा मत्सर वाटू लागला

एका इयत्तेंतून दुसऱ्या इयत्तेंत तो भराभर उड्या मारीत चालला शाळेंतील पहिला नबर त्यानें सोडला नाही

हळुहळू बापाला देखील त्याचा अभिमान वाटूं लागला. शेजाऱ्यापाजाऱ्याचीं पत्रे तो लिहू लागला बचन-चिठ्या लिहूं लागला जुनीं खते-पत्रें देखील वाचून दाखवूं लागला

सखारामाच्या बापालाही पटलें, लिहिण्यावाचण्यापासून देखील कांहीं फायदा आहे. तो म्हणे, 'नांगराच्या टोंकावर अन्न मिळतं. पण लेखणीच्या टोंकावर ते टिकवतां येत सखारामाला जर वाचतां आल नसतं तर परवां बामणानं माझ्याकडून हें सार शेतच लिहून घेतल असतं आधी वाचून घेतलं म्हणून बर झाल नाहीतर मी आपला आंगठा दिला असता आणि त्यानं मला आंगठा दाखवला असता.'

'इग्रजी शाळेंत जायच' असें ज्यावेळीं सखाराम म्हणाला तेव्हां मात्र म्हाताऱ्याच्या हृदयाने ठाव सोडला. त्याला वाटलें, मुलगा चेकळला. मराठी होत तोंपर्यंत ठीक होतं. पण इग्रजी!—

काय अलिकडच्या पोराच्या डोक्यांत एकेक चाळे शिरत आहेत! म्हाताऱ्यानें चक्क सांगितलें, " मराठी झालं तेवढं पुरे झालं. हे इग्रजी चाळे आम्हांला नकोत. इग्रजी शिकून बामणांनीं सगळा भ्रष्टाकार माजवला आहे. कुणब्याच्या जातींत

भेसळ व्हायला नको "

वाघाला जशी रक्ताची चटक लागते तशी सखारामाला शिक्षणाची चटक लागली होती रक्ताला चटावलेल्या वाघासारखाच तो बेफाम झाला. पळून तो जिल्ह्याच्या गांवीं गेला.

सखारामाचा बापही बेफाम झाला ' पोरगा मेला अस समजेन पण त्याचं नाव म्हणून काढणार नाही इंग्रजी शिकतो म्हणतो म्हणजे काय ? मराठी शिकूं लागला तेव्हा कानाडोळा केला हीच चूक झाली '

त्यानें बायकोला बजावलें, "यापुढ सखारामाचं नांव घरांत घ्यायचं नाहीं "

ती काहीं बोलली नाही पण नवऱ्याची पाठ फिरतांच ती आपल्याशींच हसली. तिला खात्री होती, कीं आपला मुलगा आपले नांव काढणार

सखाराम जिल्ह्याच्या गावी गेला पण तिथें त्याच्या ओळखीचें कुणीच नव्हतें त्याने इंग्रजी शाळेत तपास केला शाळेच्या मास्तरांना जाऊन भेटल्यावर त्याने जेव्हा आपली सगळी हकीकत सांगितली, तेव्हां त्यांनाही प्रश्न पडला त्यांनी त्याची थोडीशी चांचणी घेतली. त्याना वाटलें, मुलगा हुषार आहे. आश्रय दिला तर कांहीं अगदींच दगा व्हायचा नाही.

त्यांनी सखारामाला विचारलें, "माझ्या घरचं काम करून जर रहाशील तर मी तुला इंग्रजी शाळेंत घालायची व्यवस्था करीन तुझी फी भरीन, पुस्तक देईन "

सखाराम म्हणाला, "तुम्ही सागाल तें करीन संडास साफ करायची देखील माझी तयारी आहे. पण मला इंग्रजी शिकवा "

त्याचा तो विलक्षण उत्साह पाहून मास्तरांना देखील त्याच्याबद्दल प्रेम उत्पन्न झालें

मोलमजुरीचें काम करून सखाराम अभ्यास करीत होता मास्तरांच्या कुटुंबांतील साऱ्या माणसांची मर्जी त्यानें संपादन केली होती.

इंग्रजी पांचव्या यत्तेपर्यंत त्यानें मजल गांठली आणि पुढें...

ज्या मास्तराच्या घरीं तो रहात होता त्यांना मुंबईला ज्यास्त पगाराची नोकरी मिळाल्यामुळें ते निघून गेले सखारामाबद्दल अत करणपूर्वक कळवळा येईल असा दुसरा माणूस—मास्तरसुद्धा—कुणीही तिथें नव्हता

मास्तर मुंबईला जाणार असें ज्यावेळीं त्याला कळलें, त्यावेळीं तो घरोघर

जाऊन हिंडूं लागला कुणब्याच्या मुलाला घरीं ठेवतो कोण ? गांवचे काहीं पाटील चांगले श्रीमंत होते ते जिल्ह्याच्या गांवी कोर्टांत काम चालविण्यासाठी येत असत. त्यांच्याही त्यानें भेटी घेऊन पाहिल्या, पण त्यांनी त्याला धुडकावून लावलें

कुणब्याच्या जातीचा त्याला तिटकारा येऊ लागला त्यानें पाहिलें, ब्राह्मणांच्या मुलाला ब्राह्मण मदत करीत होते सगळे पांढरपेशे फंड काढीत होते आपल्या मुलांचें शिक्षण चालवीत होते शेजारपाजाऱ्याच्या परक्या मुलांच्या सुद्धा शिक्षणाचा भार त्यांतून वाहिला जात होता सखाराम म्हणाला, ' काय करायचे हे पाटील आणि चौधरी ! काय चाटायची आहे त्यांची श्रीमती ! '

पण दांतओठ खाऊन स्वस्थ बसण्यापलीकडे त्याला गत्यंतर नव्हतें. त्याने पुष्कळ विचार करून पाहिला, त्याला कांही उपाय सुचेना। त्याला वाटले, सारी सोंगें करतां येतात पण पैशांचें सोंग करतां येत नाही, असें म्हणतात तें कांही खोटें नाहीं कशीं आणायचीं ही पैशाचीं सोंगें !—जगात अशक्य असें कांहीं नाहीं. पैशाचें सोंगसुद्धां आणतां येईल.

विचार करीत तो रस्त्यानें जात होता. नुकतीच शिक्षा झालेल्या एका कैद्याला हातांत बिड्या ठोकून दोन पोलीस शिपाई कचेरीकडे घेऊन जात होते

त्यानें शिपायांना विचारलें, " शिपाईदादा, काय केलं यानं ? "

शिपाई म्हणाला, " यानं घरफोडी केली. केदू पाटलाच्या घराची भिंत फोडून यानं नोटा लांबवल्या "

" काय केल्या नोटा त्यानं ? " सखारामनें विचारलें.

" तेंच तो सांगत नाहीं ना ! " शिपाई म्हणाला, " चोरी केली खरी पण चोरीचा माल कुठं नापत्ता केला याची मुळींच दाद लागूं देत नाहीं तो "

त्या कैद्यानें आपल्या अंगावरचा सदरा दूर करून सखारामाला दाखविलें. " हे पाहिलेस पाठीवरचे फटके ? आणखी देखील जखमा आहेत पण त्या तुला दाखवतां येत नाहींत. असं आहे हे आमचं जिणं. तुरुंगांतून सुटून येईपर्यंत वाट पहात राहिलं पाहिजे "

शिपायांनीं त्या कैद्याला दोन धक्के मारले आणि ते त्याला पुढे घालून घेऊन गेले.

सखाराम विचार करीत राहिला. ' तुरुंगांतून सुटून येईपर्यंत वाट पहात

राहिल पाहिजे ! ' कां ? चोरीचा माल जो लपवून ठेवला होता त्याचा उपभोग घेण्याकरतां का ? त्याला वाटलें, पैशाला किंमत आहे खरी. त्या पैशांचा उपभोग घेण्यासाठी हा माणूस फटके सहन करतो ! तुरुगांत जाऊन पुन्हां परत यायची देखील याची तयारी आहे !

त्याला वाटले, एवढी मनाची तयारी पाहिजे. तेव्हां पैसा मिळतो.

त्यानें ठरविलें, आता यापुढें याचना म्हणून करायची नाहीं. आपला आपण पैसा मिळवायचा.

स्वत च्या कर्तबगारीवर त्यानें पैसा मिळवायला सुरवात केली थोडेसे परिश्रम करून—थोडासा पैसा खर्च करून, जीव धोक्यांत घालून, हस्तकौशल्याची थोडीशी कमाल करून त्याला पैसा मिळू लागला

त्यानें शिक्षण सुरू केलें जो जो कुणी कुणब्याचा मुलगा शिक्षणासाठीं अडून राहिला असेल त्याला पैसा द्यायला त्यानें सुरवात केली. आतां त्याला पैशाचा तुटवडा नव्हता. एका दमडीसाठीं मास्तरांच्या घरीं ज्यानें वाटेल तेवढे काबाडकष्ट केले होते, तोच सखाराम आतां भरपूर पैसा बाळगून होता आपल्याकडे भरपूर पैसा आहे याची दाद तो कुणाला लागू देत नव्हता

त्याच्या वागणुकीत यत्किंचितही फरफ झाला नव्हता. तेंच कपडे, तेंच जेवण ऐषआरामाच्या नादीं तो कधींच लागला नाहीं. त्यानें मनांत आणले असतें तर बंगला घेऊन त्याला राहातां आलें असतें, नोकर-चाकर ठेवतां आले असते, मोटर देखील बाळगतां आली असती, इतका पैसा आतां त्याच्याजवळ झाला होता

पोलीस हवालदील झाले होते. प्रत्येक गांवांतील आणि गांवच्या आसपासच्या प्रत्येक खेड्यांतील प्रत्येक श्रीमंताच्या घरीं महिन्याच्या ठराविक दिवशी दरोडा पडत असे. आज उत्तरेकडच्या खेड्यांत तर उद्यां दक्षिणेकडच्या खेड्यांत. पोलिसांनीं जंगजंग पछाडले, पण दरोडेखोर कुणाला सांपडला नाहीं.

सखाराम मॅट्रिक झाला. आणि कॉलेजच्या अभ्यासासाठीं मुंबईला येऊन राहिला सखारामनें पुष्कळ मित्र संपादन केले होते. प्रत्यक्ष मदत केलेलीं माणसें

बरींच होती पण त्याने केलेली मदत इतकी होती, कीं त्याचा हिशेबही लागला नसता कुठल्याही गरिबाच्या घरी पैशाची अडचण उत्पन्न झाली आहे असे कळलें, कीं त्याच्या घराच्या छपरातून थैली पडत असे. बिचाऱ्या भोळया कुणब्यांना वाटे, गावच्या देवीची कृपा झाली त्यांनीं देवाला बोकड बळी दिले, कोंबडीं कापली, जमातीला दारू वांटली

हल्ली दरोड्यांची संख्या कमी झाली होती क्वचित् केव्हां आठाकाळी बारामाशी दरोडा पडत असे पण जो पडे तो मात्र भलत्याच मोठ्या मालाचा पोलिसांना कांहींच उलगडा होईना दरोड्याचे स्वरूप असे दिसे, कीं दरोडेखोराची संख्या केवढी तरी असावी त्यांना पत्रे येत धमक्या दिल्या जात. त्या धमक्यांना अनुसरून पोलिसांच्या पार्ट्या निरनिराळ्या ठिकाणीं पाठविल्या जात. आणि ज्या ठिकाणीं पार्टी पाठविली जात नसे, त्याच ठिकाणी दरोडा पडे

पोलिसांना संशय येऊ लागला. आपल्यांतलाच कुणी माणूस दरोडेखोराला सामील तर नाहीं ? प्रत्येकजण प्रत्येकाकडे संशयानें पाहू लागला

वर्षातून एकाददुसरा दरोडा पडायचा इतर गुन्हे होत होते. त्यांच्या मागें पोलीस गुंतून रहात असत या एकाद्या दुसऱ्या दरोड्याकडे लक्ष द्यायला त्यांना सवड नसे सवड नव्हती म्हणजे काय, तपास सुरू असे परंतु तपासखात्याचें सर्व बळ या एकाच दरोड्यावर एकवटून चौकशी करणें त्याना अशक्य होऊन बसलें होतें.

❦

सखाराम मुंबईला देखील फारसा थाटांत रहात नसे. इतर चार विद्यार्थी जसे रहातात तसा तोही राहात असे विद्यार्थ्यांना चोरून मदत करण्याचें त्याला व्यसनच लागलें होतें कुठला विद्यार्थि कुठल्या अडचणींत आहे, या तपासावर तो सदोदित असे.

प्रत्यक्ष मदत करण्याची संधि मुंबईत असतांना त्यानें कधीच साधली नाहीं. आपण कुणाला तरी मदत करतों आहोंत, कुणाला तरी मदत करण्याचें सामर्थ्य आपल्यामध्यें आहे, हें देखील मुंबईत त्याला कुणाला कळवतां येत नव्हतें. त्याच्या या गुप्त दानाचा मुंबईतील कितीतरी विद्यार्थ्यांना उपयोग झाला होता. पण त्यांना ही मदत कोण करतो याचा पत्ता कुणालाच लागला नव्हता.

सखाराम बी ए. झाला आतां त्याच्या बापाला सुद्धां त्याचा अभिमान वाटत होता. तो म्हणे, ' पहा माझा मुलगा कसा कर्तबगार निपजला ! मी नांगऱ्या जन्मभर दुसऱ्याच्या घरीं राबलों पण भीक मागून का होईना माझ्या मुलानं शिक्षण केलं परीक्षांवर परीक्षा पास झाला. साहेबासारख फाड्फाड् इंग्रजी बोलतो. आतां उद्यां मामलेदार होऊन इथ आला म्हणजे मला ही कांहीं ददात करायला नको. मग तुम्ही सगळे लोक माझ्या पायां पडाल.'

मुलाची स्तुति करीत असतां म्हताऱ्याचें तोंड फाटत असे.

सखारामनें फर्स्ट एल्एल् बी ची परीक्षा दिली त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला. आतां आपण वकील होणार ही त्याची खात्री पटली. शिक्षणानें त्याचें मन सुसंस्कृत झाले होते, पण अंतःकरणातली बडखोर वृत्ति कांहीं कमी झाली नव्हती

गांवांतील दरोडे आतां बहुतेक नाहीसे झाल्यासारखे झाले होते. मधे एक दरोडा पडला, त्यावेळी एक रामोशी पकडला गेला. आणि त्याच रामोशानें आज-पर्यंत हे सर्व दरोडे घातले असावेत अशा कल्पनेनें त्याच्यावर केस उभारण्यांत आली त्या रामोशाला सोडविण्यासाठीं सखारामनें आपल्या नित्याच्या संवईला अनुसरून कुणाला नकळत वकील दिला होता त्या वकिलानें आपली पराकाष्ठा केली. सखारामनें मुंबईहून बॅरिस्टर सुद्धां आणला. पण पोलिसांचा पुरावा जय्यत होता.

आज इतकीं वर्षें साऱ्या प्रांतांत दरोडे घालणारा माणूस मिळाला. त्याला तशीच भक्कम शिक्षा झाली पाहिजे म्हणून सरकारी वकील आपल्या वक्तृत्वाची पराकाष्ठा करीत होता.

सखारामाच्या परिश्रमांचा कांहींच उपयोग झाला नाहीं; आणि त्या रामोशाला शिक्षा झाली न्यायाची ही गंमत पाहून सखारामाला आश्चर्य वाटलें. आजपर्यंत पडलेले सगळे दरोडे 'तुक्या' रामोशानें घातले असें कोर्टांत सप्रमाण सिद्ध झालें.

सखाराम आपल्याशींच हंसत होता. त्याचें खट्याळ मन त्याला स्वस्थ राहूं देईना. तो एक पदवीधर होता. तुक्या रामोशाची केस ज्या वकिलानें चालविली

होती त्याच्या खांद्याला खांदा भिडवून तो कोर्टांतले लोकांचे खटले चालवीत होता.

...पण त्याच्यानें रहावेना पोलिसाचे डोळे एकदां तरी उघडून दाखवावेत असे त्याच्या बंडखोर मनाला वाटू लागलें

शेजारच्या गांवच्या जहागिरदारांच्या घरावर चांगलाच मोठा दरोडा पडला. तिजोरीच्या तिजोरी लांबविली गेली दागदागिने, कागदपत्र, नोटा आणि रोकड सारें कांही लांबवलें गेलें

पोलीस पुन्हां पेचांत पडले तुक्या रामोशाला तुरुंगांत डांबला असता देखील दरोडा पडला कसा ?

सखाराम अस्तनींतून हसत होता उद्यां एल् एल् बी होणाऱ्या माणसाची शंका घेण्याची कुणाची छाती होती ? त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला यत्किंचितही डांचत नव्हतें. दरोडे घातले होते खरे, पण ते पैसे तो स्वत च्या चैनीला मुळीच वापरीत नव्हता स्वत च्या जरुरीपलीकडे जो पैसा राहील तो त्यानें गरजू माणसांना देण्यांत घालविला होता.

लाखों रुपये या धंद्यावर त्यानें मिळविले होते लाखों रुपये त्यानें खर्च केले होते. पण ते गरीबगुरिबांच्या कल्याणासाठीं

गरिबांसाठी केलेला हा स्वार्थत्याग त्याच्या स्वतःच्या कामी आला नाहीं.

जगाचा काय न्याय आहे ? 'सज्जनाचा सदोदित जय होतो' असें म्हणतात. पण तो केव्हां होतो हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं सखाराम सज्जन होता. दुर्जन होता हें केव्हांच ठरवतां आलें नसतें गरिबांनीं त्याला सज्जन म्हटलें असतें. श्रीमंतांनीं त्याला घातकी, पातकी म्हणून संबोधिलें असतें पण त्याला मात्र स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल कोणत्याच रीतीनें शरम वाटत नव्हती. आपण जें कांहीं करतों त्याच्या चांगुलपणाबद्दल अभिमान, किंवा वाईटपणाबद्दल पश्चात्ताप, मिरविण्याची त्याला संवयच नव्हती. जें कांहीं वाटे तें मनातल्या मनांतच ठेऊन जें कांहीं करायचें तें तो करून राहिला होता—त्यानें करून टाकलें होतें.

तुक्या रामोशी तुरुंगांत गेला असतांही दरोडा पडूं शकतो हें सिद्ध झालें, त्यावेळीं लोकांनाही तुक्याच्या अपराधीपणाबद्दल शंका उत्पन्न होऊं लागली. कुणी

न्यायाच्या कोर्टांना नांवें ठेऊं लागले, तर कुणी तुक्यालाच दोष देऊं लागले 'न्यायदेवता आंधळी आहे' आणि 'कायदा गाढव आहे' [ Law is an ass ] असेही कुणी म्हणत होते प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय होती हें कुणालाच कळलें नाही

शेवटी वाटाण्यानीं घात केला.

तो दरोडा त्यानें बेमालूम घातला होता. पण दुपारी वाळत घातलेले वाटाणे अगणांत बाजूला तसेच पसरलेले राहिले होते, हें त्यानें पाहिले नव्हते. वाळत घातलेलें धान्य रात्री घरांत आणून ठेवण्यांत येतें असा त्याचा समज होता. वाळत घातलेले वाटाणे दिवसा त्यानें पाहिले होते पण रात्रींही ते तसेच असतील असें त्याला वाटलें नाहीं, म्हणूनच तो त्या रस्त्यानें धांवत गेला

धांवत जात असता त्याची पावलें कधीच वाजत नसत. पण हलकेच टाकलेली चोरपावलेंसुद्धां वाटाण्यांवरून सरकलीं आणि तो चटूकन् खाली पडला.

उठायचा त्यानें प्रयत्न केला पण पुन्हां वाटाण्यांनीं दगा दिला—तो पुन्हा पडला. त्याचा धक्का लागून उभ्या असलेल्या कडब्याच्या जुड्या कोसळून पडल्या, त्यांचा आवाज झाला लोक धांवून आले. 'एस एल् टकले एस्क्वायर बी ए' याला चोर म्हणून पकडण्यांत आलें.

जिकडे तिकडे खळबळ उडाली मुद्देमालानिशीं सांपडल्यामुळें सखारामाचें कांहीं चाललें नाहीं. त्याला शिक्षा झाली

आज तो तुरुंगांत आहे. तुरुंगातून सुटून आल्यावर सेकंड एल्एल्. बी च्या परीक्षेला तो बसणार आहे.

बिगरपरवाना दरोडे घालण्यापेक्षां सनदशीर दरोडे घालण्याचा धंदा जास्त सुरक्षित आहे असें आतां त्याला पटलें आहे

# दुःख आणि सुख !

सुख आणि दु.ख यांची व्याख्या परिस्थितिसापेक्ष असते एकाचें सुख तें दुसऱ्याचें दुःख होतें केव्हां केव्हां तर दुसऱ्यांच्या दु खावर एकाचें सुख अवलंबून असतें. सुखाची व्याख्या करतांना मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यानादेखील निश्चित असें कांहीं सांगतां आलेलें नाहीं. अशा वेळीं आपण सुखी आहों कीं दु.खी आहों हें सांगावें कसें ?

तिचा नवरा दारुड्या होता रोज संध्याकाळीं कामावरून आल्यावर बायकोला मारणें हा त्याचा एकाद्या कर्मठ ब्राह्मणाच्या संध्यावदनाइतका नित्यक्रम होऊन बसला होता मुलांना त्यानें मारूं नये म्हणून तो येण्यापूर्वीच तीं झोंपी जातील याबद्दल ती खबरदारी घेत असे. तरीही वेळीं अवेळीं तीं त्याच्या माराच्या तडाक्यांतून सुटत नसत. आईला बराच मार बसतो हें अशा वेळीं त्यांना कळून येई.

त्या मुलांनासुद्धां बापाचा तिटकारा आला होता तो दारू न पितां आला तरीदेखील तीं मुलें थरकांप घाबरून जात असत.

दारूचा अम्मल नसेल त्यावेळीं त्याच्यासारखा प्रेमळ कुणी नव्हता पण त्याच्या त्या प्रेमळपणांत अंःतकरणाचा ओलावा फारच थोडा असे. आपण दारुड्या आहों, त्यामुळें लोक आपला तिटकारा करतात, म्हणून आपण ज्या वेळीं दारू प्यालेली नसेल त्या वेळीं तरी लोकांनीं आपला तिटकारा करूं नये, या हेतूनें तो प्रेमळपणाचा आव आणीत असे, एवढेंच.

त्या प्रेमळपणाच्या आवालाही त्याचीं मुलें भीत असत. मनुष्यस्वभावाची सूक्ष्म रूपें जितकीं मुलांना कळतात, तितकीं तीं जगाच्या अनुभवानें बथ्थड बनलेल्या प्रौढ माणसांनादेखील कळत नाहींत. सारासार विचार करण्याकडे अनुभवी माणसांची प्रवृत्ति साहजिकच असते; आणि त्या प्रवृत्तीच्या धोरणानेंच कोणत्याही

व्यक्तीबद्दल आपलें मत ठरवीत असतात मुलांचें तसें नसतें जगाचा अनुभव त्यांना आलेला नसतो अनुभवाचे धक्के खाऊन त्यांच्या बुद्धीला दार्ढ्य आलेले नसते अंत.करणाची स्फूर्ति हीच त्यांची बुद्धि. मनांत एकाद्या व्यक्तीबद्दल आदर किंवा अनादर सहजासहजी उत्पन्न होणें, आणि त्याच्या अनुरोधानें एकाद्या व्यक्ती-बद्दल मते ठाम ठरविणे हीच अल्पवयी मुलांची प्रवृत्ति असते त्या प्रवृत्तीला अनुसरूनच त्याच्या मुलांनीं त्याची भीति घेतली होती

त्याच्या कुरवाळण्यानें सुद्धां तीं शिरारत असत. हाच कुरवाळणारा प्रेमळ हात सध्याकाळी आपल्याला आणि आपल्या आईला मरेमरेपर्यंत मार देत असतो, हें विसरण्याइतका बुद्धीचा प्रगल्भपणा त्यांच्या ठिकाणी आलेला नव्हता

त्यांना आश्चर्य वाटे तें हेंच, की आपल्याला जसें वाटतें तसें आपल्या आईला कां वाटत नाहीं ?

....आणि म्हणूनच मोटारीखालीं सांपडून ज्या दिवशी तो मेला आणि त्याचें प्रेत ज्यावेळीं घरीं आणण्यांत आले, त्यावेळी त्या मुलाना हायसें वाटलें.

ती धाय मोकलून रडत होती, ऊर बडवीत होती, डोकें फोडून घेत होती जमलेले लोकसुद्धां तिच्याकडे पाहून करुणात्मक उद्गार काढीत होते. पण त्या मुलांना मात्र आनद झाला होता.

त्याना वाटे, का आईनें रडावें ? दररोज येऊन मारीत होता, आतां तो त्रास तरी चुकला आता तिलाही मार बसणार नाहीं किंवा त्यांनाही बसणार नाहीं.

बिचाऱ्या मुलांची तेवढीच दृष्टि होती आणि तेवढ्याच दृष्टीनें बाप म्हणविणाऱ्या त्या व्यक्तीकडे तीं पहात असल्यामुळें त्याच्या मृत्यूमुळें त्यांना कांहीं दुःख झालें नाहीं.

तिला दुःख होत होतें खरें, पण तें त्याच्या मृत्यूमुळें होतें काय ? कुणी हा प्रश्न केला असता, तर त्याचें उत्तर तिला देतां आलें नसतें. ज्या कुणी विधवा नवऱ्याच्या मृत्यूमुळें रडत असतात, त्या नवऱ्याच्या प्रेमासाठींच कां ?

लोक असें समजतात. पण वस्तुस्थिति तशी आहे का ?

ती पांढरपेशी बाई होती पुनर्विवाह होण्याची तिला आशा नव्हती पण पुनर्विवाह होण्याची आशा असलेल्या कुणबी बायासुद्धां नवरा मेला म्हणून नाहीं का रडत ? तें त्याच्या प्रेमामुळेंच का ? प्रेमामुळें रडत असल्या तर डोळ्यांत

आपल्या मुलाना होणार नाहीं ?

पण ती मुले सालस होतीं अधाशी नजरेनें शेजारच्या मुलांच्या खेळण्याकडे जरी ती पहात, तरी त्या खेळण्यांचा अपहार करण्याची बुद्धि त्या मुलांना कधीं झाली नाहीं असलीं खेळणीं आपल्याला पाहिजेत असे उद्‌गार देखील त्यांनी कधीं काढले नाहींत आणि म्हणूनच या रकमेंतून तिनें आपल्या मुलासाठी खेळणी घेतलीं. आणि म्हणूनच तो पैशांचा अपव्यय झाला असे तिला वाटलें नाही

पुढें काय करावें हा एकच प्रश्न सारखा तिच्यासमोर उभा राहिला होता. तिला माहेरचें असें कुणी नव्हतें. सासरच्या माणसांशी संबध ठेवायची तिची इच्छा नव्हती. आणि इच्छा असती तरी तें शक्य झालें नसतें तिच्या दारुड्या नवऱ्याच्या स्वभावाच्या विचित्रपणामुळें आपल्या माणसाशीं तो केव्हांच पारखा झाला होता. तो हयात असतांना जिथें ही स्थिति, तिथें तो मेल्यावर त्याच्या कुटुंबाचा भार घ्यायला कुठला भाऊबंद तयार होईल?

तिनें ती अपेक्षाही केली नव्हती आणि त्यानीं केलेल्या उपेक्षेचें तिला वाईटही वाटलें नाहीं.

कांहीतरी नोकरी करावी असें तिच्या मनांत आलें पण नोकरी कसली करणार ? व्हर्नाक्युलर फायनलचीसुद्धां परीक्षा ती पास झाली नव्हती. आणि पास झालेली असती, तरी मास्तरणीची नोकरी मिळणें काय सोपें होते ? इतर देशातून प्राथमिक शिक्षण सर्वस्वी स्त्रियांच्या हातीं असल्यामुळें तिथें स्त्रियांना शिक्षकिणीची नोकरी मिळू शकते तसे हिंदुस्थानांत नाही यामुळें प्राथमिक शाळेंतील शिक्षकिणीची नोकरी तिला मिळाली नाही परीक्षा पास झाली नसली तरी पहिल्या दुसऱ्या यत्तेला शिकवण्याइतकी तिची योग्यता होती एकाद्या खाजगी शाळेंत तिला अशी नोकरी मिळाली असती तर ?...

पण तशा खाजगी शाळा तरी कुठें आहेत ?

काय करावें हें तिला सुचत नव्हतें सैंपाकपण पत्करावे तर तीन मुलांचें लेढार घेऊन तिला कोण पोसणार होतें ! सैंपाकपण पत्करून बिऱ्हाड घेऊन तिथें मुलांना ठेवलें तरी बिऱ्हाड चालविण्याइतका पैसा का तिला सैंपाकपण करून मिळणार होता ? तिने तशी चौकशी करून पाहिली...अगदीं निर्दयपणें तिच्या मनांत विचार आला, तो मेला तशीं हीं मुलेंही मेलीं असतीं तर !

...तिच्या अंगावर शहारे आले दारिद्र्यानें माणूस निर्दय होतो! किती कठोर होतो ! किती राक्षस होता ! ! काय करायचें ?...करायचें काय ?

अशा परिस्थितीत पुन्हां लग्न करण्याखेरीज दुसरा कोणताच उपाय तिला दिसेना पण तीन मुलांचें लेंढार घेऊन तिच्याशीं लग्न करायला तयार होणारा असा हरीचा लाल कोण भेटणार तिला ? ..

विधवा–विवाह–सहाय्यक संस्थेकडे जाऊन तिनें तपास केला तिच्याबद्दल जाहिरात देण्यांत आली तिच्याच इच्छेप्रमाणें तिला तीन मुलें असल्याचें त्या जाहिरातींत स्पष्टपणें लिहिलें होतें. पण तेंच तिच्या दु खाला कारण झालें

कदाचित् तिनें फसवाफसवी केली असती, तर कुणी ना कुणी तिची चौकशी तरी केली असती. पण जाहिरातींतच तिला तीन मुले असल्याचा उल्लेख केलेला असल्यामुळें कुणीच तिची फारशी चौकशी करायला तयार होईना विधवा–विवाह–सहाय्यक मंडळाच्या प्रमुख बाईने तिचे लग्न व्हावे म्हणून पुष्कळाच्या विनवण्या केल्या मुलें असलेल्या पुरुषाची लग्नें होतात मग मुले असलेल्या स्त्रीचें पुनर्लग्न तशाच परिस्थितींत कां होऊं नये ?

बुद्धिवादाच्या दृष्टीनें सर्वांना हें पटत होतें. पण व्यवहाराच्या दृष्टोने कुणीच तें पत्करीना.

पैसे संपत येत होते तसतशी ती घाबरून जात होती आपल्यापुढें काय वाढून ठेवलें आहे हें तिला कळत नव्हतें.

जाहिरातीवरून मंडळाकडून पत्ता काढून एक गृहस्थ तिला भेटायला आला. त्यानें मंडळांत तिचा फोटो पाहिला होता तो फोटो पाहिल्यामुळे त्याच्या मनांत त्या बाईविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली होती. पण ती सहानुभूति लग्नाची नव्हती

त्यानें तिची भेट घेतली आणि आपले इच्छित तिच्यासमोर स्पष्टपणें मांडलें

त्याचें भाषण ऐकून तिला धक्का बसला. तिनें त्याच्याकडे पाहिलें, मुलांकडे पाहिलें. पैसे संपले होते. पैसे संपून एक महिना झाला होता. खोलीच्या भाड्यासाठीं घरवाल्याकडून तगादा लागला होता. एक दोन दिवसांत कदाचित् तिला त्या खोलींतून बाहेर काढून लावण्यांत येण्याचा संभव होता. तिनें त्याला होयही म्हटले नाहीं आणि नाहींही म्हटले नाहीं.

“नीट विचार कर.” तो म्हणाला, “तुझं लग्न होणं शक्य नाही.

मुलांचं लेंढार घेऊन कुणी तुझ्याशीं लग्न करणार नाहीं. तसं असतं तर मीही तुझ्याशीं लग्न केलं असतं पण तसं शक्य नाहीं. माझं लग्न झालेलं आहे. माझी बायको घरीं आहे. ती आज कित्येक वर्षं कॅन्सरनं बिछान्याला खिळलेली आहे. मी कांहीं मोठा शुक्राचार्यांचा अवतार नाहीं. तसंच घाणीचा अवलंब करण्याइतका निगरगट्ट बनलों नाहीं. मी तुला नुसतं तोंडी सांगत नाहीं, लिहून देतों. तुझ्या जन्माची तरतूद करतों. ज्या प्रसंगांत तू आहेस त्याच प्रसंगांत मी आहे, असं समजून माझ्यावर उपकार कर कोणत्याही बाजींत शिरणारा मी नाहीं. बाज्यांचा मला तिटकारा आहे पण परिस्थिति अशी आहे,कीं मला सांसारिक सुखाशिवाय रहातां येणं शक्य नाहीं. कुणाला कांहीं कळणार नाहीं. आणि कळलंच तर आपल्याला कांहीं वाटणार नाहीं अशी तुझ्या मनाची जर तयारी होत असेल, तरच होय म्हण. केवळ पैंचाच्या परिस्थितींत सांपडल्यामुळं आज मला होय म्हणून उद्या तुला पश्चात्ताप करण्याची पाळी यावी, अशी माझी इच्छा नाहीं ”

तिच्या डोळ्याला पाणी येऊं लागलें. तिला हुंदका आला. नवऱ्याचें प्रेत आणलें त्यावेळीं तिला रडू आलें होतें, त्या रडण्याची तिनें आतांच्या रडण्याशीं तुलना करून पाहिली तिचें तिलाच आश्चर्य वाटलें. त्याही रडण्यांत आनंद होता, पण तो वेगळ्या प्रकारचा होता.

तिला प्रश्न पडला. चार दिवसांनी तिनें त्याला बोलावलें होतें. मुलांना दूर करायला ती तयार नव्हती...त्याचाही त्याबद्दल आग्रह नव्हता.

येतांना मुलांसाठीं कांही खेळणीं घेऊन तो आला होता. तीं खेळणीं मुलांना देत ती म्हणाली, “ पाहिलंत रे पोरांनों, कशीं सुंदर खेळणीं आहेत ! ”

“ कुणीं दिलीं तीं ? तूंच का आणलींस ? ” मुलांनीं विचारलें.

डोळ्यांत आलेला एकच अश्रु पदरानें पुसून ती मुलांना म्हणाली,

‘ मीं नाहीं बरं ! मी कुठून आणूं ? कुठं आहेत माझ्याकडे पैसे ? तुमच्या बाबांनीं आणलीं आहेत तीं ? ”

“ बाबांनी ? ” मुलांनीं विचारलें. “ कुठल्या बाबांनी ? ”

तिनें त्या गृहस्थाकडे बोट केलें.

मुलें जाऊन त्याला बिलगलीं.

# दोन दृष्टी !

तिनें ज्या वेळीं वकिलीची सनद काढली त्यावेळीं बारमध्यें बरीच गडबड उडाली.

अगदीं पहिलीच वकिलीण म्हणून ती आली होती असें नाहीं त्यापूर्वी एकदोन स्त्री-बॅरिस्टर्स व ॲडव्होकेट कुणातरी वकिलाच्या किंवा बॅरिस्टराच्या सहाय्यानें वकिली करूं लागल्या होत्या पण महाराष्ट्रीय वकील या नात्यानें ही पहिलीच बाई आल्यानें महाराष्ट्रीय वकिलांत खळबळ उडाली होती. पारशी-गुजराती वकिलांना त्याबद्दल विशेष कांहीं वाटलें नाहीं. किंबहुना त्यांच्यापैकीं कित्येकांनीं तिचें अभिनंदनच केलें.

बाररूममध्यें सर्वच वकील एका जागीं गोळा होत असत. पारशी बायांना पूर्वीपासूनच पुरुषांत खेळीमेळीनें मिसळण्याची संवय असल्यानें बाररूममध्यें त्या वेगळ्या पडत नसत. महाराष्ट्रीय माणसें आधींच स्त्रीजातीच्या बाबतींत संकोच धरणारीं, त्यांतून ॲडव्होकेट बनून आलेली एक स्त्री आतां आपल्यासमोर उभी राहून कोर्टात दावे चालविणार या जाणिवेनें खवळलेलीं. कुचाळक्या करण्यांत महाराष्ट्रीयांचा हात सहसा कुणी धरणार नाहीं.त्यांतूनही त्या कुचाळक्या स्त्रीविषयक असतील—सुशिक्षित स्त्रीविषयक असतील—तेव्हां त्यांच्या कल्पनाशक्तीला चांगलाच बहर येतो.

तसेंच तिच्या बाबतींत झालें. कुणाशीं बोलावें याची तिला पंचाईत पडली.

कॉलेजांत असतांना कॉलेजच्या आवारांत—विशेषतः क्लासांत—विद्यार्थ्यांचा व विद्यार्थिनींचा संबंध मुळींच येत नाहीं. मेडिकल कॉलेजांत विद्यार्थी-विद्यार्थिनी सहज मिसळतांना दिसून येतात. पण आर्ट्स् कॉलेजमध्यें विद्यार्थिनींची जागाच मुळीं राखीव असल्यामुळें क्लासांतून बाहेर पडेपर्यंत विद्यार्थिनींचा विद्यार्थ्यांशीं भाषण-

प्रसगदेखील येऊ शकत नाहीं. बाहेर पडल्यावर इतर विद्यार्थ्यांशीं खेळीमेळीनें वागणे देखील विद्यार्थिनींना अवघड जाते जरा कुठें विशेष सलगी दिसली, की तिला फांटे फुटून तिचा इतका विपर्यास करण्यात येतो की त्यापेक्षां आपण आपला विद्यार्थ्यांशी सबंध ठेवू नये, असे साधारण मनोवृत्तीच्या विद्यार्थिनीला वाटू लागते.

अशा साधारण मनोवृत्तीच्या विद्यार्थिनींपैकी ती एक होती म्हणूनच बाररूममध्ये येऊन बसण्याचा प्रसग आला त्यावेळीं ती बावरून गेली. इतर पुरुष वकिलांप्रमाणे आपणही एक वकील आहो ही जाणीव जरी तिच्या हृदयांत अधिष्ठित झाली होती, तरीही पुरुष वकील तसे मानायला कुठे तयार होते ?

देवळाच्या सभामंडपात शिरणारा महार आणि बाररूममध्यें शिरणारी स्त्री, त्यांच्या नजरेला सारखीच होती ! तिच्याबरोबर कॉलेजात असलेले व तिच्या-बरोबर पास झालेले वकीलही तिच्याबरोबरच सनदा घेऊन प्रॅक्टीस करू लागले होते. कॉलेजांत असतांना त्याची तिची तोडओळख होती. त्याच्याशी बोलण्याचा उपक्रम करायचा ती जेव्हां जेव्हा प्रयत्न करी, तेव्हां तेव्हां ते काहीं ना कांहीं कारण काढून निसटून जात असत

ही तिची परिस्थिति कांहीं वयोवृद्ध पारशी वकिलांच्या नजरेला आली, त्यावेळी त्यांनी आपण होऊनच तिचें स्वागत करायला सुरवात केली आणि हळुहळू तिलाही त्यांच्याबद्दल परकेपणा वाटत नाहींसा झाला. प्रौढ पारशाबरोबरच तरुण पारशी वकीलही तिच्या परिचयाचे होऊ लागले आणि त्यांच्याबरोबर बसून ती गप्पागोष्टी करूं लागली

परकेपणाचें वारें—एकटेपणाची भीति—बहुतेक तिच्या अंत करणांतून नाहींशी होऊ लागली होती पारशी वकिलांत बसण्याचा सराव झाल्यामुळें अर्थातच तिला इंग्रजींत सभाषण करावें लागे आणि त्यामुळें मराठी वकिलांत ठळकपणें दिसणारी इग्रजी संभाषणपद्धतीची उणीव तिच्यात आपोआप भरून निघत होती. हा एक फायदाच झाला असें तिला वाटलें.

इकडे महाराष्ट्रीय वकील तिची सारखी कुचाळकी करीत होते. तिला आपणच दूर केलें याची पूर्ण जाणीव असतांही आपले लोक सोडून ती पारशांत मिसळते म्हणून नांवें ठेवू लागले होते ही त्यांची चर्चा जशी तिच्या कानीं जात होती तशीच तिच्या नवऱ्याला कळूं देण्याची हे लोक तत्परता दाखवीत होते.

तिचा नवरा एक मास्तर होता चांगल्या श्रीमंत कुटुंबांत जरी तिचा जन्म झाला होता तरीही योगायोगानें ती गरिबाऱ्याच घरीं पडली होती.

तो कांही प्रीतिविवाह नव्हता. तिचे लग्न जरी साधारणपणें बऱ्याच प्रौढ वयांत झाले होतें, तरीही घरच्या मडळीच्या रहाणीमुळे जुन्या पद्धतीने हा शरीर-संबंध घडून आला होता श्रीमत माणसानीं गरिबाच्या घरीं आपली मुलगी कां दिली, याचें शेजाऱ्यापाजाऱ्यांना आश्चर्य वाटे.

पण कुलशीलाचा प्रश्न पहातांना सनातनी वृत्तीचीं माणसें संपन्नतेकडे जितकें द्यावें तितके लक्ष देत नाहीत, हे आजच्या पिढीला कुठें माहीत आहे ?

पहिल्यापासून तो एक हुशार विद्यार्थि म्हणून समजला जात होता प्रत्येक परीक्षेत तो फर्स्ट क्लासांत येत होता अशा नाणावलेल्या विद्यार्थ्याला मुलगी द्यायची नाही तर कुणाला द्यायची ?

बी. ए ची परीक्षा झाल्यावर परिस्थितीने त्याला नोकरीला गुंतविलें. युनिव्हर्सिटी करीअर मागल्यामागें पडली पोटाचा उद्योग सुरू झाला. तो नांवाजलेला विद्यार्थि होता म्हणूनच त्याला एकदम साठ रुपयांची नोकरी मिळाली

सासऱ्याची मदत त्याने घेतली असती तर त्याला आपला अभ्यासक्रम पुढें चालवितां आला असता पण तो मानी पुरुष होता परक्याच्या उपकारात रहाणें त्याला पसत नव्हतें शाळेंत नोकरी करूनही त्याला कायद्याचा अभ्यास करता येणें शक्य होतें पण वकिली करायची आपली वृत्ति नाही ही जाणीव असल्यामुळे त्यानें तो मार्ग पत्करला नाहीं.

तरीही माहेरच्या मदतीनें पुढला अभ्यास चालविण्याला त्यानें आपल्या बायकोला अडथळा केला नाही लग्न झाल्यानंतर दोन वर्षांनी ती बी ए. झाली व नंतर एल् एल्. बी. झाली. सुदैवाने मातृपदप्राप्तीचा लाभ न झाल्यामुळें तिला एवढी मजल झेपतां आली.

तें मोठें प्रेमळ जोडपें होतें एकमेकांपलिकडे त्यांना कांहीं दिसत नव्हते प्रीतिविवाह नसूनही त्या जोडप्यामध्यें दिसणारा प्रेमळपणा पाहून सर्वांना कौतुक वाटे.

प्रत्येक बाबतींत एकमेक एकमेकांना मदत करीत असत. शाळेंतील विद्यार्थ्यांच्या एक्झरसाइजबुकांच्या चळथी तपासायला ती जशी त्याला मदत करीत असे, तसाच तोही जेवण करायला, केरपोतेरें करायला, किंबहुना धुणीं

धुवायलाही तिला मदत करीत असे.

शेजारी म्हणत, "मुलगी श्रीमंताची कीं नाहीं? तेव्हां एवढी तिची काळजी घेतो तो. परवां प्रत्यक्ष आम्ही डोळ्यांनीं पाहिलं तिचं लुगडं धूत होता तो. आतां काय म्हणावं या सुशिक्षित माणसांना? आतां ती म्हणे वकिलीण होणार. आणि मग हा मास्तरकी सोडून तिची कारकुनी करणार!"

दुसऱ्या शेजाऱ्यांनीं म्हणावें, "आपल्याला बुवा त्यांत कांहीं गैर दिसत नाहीं. काय झालं लुगडं धुतलं तर? रोज ती नाहीं का त्याचीं धोतरं धूत? दोघांनाही चुलीजवळ बसून जेवण करतांना पाहिलं म्हणजे आपल्याला तर बुवा आनंद वाटतो. कधीं भांडण नाहीं, तंटा नाहीं, रुसवा फुगवा एवढासुद्धां नाहीं. श्रीमंताची मुलगी, कॉलेजांत जाणारी, धुणींभांडीं स्वयंपाकपाणी सारं कांहीं स्वतः करते. मग एकादे दिवशीं नवऱ्यान केलं तिच काम, तर त्यांत काय बिघडलं? आणि तो तक्रार करतो आहे का? सक्तीनं करतो आहे का तें काम? नाहीं ना? मग तुम्हां-आम्हांला याबद्दल एवढं वाईट कां वाटावं?"

वकिली करूं लागल्यापासून मात्र तिला घरकाम करतां येईना. तेव्हां खानावळींतून डबे आणून जेवणें भाग पडलें. स्वयंपाकी ठेवण्याइतकी त्याची अजून सुस्थिति नव्हती तशी तिची प्रॅक्टीस तरी कुठें चालत होती? त्याच्या पगारांतल्या साठ रुपयांपैकीं घरभाड्यालाच पंचवीस रुपये जात. ऑफीस कसें थाटायचें याचीच मोठी पंचाईत पडत होती पण तिची प्रॅक्टीस चालेपर्यंत ती जबाबदारी तिच्या बापानें अंगावर घेतली. एकादा कारकून तर ठेवलाच पाहिजे होता. अगदीं दरिद्रीपणानें वागून कुठें कशीं मिळणार? दुसऱ्या वकिलाच्या हाताखालीं काम करणें तिला पसंत नव्हतें सुदैवानें तिचा जम चांगला बसूं लागला. बऱ्याचशा बायकांच्या केसिस तिच्याकडे येऊं लागल्या. बायका बहुधा पारशी किंवा ख्रिस्ती असल्यामुळें त्या समाजांत तिचा परिचय जास्त होऊं लागला. आणि म्हणूनच ती आपलीं माणसें टाकून परक्या माणसांत मिसळे याबद्दल तिची कुचाळकी करण्यास तिच्या जोडीदार वकिलांना संधि मिळाली.

आपल्याबद्दल कोण काय म्हणतात हें ऐकून घ्यायचें नाहीं—ऐकूं आलें तर मनाला लावून घ्यायचें नाहीं—असा तिनें निर्धार केला होता.

तिच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं असें पाहून कुचाळ लोकांनीं आपला

मोर्चा तिच्या नवऱ्याकडे वळविला. पण तोही तितकाच मख्ख होता. कुणी कांहीं सांगितलें तरी तें ऐकून घ्यायचें नाहीं, कुणी जास्तच लगट केली तर त्याला धुडकावून लावायचें, असें त्यानें ठरविलें होतें.

त्यामुळेंच त्यांचा संसार सुखाचा झाला.

त्याच्या पगारांत जरी फारशी वाढ झाली नाहीं तरी तिची प्रॅक्टीस मात्र जोरांत चालली होती. घरीं नोकर स्वयपाकी आले, इतकेंच नव्हे, तर थोडक्याच दिवसांत स्वतःची मोटर घेण्याची ऐपत तिला प्राप्त झाली.

तेंच सर्वांच्या डोळ्यांत सलत होतें. वकील म्हणून मिरवायला आली, पण फटफजिती होऊन पुनः कुठेंतरी मास्तरीण व्हायला ही जाणार असें भविष्य ज्यांनी वर्तविलें होतें त्यांचीं तोंडें तिच्या भरभराटीमुळें काळीं ठिक्कर पडलीं.

तिची जी एवढी भरभराट झाली ती परकी माणसांच्या सहानुभूतीनें झाली. महाराष्ट्रीयांनी तिच्या मदतीचा फायदा कधींच घेतला नाहीं. आणि म्हणूनच तिची यशस्विता त्यांना डांचत होती.

कर्तव्याच्या तीक्ष्ण जाणिवेनें ती आपला व्यवसाय चालवीत होती. त्यामुळें बारमधें तिचें वजन चांगलेंच बसलें. न्यायाधीशही मुक्तकंठानें तिची तारीफ करीत.

त्या दिवशी एक खुनाचा खटला चालू होता. आरोपींतील एका स्त्री-आरोपीच्या वतीनें ती काम चालवीत होती त्या दिवशीं तिचें बचावाचें भाषण होणार होतें. पण ती कोर्टांत आली त्याच वेळीं तिला कळलें, कीं जज्जाची पत्नी त्याच दिवशी कैलासवासी झाली. सर्वांचा समज होता, कीं जज्जसाहेब अर्थातच कोर्टांत येणार नाहींत. पण कोर्टाची वेळ होतांच नित्याप्रमाणें जज्जसाहेब ज्यावेळी येऊन आसनाधिष्ठ झाले त्यावेळी सर्वच आश्चर्यचकित झाले खटला चालू झाला.

सर्व कामें सुरळीत सुरू होतीं. जसें कांहींच घडलें नाहीं अशा वृत्तीनें शान्तपणानें जज्जसाहेब खटला ऐकून घेत होते.

मधल्या सुट्टीत बाररूममधें तोच एक चर्चेचा विषय झाला. जो तो तोंड फाटेपर्यंत जज्जसाहेबांची स्तुति करीत होता.

फक्त पटत नव्हतें तिलाच. एक वृद्ध पारशी बॅरिस्टर ज्यावेळीं जज्जांची तारीफ करूं लागले त्यावेळीं ती म्हणाली, " मला मोठा प्रश्न पडला आहे. कोणतं

कर्तव्य श्रेष्ठ ? कोणत्या कर्तव्याला महत्त्व द्यायचं ? सांसारिक कीं सार्वजनिक ? ”

त्या म्हाताऱ्यानें सांगितलें, “ सार्वजनिक जीवनाला ज्यान आयुष्य वाहिलं आहे त्यानं संसाराकडे पाठ फिरवली पाहिजे. त्यांतच त्याची कसोटी आहे. समुदायाच्या सुखदु.खापेक्षां व्यक्तीच्या सुखदु.खाला जो महत्त्व देतो त्याच्या हातून सार्वजनिक कार्य होणार नाही. आज जज्जसाहेब आले नसते तर कुणी दुसरा जज्ज येऊन बसता, किंवा एकादा दिवस खटला तहकूब ठेवतां आला असता. पण तो का ठेवायचा ? गेलेला जीव कांहीं परत येत नाही त्याच्यासाठी अश्रू ढाळीत घरीं बसण्यापेक्षां कोर्टात येऊन आपल्या कामाला लागल्यानच दु खाची विस्मृति होईल हें माहीत असल्यानंच आज ते घरीं राहिले नाहींत कर्तव्याची कठोर जाणीव त्यांच्या अंगीं आहे, आणि म्हणून ते आले, असं हें सारे लोक म्हणतात, ते मला पटत नाहीं. कर्तव्याची जाणीव असेल. ती कठोरही असेल. पण त्याहीपेक्षां यात त्यांचा जास्त स्वार्थ आहे स्वार्थ या शब्दाचा अर्थ तसा घेऊं नका तो लक्षणेनें पाहिला पाहिजे अस येण्यांतच समाधान आहे कामाला जुंपून जाण्यांतच समाधान आहे. घरीं रडत बसून काय मेलेला जीव परत येतो आहे— ? ”

तिला कसेंसेंच वाटलें त्या म्हाताऱ्याची तर्कपद्धति तिच्या बुद्धीला पटत होती. पण भावनेला बिलगत नव्हती घरी आल्यावर नवऱ्याबरोबर तिनें या विषयाची चर्चा केली. तो म्हणाला, “ वा रे मर्द ! माणूस पाहिजे तर असा जगांत काहीं विशेष करून दाखवितात तीं असलींच माणसं ! दु·ख कुणाला होत नाहीं ? मृत्यूनं कुणाला सोडलं आहे ? वैयक्तिक दुःखासाठीं सामुदायिक कार्याला व्यत्यय आणायचा, हें नादानपणाचं लक्षण आहे. एकाच्या दुःखासाठीं शभर माणसांनीं कां रडत बसावं ? एकानं आपलं दु ख उराशीं कवटाळून इतरांचं नुकसान कां करावं ?—इतरांना देखील कां रडत बसायला लावावं ? ”

म्हाताऱ्या बॅरिस्टरची विचारसरणी तिला पटली नव्हती पण नवऱ्याच्या तोंडचे ते उद्गार तिच्या अंतःकरणाला झोंबले माणूसकीच्या दृष्टीनें या गोष्टीचा विचार करावा असें तिला वाटूं लागलें.

तिला प्रश्न पडला तो हा, कीं आवडती पत्नी मेली असतांना कोर्टांत येऊन हजर राहण्यात जज्जसाहेबांची दृष्टि स्वार्थाची होती कीं कठोर कर्तव्याची होती ?

या प्रश्नाचें निराकरण तिला करतां येईना. नवऱ्याचें बोलणें तिला पटत

होतें पण मनांत शका उत्पन्न होत होती तिला वाटे, कर्तव्याच्या कठोरपणापेक्षां यात पुरुषी वृत्तीचा कठोरपणा जास्त आहे.

दुसऱ्या दिवशी जज्जसाहेबांच्या घरी ज्यावेळीं ती इतर वकील-बॅरिस्टरांबरोबर दु खप्रदर्शनासाठी म्हणून गेली, त्यावेळी हा प्रश्न त्यांनाच करावा असे तिला वाटले

औपचारिक दु खप्रदर्शन झाल्यावर सर्व मंडळी गेली, पण ती गेली नाही. कित्येकांना ते मोठें चमत्कारिक वाटले कित्येकांनी नाक डोळे मुरडून तिच्यासमोर आपल्या मनोवृत्तीचे प्रदर्शन करायलाही कमी केलें नाही पण कुणाच्या टीकेला भीक न घालायची सवय तिच्या अगवळणी पडली होती सारे गेले नि ती राहिली असें पाहून जज्जसाहेब म्हणाले, " काही विशेष काम आहे का ? "

प्रश्नाचा उपक्रम करणे तिला फार कठीण गेले भीतभीतच कां होईना, पण मनाचा निर्धार करून ज्यावेळी तिनें तो प्रश्न त्यांच्यापुढे मांडला त्यावेळी ते म्हणाले, " तुझा प्रश्न ऐकून मला मोठा आनंद झाला मुली, इथ मी जज्ज नाही आणि तूंही वकील नाहीस एक वडील माणूस या नात्यानं तुझ्या प्रश्नाच उत्तर देत मी आहें संकटं कुणावर येत नाहींत ? पण त्या संकटांत वागाव कसं हे सर्वांनाच कांही कळत नाही त्या वेळच वर्तन मन पूत पाहिजे. मग लोक कांही का म्हणेनात ! तुझा प्रश्न ऐकून मला फार आनंद झाला. ऐक मुली, आवडती पत्नी कायमची अतरली असता मी जो कोर्टांत गेलों, तो कर्तव्याच्या जाणिवेनं, की मनाला विरंगुळा व्हावा या स्वार्थानं, कीं पौरुषाच्या अभिमानानं, हें मला कांही सागतां यायच नाही. सूक्ष्म दृष्टीन मनाशीं विचार केला, तर मला असं वाटतं, कीं त्या माझ्या जाण्याच्या मुळाशीं तिन्ही भावना आहेत त्या तिन्ही भावनांच्या तीव्रतेचं प्रमाणही मला वाटतं अगदीं सारखं आहे कर्तव्याची जाणीव, समाधानाचा स्वार्थ आणि पौरुषाचा अभिमान यांनीं सारखीच चेतवणी दिली, म्हणूनच दु ख बाजूला सारून मी कोर्टांत गेलों "

ती म्हणाली, " पहिल्या दोन भावनांबद्दल माझा प्रश्न नाही. पण तिसऱ्या भावनेच काय ? हा पौरुषाचा अभिमान फक्त पुरुषांनीच का बाळगायचा ? स्त्रीजातीला अशा प्रसंगीं कोणत्या अभिमानाचा आश्रय करतां येईल ?

एक मोठा सुस्कारा टाकून जज्जसाहेब म्हणाले, "प्रश्न मोठा कठीण आहे. मी पुरुष आहें, आणि कठोरपणा हा पुरुषासाठीं आहे असा माझा समज आहे.

दुःखाच्या प्रसंगी कठोर होऊन स्त्री दुसऱ्या पुरुषाचं सांत्वन करायला समर्थ होते हें मीं पाहिलं आहे. पण स्वतःवर तो प्रसग आला तर तिनं काय कराव, हे परिस्थिति पाहून तिचं तिनं ठरवाव. यापेक्षां मला जास्त कांहीं सांगतां येणार नाहीं ”

या उत्तरानें तिचें समाधान झालें नाहीं.

जज्जाशीं झालेल्या संभाषणाची हकीकत तिनें ज्यावेळीं आपल्या नवऱ्याला सांगितली त्यावेळीं तो म्हणाला, “ कर्तव्याच्या कठोर जाणिवेपलिकडे मी इतर कोणत्याही भावनांना महत्त्व देत नाहीं आधीं सामुदायिक कर्तव्य, मग वैयक्तिक कर्तव्य, आणि मग सामुदायिक किंवा वैयक्तिक भावना, अशीच परंपरा आचरली पाहिजे.

ती जसजशी विचार करूं लागली तसतसें नवऱ्याचेंच म्हणणें तिला पटलें

या समस्येची पूर्ति करायचा प्रसंग आपल्यावर इतक्या लवकर येईल असें तिला वाटलें नव्हतें

तो प्रसंग आला. दोनच दिवसांच्या तडकाफडकी आजारानें तिचा नवरा तिला सोडून गेला.

दुसऱ्याच दिवशीं कोर्टांत तिची महत्त्वाची केस होती. चार पांच दिवस ती केस ती स्वतः चालवीत होती. शेवटच्या भाषणाचा आणि निकालाचा तो दिवस होता. अशा वेळीं दुसऱ्या वकिलावर केस चालविण्याचा भार टाकून किंवा मुदतीची मागणी करून कर्तव्य टाळणें तिला कठीण गेलें.

दुःखानें ती चूरमार होऊन गेली होती. पण तितक्याच काळजीनें तिची अशीलही हताश झाली होती. आधीं स्वतःचें दुःख कीं आधीं दुसऱ्याचें ?

ती कोर्टांत गेली आणि केस चालविण्यासाठीं उभी राहिली. ती उभी रहातांच निरनिराळ्या व्यक्तींच्या चेहऱ्यावर निरनिराळ्या छाया दिसूं लागल्या

खटला चालू झाला—तिचें भाषण झालें—निकाल देण्यांत आला—तिनें केस जिंकली !

ती बाररूममध्यें आली. कुणीच तिच्याशीं बोलेना. दुःख झुगारून कोर्टांत आल्यामुळें सांत्वनाचे औपचारिक प्रसंग आपोआपच टळले होते. म्हाताऱ्या पारशी बॅरिस्टरनें येऊन नुसतें तिच्याशीं हस्तांदोलन केलें आणि कांहींच न बोलतां ओठांशीं

आलेला हुदका आवरीत रुमालानें डोळे पुशीत तो म्हातारा निघून गेला

ती एका खुर्चीवर स्वस्थ बसून होती शून्य दृष्टीनें ती जमिनीकडे पहात होती. अत करणांत सुरू झालेल्या कालवाकालवीने तिचें हृदय धडधडत होतें.

तिच्या कानी शब्द आले, "त्याच्या मरणाचीच वाट पहात होती ती ऐशी रुपयांचा मास्तर ! जगला काय, मेला काय तिच्या हिशेबीं सारखाच. ऐशीं रुपयेवाले चार कारकून ठेवण्याची ताकद तिच्या अंगी आहे ती काय डरते आहे ? बर झाल मेला तो ! सुटला बिचारा ! आहेतच कीं तिचे पारशी मित्र आणि ख्रिस्ती अशील ! अहो तिला काय कमी आहे ? पैसा असला कीं सगळ्या उणीवा भरून येतात नवराच कशाला हवा ? पूर्वी तो तिचीं लुगडींसुद्धां धूत असे म्हणे घरचा गडी मेला म्हणून का कुणाला दुःख होत ? त्यांतलच हें—"

दुसरा कुणी म्हणाला, "अरे ती तिथं बसली आहे—ऐकते आहे."

पहिला म्हणाला, "मग ऐकेना का ? मी हा समोर बोलतों आहे पण मागून बोलणारे याच्यापेक्षांही पुढ जातात. कशाला हव आपल्याला ?"

दुसरा म्हणाला, "अरे पण तूंच ना जज्जसाहेबांचं अभिनंदन करायला गेला होतास ? आवडती बायको मेली तरी देखील ते कोर्टांत आले, म्हणून तूच ना तोंड फाटेपर्यंत त्यांची तारीफ करीत होतास ?"

पहिला म्हणाला, "अरे, पुरुष तो पुरुष आणि बायको ती बायको."

दुसरा म्हणाला, "मग हिला बायको म्हणण्यांत काय अर्थ आहे ? आम्हां पुरुषांच्या खांद्याला खांदा भिडवून जी आज भर कोर्टांत सामन्याला उभी राहिली आहे, तिला बायकांच्या नियमांनं कां मोजतां ?"

"तरीही ती बायकोच आहे !" असें म्हणून पहिला निघून गेला.

कोर्टाची वेळ संपल्यावर ती निघत असता जज्जांनीं तिची गांठ घेतली म्हाताऱ्या पारशाप्रमाणेंच त्यांनीं मोठ्या वात्सल्यानें तिच्याशीं हस्तांदोलन केलें ते म्हणाले, "मुली, तूं मला आज गुरू झालीस. माझी समस्या उकलली. कर्तव्याच्या जाणिवेंत स्त्री आणि पुरुष हा भेद नाहीं."

पतियोगाच्या दुःखानें गारठलेलें तिचें हृदय त्या वात्सल्यपूर्ण आश्वासनानें पुलकित झालें.

# लोखंडाचा रस !

भट्टी धगधगत होती तापलेल्या सूर्यासारखा लोखंडाचा रस त्यांतून सळसळत होता

रस ओततांना त्याचे बारिक बारिक तुषार चोहींकडे उडत होते. त्या तुषारांकडे त्याची सारखी नजर होती

त्या जागी काळोखाचें साम्राज्य जरी पसरलें होतें तरी धगधगणाऱ्या रसाचा जेवढा कांहीं प्रकाश पडत होता तेवढ्या प्रकाशांत त्याचा चेहरा भयानक दिसत होता—लांडग्याची क्रूरता त्याच्या चेहऱ्यावर आली होती

एकाद्या खुर्ची–टेबलावर बसून तो काम करीत असता, तर त्याचा चेहरा असा ओंगळवाणा दिसला असता का ? असा लांडग्यासारखा दिसला असता का ?

ती उग्रता त्या प्रकाशानें आली होती. तापलेल्या लोखडाच्या रसाची छाया त्याच्या चेहऱ्यावर पडली होती लोखंडाचा कठोरपणा त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झाला होता.

दांत ओठ खाऊन तो आपलें काम करीत होता त्याचा सारा जीव ह्यावेळीं त्याच्या डोळ्यांत आला होता. त्या रसापलिकडे त्याला कांही दिसत नव्हतें.

त्या रसाच्या भट्टींत जर फरक झाला असता तर सगळी भट्टी फुकट गेली असती—ही जबाबदारीची जाणीव त्याच्या हृदयांत त्या रसासारखीच धगधगत होती.

तितक्यांत कुणी त्याला हटकलें,—चमकून त्याने मागें पाहिलें. मुकादम त्याला तंबी भरीत होता. तंबी भरण्याचें कांहीं कारण नव्हतें. पण मुकादमाला तंबी भरण्याखेरीज दुसरें कसलें काम असतें ? कुणी काम करो वा न करो, त्यांना तंबी भरली नाहीं तर तो मुकादम कसला ? आपण आहों म्हणूनच सारें काम सुरळीत चाललेलें आहे हें प्रस्थापित करण्यासाठीं कुणाला तरी तंबी भरायला पाहिजेच

होती. त्याने आरडाओरड केली नसती तर तो हिंदी कारखान्यांतला मुकादम कसला ? मुकादम्यानें सारीं कामें झालीं तर मग आम्ही हिंदी कारखानदार कसले ?

तबी त्याच्या कानावरून निसटून गेली, पण ती त्याच्या मेंदूला शिवली नाही. त्याचें लक्ष त्या रसाशीं एकाग्र झालें होतें एक क्षणभरच तें चळलें, पण पुन्हां तो तिकडेच पाहू लागला. मुकादम निघून गेला होता

त्याच्या अंगातून घामाच्या धारा चालल्या होत्या आधींच कळकट झालेले त्याचे कपडे घामाच्या धारांनी जास्तच मचकट झाले होते. इतके कीं त्यांचा मूळ रंग कुणालाही सांगतां आला नसता.

विलायती कारखान्याच्या हकीकती मी नुसत्या वाचल्या आहेत. त्या वर्णनाशी आमचीं दृश्ये कांहीं जुळत नाहींत. कपड्यांच्या बाबतीत ही व्यवस्था आमच्याकडे झाली तर हिंदुस्तानचें नाव बद्दु होईल असें का आमच्या कारखानदारास वाटते ?

रस ओतला गेला. तो थिजत जात होता. त्याचें पोलाद बनत होतें कारखान्यातील रसायनक्रिया जशी व्हायची तशी होत होती

घटा झाली नि तो बाहेर पडला.

मुकादम धावत आला नि म्हणाला, " आतां कपडे बदल "

' कां ? ' त्याला प्रश्न पडला.

हें दररोज चाललें होतें. कुणीतरी पहायला आलें म्हणजे मग कपडे बदलायचे. तेवढ्यासाठीं कपडे निराळे ठेविले होते त्याला पुन्हां पुन्हां हा प्रश्न पडे, कीं कपडे कां बदलायचे ? दररोज असे कपडे बदलेले तर काय बिघडेल ?

पण हे कपडे कारखान्याचे होते आणि ते कपडे त्याचे होते. ते मळले तर कारखानदाराला त्याची पर्वा नव्हती ते घाण झाले, ते मचकट झाले, त्यांत उवा लिखा पडल्या, आणि तेच अंगावर घालून तो काम करूं लागला, तर कारखानदारांच्या अंगाला कांहीं खाज येणार नव्हती.

बूट—स्टॉकींगूज् नेकटाय—कॉलर पेहेरलेले कुणी गृहस्थ बरोबर घेऊन मॅनेजर त्यांना सारा कारखाना दाखवीत होते.

तो कपडे घालून तयार झाला होता. पाहुण्यांना वर्णन करून सांगत

असतांना मॅनेजर ज्यावेळीं त्याच्यासमोर आला त्यावेळी त्या मॅनेजरच्या चेहऱ्यावर प्रेमळपणा नुसता ओसडून राहिला होता त्याला प्रश्न पडला, दररोज तुसडेपणानें आपल्याकडे ढुकूनसुद्धां न पहाणारा तो हाच का मॅनेजर ? कां बरें त्याच्या वृत्तीत हा बदल पडला ? दुसऱ्याला दाखवण्यासाठीं आणलेली वृत्ति त्याने कायम ठेवली तर काय बिघडेल ? पाहुण्यांनीं त्याला प्रश्न केला तो उत्तरें देऊ लागला

" फार त्रासाच आहे नाहीं हें काम ? "

" त्रासाच तर खरंच एक क्षणभर आपण या भट्टीजवळ उभे राहून पहा. तासचे तास या भट्टीजवळ मला उभ रहाव लागत कातड सोलून निघत नुसत इथ कांही एअर–कंडीशन्ड सिनेमा हौसेस नाहीत "

मॅनेजरचे डोळे खदिरांगारासारखे होत होते

" एवढ्या भट्टीजवळ काम करून सुद्धां तुमचे कपडे मोठें सुंदर असतात !"

" हे भट्टीजवळचे कपडे नाहींत आपण येणार म्हणून आतांच घालायला दिले आहेत आम्हांला "

मॅनेजरच्या डोळ्यांकडे या वेळीं कुणी पहायला पाहिजे होतें

" अस्सं मग कुठले कपडे ते ? "

कपडे बाजूलाच पडले होते ते उचलून त्याने पाहुण्यांना दाखविले

कपडे पाहून पाहुणे नुसते हसले ते तरी काय नुसते बघेच होते स्वच्छ कपडे काय नि मळके कपडे काय—कुठल्यातरी कारखान्यांतील कुणातरी मजुरानें कसल्यातरी प्रकारचे कपडे घातले म्हणून त्यांच्या सुदर कपड्यांना कांहीं डाग लागणार नव्हते !

मॅनेजर म्हणाला, " चला, आतां दुसरं खातं पाहू "

त्या पाहुण्याला कांही अक्कल असती तर त्याने आणखी कांहीं पश्न केले असते, असें त्याला वाटलें. जगाला जीव तोडून सांगावें असें त्याला वाटलें. पण सागावें कुणाला ? केव्हां नि कसें ? ज्या ज्या वेळीं अशी संधि येई त्या त्या वेळीं पोलीस शिपायासारखा पाहुण्याबरोबर मॅनेजर सदोदित हजर असायचा.

तोंड बांधून बुक्क्यांचा मार होत होता.

चढवलेले कपडे उतरून फेकून देऊन आपले हक्काचे कपडे चढवून तो बाहेर आला. त्यासरशी मुकादमानें त्याच्या एक कानशिलांत लगावली

तो मोठमोठ्यानें हंसला. मुकादम म्हणाला,

" ठराविक उत्तराबाहेर तू कां उत्तर दिलस ? काय उत्तर द्यायची हे तुला चांगलं पढवून ठेवल होत ना ? असं असताना तुला आपली कल्पना चालवायची काय जरूर होती ? कारखान्याच्या इभ्रतीची तुला कांही काळजी आहे का ? "

भट्टीतल्या लोखडाच्या रसासारखाच त्याच्या अत करणांतला जीवनरस सळसळत होता संथपणाचा आव आणून तो म्हणाला,

" कारखान्याच्या आवारांत खरसुद्धां बोलायच नाही वाटत ? —"

" नाही ! " मुकादमानें दरडावून सांगितले. " कुठल्याही पाहुण्याला जी उत्तरं ऐकायला मिळतील त्यात एवढासुद्धां फरक पडतां कामा नये कारखान्याच काम कस एकतत्री चालल आहे, हें बाहेरच्या जगाला कळल पाहिजे "

" ठीक आहे " तो म्हणाला, " तर मग मला थोडी मोकळीक द्या त्यांना सारे मिळून उत्तर देऊं—तुम्ही पढविलेलीं नव्हेत—आम्हांला वाटतात तीं—आम्हाला जीं त्यावेळीं द्यावींशीं वाटतात ती—जी जगाला कळली पाहिजेत तीं. तुम्ही मोठमोठ्या जाहिराती देतां, बुलेटिन्स काढतां, कारखान्याचीं, आमच्या सुखसोयींचीं केलेली भडक वर्णनं छापता. फोटोसुद्धां देतां अत करण पेटत असतं, पण फोटो घ्यायच्या वेळीं तुम्ही आम्हांला हसायला सांगता, आम्ही हसतों ! कशासाठी ? तुमच्यासाठीं नव्हे—आम्ही आमच्या कर्माला हसतों पोट भरत नाही म्हणून इथ येतो आणि जळत्या खाईत काम करतों. म्हणून हसतों ! हिंदुस्तानचा उद्धार करतां आहांत तुम्ही, कारखाना चालवतां आहांत, नि त्या कारखान्यांतले आम्ही मजूर तापलेल्या शिगा आमच्या डोक्यावर मारतां आहांत. हें आमच कर्म ! तें पाहून आम्ही हंसतों—"

" गप्प बस " मुकादम कडाडला रागाच्या भरांत त्यानें पुन्हां एक त्याच्या थोबाडीत लगावली.

तो हसत सुटला गाल सणसणत होता. डोक्याच्या शिरा ताड्ताड् उडत होत्या रागाचा पेटका अंतःकरणांतून बाहेर येत होता मुकादमाची मुंडी धरून मुरगाळावी असें त्याला वाटत होतें.

मुकादम घाबरला त्याला वाटलें, याला हर्षवायु तर झाला नाहीं ! मुकादमानें पोक्त विचार केला, माथें फिरलेल्या माणसासमोर उभें राहूं नये. मुकादम

तिथून निघून गेला.

जेवण घेऊन आलेली त्याची बायको समोरच उभी होती मुकादमानें नवऱ्याच्या थोबाडींत भडकावली त्यावेळीं भीतीनें ती चूरमार होऊन गेली होती—

तो बाजूच्या व्हरांड्यावर बसला तिनें डबा काढून त्याच्यापुढे ठेवला. भाकरी समोर दिसताच त्याचा राग आणखी भडकला.

" ही भाकरी !" तो ओरडला. "या भाकरीच्या पायीं—ही पोटाची खळगी भरली पाहिजे म्हणून हे उपद्व्याप ! म्हणून या थोबाडीत खायच्या ! —"

त्यानें ती भाकरी हाती घेतली, चुरगळली नि फेकून दिली

" असं काय करायच तें ?" त्याची बायको म्हणाली, " अन्नाचा असा अपमान करू नये !"

तो आपल्याशींच हंसत होता डब्यातला कादा घेऊन त्यानें तो चरचरावून चावला.

दुसरा कांदा ठेचून त्यानें आपल्या डोक्यावर ठेवला.

चमत्कारिकपणें तो तिच्याकडे पहात होता. पण त्याच्या डोळ्यांतल्या बाहुल्या जागेवर नव्हत्या तीही त्याच्याकडे पहात होती

त्याने डब्याला लाथ मारली

तो आपल्या कामावर निघून गेला पुन्हां भट्टी सुरू झाली. पुन्हां लोखंड घगधगूं लागलें पुन्हां त्याचा रस होऊं लागला. पुन्हां तो ओतला जाऊ लागला

जगातल्या रहाटगाडग्याप्रमाणें त्या कारखान्यांतील रहाटगाडगे चालू होतें.

सध्याकाळ झाली. खेळण्याच्या मैदानावर सारीं माणसें गोळा झालीं होतीं. त्या कारखान्यांतील नांवाजलेला गोलदाज म्हणून तो प्रख्यात होता.

अगदीं पांढरपेशासारखा स्वच्छ पोषाख करून, पायाला गाद्या बांधून, हातांत हातमोजे चढवून तो चेंडू घेऊन उभा होता पाहुणे एका गुबगुबीत खुर्चीत चिरूट फुकीत बसले होते

त्याच्या कानीं शब्द आले " वाहवा ! ही समता कुठं दिसून येत नाहीं. मजूर-मालक—दोघेही एकाच क्रीडांगणावर खेळतात."

ते उद्गार त्या पाहुण्यांचे होते.

त्यानें हातांतला चेंडू फेकून दिला, व तो त्या पाहुण्याच्या समोर येऊन उभा राहिला "काय म्हटलत, मजूर नि मालक एका क्रीडांगणावर खेळत आहेत? विचारा पाहूं या मालकाना, राज ते असं खेळतात का? आमच्या सांवलीला तरी येतात का हे मालक? तुमच्यासारख्याना आमचं प्रदर्शन करून दाखवण्यासाठीं ही रोज सक्तीची प्रॅक्टीस करावी लागते आम्हाला त्यावेळी आम्ही मजूर म्हणूनच खेळत असतों. स्वत:च्या आनंदासाठी खेळत नसतो तुमच्यासारखे पाहुणे येतील, शेअरहोल्डर्स येतील, रास्थानिक येतील, पुढारी येतील, त्याच्यापुढ दरवेशाच्या माकडासारख आमच प्रदर्शन करायच असत, म्हणून आमच्यावर खेळायची सक्ती केली जाते. आणि ही सक्ती आमच्या कल्याणासाठी होते आहे म्हणून आम्हाला सांगण्यात येत, तुम्हालाही सागण्यात येत. आमच्या पोटांत किती अन्न जातं याची तुम्ही पाहुणे लोक कधी चवकशी करतां? गावात कलेक्टर यायचा असला म्हणजे पाटील जसा सारा गांव झाडून काढतो, तसच आमच्या कारखान्यांत चाललेलं असतं. तुम्हाला पाह्यच असल तर मजूर म्हणून इथ या, काहीं दिवस नोकरी करून पहा, नि आपली खात्री करून घ्या आपण शेअरहोल्डर आहांत, पुढारी आहात, मोठे माणूस आहांत, हें क्षणभर विसरा. मजूर म्हणून या, मग आमचे हे मालक तुम्हांला कसे काय वागवतात तें पहा, नि मग तुमचा रिपोर्ट प्रसिद्ध करा तोंपर्यंत आमचीं ही बुलेटिन्स वाचून गैरसमज करून घेऊं नका"

पाहुण्यांच्या विझलेल्या चिरुटासमोर पेटलेली काडी धरून मॅनेजर म्हणाले, "तो थोडासा वेडा आहे कुठलं कांहींतरी वाचतो नि कांहींतरी बडबडतो. बाकी कामाला फार उत्तम माणूस आहे. त्याच्या तोडीचा कामगार आमच्या कारखान्यात मिळायचा नाहीं तो आहे म्हणून माझा सगळा कारखाना चालला आहे, हें मी जाणतों.—पण हें मी जाणतों हें त्याला कुठ माहीत आहे! या सांगून कळायच्या गोष्टी नसतात. त्या जाणीवेनं जाणायच्या, अंत:करणानं ओळखायच्या असतात. मोठ्या माणसानं मजुराला सांगायच किती यालादेखील मर्यादा आहे—"

त्याच्या पायाचें रक्त मस्तकाला जात होतें. मालकाचा तो दांभिकपणा पाहून त्याच्या अंगाला आग पेटल्यासारखें झालें होतें.

तो तसाच निघून गेला. खेळाचा विरस झाला. त्या दिवशींची मॅच झाली नाहीं. पाहुण्यांना ती पहायला मिळाली नाहीं.

रात्रीं नाटक झालें. त्या नाटकांत त्यानें काम केले होतें. त्याच्या कामाची तारीफ होत होती. स्वतः पाहुण्यांनीं येऊन त्याच्याशी शेकहँड केला.

मालक गोड गोड हसत होते त्याच्या पाठीवरून हात फिरवून म्हणत होते, " वाः ! तूं आहेस म्हणून माझा कारखाना चालला आहे !"

पाहुणे निघून गेले. मालकांनी त्याला बोलावून समोर आणलें नि त्याच क्षणीं त्याचा पगार चुकता करून त्याला घालवून लावले

लोखंडाच्या कारखान्याखेरीज कसल्याच कामाची त्याला माहिती नव्हती. तो मूळचा जातीचा मांग होता.

मुकादमाच्या थपडा त्यानें कांहीं कमी खाल्ल्या नव्हत्या.

नोकरीवरून जातांना तो म्हणाला, " मी आहें म्हणून कारखाना आहे ना? आपण असं म्हणतां, नि आतां मी चाललों—मला तुम्ही घालवून देत आहांत. आता तुमचा कारखाना कसा चालणार ?"

" तुझ्यासारखीं शेकडों माणसं तयार करण्याची ताकद अंगी आहे म्हणून मी हा कारखाना चालवतों आहें "

" तें मला माहीत आहे, मालक. पण त्या पाहुण्याना तें तसं खोटं का सांगितलत, कीं मी आहें म्हणून कारखाना चालला आहे असं ? आजवर मला देखील असं वाटत असे, कीं मी आहें म्हणून कारखाना चालला आहे तुमच्या कारखान्यांत मी लिहायला-वाचायला शिकलों-मोठे उपकार झाले माझ्यावर तें मी विसरणार नाहीं. तुम्ही मोटरींतून हिंडतां पण आम्हाला पोटभर अन्न मिळत नाही.—"

बोलतां बोलतां त्याचा शब्द अडखळू लागला. तरीही मालक हंसत होता. " जा, उगाच डोकं फिरवूं नकोस. दुसऱ्या कुठं जाशील तिथ तरी माणसासारखं काम कर. असल्या भलत्या कल्पना डोक्यांत आणू नकोस." असें म्हणून मालकानें त्याच्या पाठीवर हात फिरवला.

मालकाच्या एक थोबाडीत मारावी असं त्याच्या मनांत येत होतें पण त्याच्या रक्तांत तें नव्हतें

त्यानें मालकाच्या पायावर मस्तक ठेवलें त्याच्या डोळ्यांत अश्रू आले होते. मालकाला वाटलें, त्याला पश्चात्ताप झाला. तो उभा राहिला. त्यानें पुन्हां लवून

रामराम केला. मालकाला वाटलें, पश्चात्तापाची परमावधि झाली. त्याच्या मनांत आलें, याला क्षमा करावी,——पुन्हां याला कामावर ठेवावें. पण शिस्त !

बेशिस्त वर्तन करणाराला त्यानें क्षमा केली असती तर कारखान्यांत बेशिस्त बोकाळली असती. बेशिस्त वर्तन करणाराला क्षमा होते, ही भावना मजुरांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली असती.

तसें होतां कामा नये.

मालकांनीं पुन्हां त्याच्या पाठीवर हात फिरवला नि म्हटलें, " जा बाबा, खुशाल जा. ईश्वर तुझं कल्याण करो."

तो निघून गेला. पण ईश्वरानें त्याचें कल्याण केलें नाहीं. म्हणूनच त्याचा ईश्वरावरचा विश्वास उडाला. एवढा मोठा मालक, त्यानें ईश्वराला हुकूम केला होता, कीं याचें कल्याण कर. पण त्या खट्याळ ईश्वरानें एवढ्या मोठ्या मालकाचा शब्द मान्य केला नाहीं.

एवढा मोठा मालक, एवढा मोठा कारखानदार, ' हिंदुस्तानच्या भाग्याचा भगवंत !' त्याचा शब्द देखील या ईश्वरानें ऐकला नाहीं ! त्यामुळेंच त्याची ईश्वरावरील श्रद्धा पार उडून गेली.

# छावणींत !

डॉक्टर या नात्यानें तो लढाईवर गेला होता घरच्या मंडळीला त्याचें धाडस मुळींच पटलें नव्हतें तो घरचा चांगला श्रीमंत होता नुकताच त्यानें दवाखाना काढला होता प्रॅक्टीसचा जमही बसू लागला होता. पण लढाई सुरू झाली त्यावेळीं त्याच्या डोक्यांत एकदम वारें शिरलें आणि नांव नोंदवून एके दिवशीं तो अचानक फिल्डवर निघून गेला

पहिली जी गुरख्यांची तुकडी बेल्जमच्या फ्रंटवर गेली होती, तिच्याबरोबर डॉक्टर म्हणून हॉस्पिटलचा दुय्यम अधिकारी या नात्यानें तो गेला आयुष्य सुखासमाधानात गेलेलें, ददात कसलीच नाही, पैशाचीही विपुलता, अशा ऐष-आरामात दिवस काढले असल्यामुळे पहिल्या पहिल्यानें लढाईच्या मैदानावरचें जिणें त्याला फार दु सह झालें.

दवाखान्यांतलें काम त्यानें हिंदुस्थानांत असतांना पुष्कळ केले होते तो एक नांवाजलेला सर्जन होईल अशी सर्वांची अपेक्षा होती. नव्या तरुण डॉक्टरात सर्जरीत त्याचा हात धरणारा कुणी क्वचितच सांपडला असता.—त्याला कुठली ही बुद्धि सुचली असेंच सर्वांना वाटलें.

त्यालादेखील तसेंच वाटत होतें. सुखासीन जीवाला लढाईच्या मैदानावरचे कष्ट सहन करणें पहिल्या पहिल्यानें फार कठीण गेलें. पहिल्याच फटक्याला जखमी लोकांच्या गाड्यांवर गाड्या येऊन पडूं लागल्या, तेव्हां त्याच्या जखमा बांधण्याच्या कामामुळें त्याला जेवायलासुद्धां फुरसत मिळेना

पुढें पुढें असें होऊ लागले, की जेवणाची त्याला क्षिति नाहीशी झाली

जें काय मिळेल तें उभ्या उभ्या खायचें आणि कामाला लागायचें

रोग्यांची शुश्रुषा करण्यांत तो इतका तन्मय होऊन जात असे, की त्यापुढें

त्याला आपल्या मातृभूमीची देखील आठवण राहिली नव्हती 'हिंदुस्थानांतला आपण एक कुणीतरी डॉक्टर असून हजारों कोसावर येऊन जखमा बांधण्याचें काम करीत आहों,' याची जाणीव देखील तो विसरून गेला होता

दिवसरात्र त्याला उसत कशी ती मिळत नसे त्याच्या जोडीचे जे डॉक्टर होते ते आपले काम चुकवण्याच्या बाबतीत फार तरबेज होते आणि हा जोडीदार कामें करणारा मिळाल्यामुळे आणि दुसऱ्यांची कामें आपल्यावर पडलीं तरी तक्रार न करण्याची त्याची वृत्ति असल्यामुळें आपलें काम त्याच्यावर टाकून ते इतर उद्योगांत सामील होत असत लढाईची धुमश्चक्री जरी चालली होती तरी पिछाडीला असलेल्या दवाखान्यातल्या प्रेमाच्या साम्राज्यांत यत्किंचितही बिघाड होत असे, असें नाही मोठमोठ्या घरदाजांच्या मुली नर्स म्हणून कामें करण्यासाठीं त्यावेळीं रणांगणावर आल्या होत्या त्यांच्या आवतीं भोवतीं फिरणारा डॉक्टराचा घोळका काम चुकविण्यासाठी काय युक्त्या योजाव्यात एवढ्यापुरताच डोक्याला शीण देत असे

त्या बॅचमध्यें डॉक्टर शरश्चंद्र एवढाच काय तो हिंदी डॉक्टर होता. बाकीचे युरोपियन होते वरिष्ठ सर्जन इंग्लिशमन होता कांहीं फ्रेंच होते रोग्यांची सुश्रुषा करणाऱ्या इंग्लिश नर्सेसची सरबराई करण्यात फ्रेंच डॉक्टर जितके तत्पर होते तितके इंग्लिशमन नव्हते

सगळेच जिवावर उदार झालेले होते आघाडीच्या शिपायांना जिवाची पर्वा नव्हतीच पण पिछाडीच्या डॉक्टरावर देखील कुठून आणि केव्हां आकाशाची कुऱ्हाड कोसळेल याचा नेम नसल्यामुळें ते देखील आला क्षण सुखांत कसा घालवावा याचाच विचार करीत असत. तिथें पापपुण्याची कल्पनाही नव्हती नीतिअनीतीचीही कल्पना नव्हती कल्पना होती एकच, कीं मृत्यू जवळ आला आहे—आयुष्य सपत आलें आहे—हा लोक केव्हां सोडून जावे लागेल हें सांगतां येणार नाही—तेव्हा आला क्षण कसा साधून घ्यायचा एवढेंच पहायचें. ह्या एकाच वृत्तीनें डॉक्टरांचा आणि नर्सेसचा घोळका एका जागीं जमत असे.

कुणी कुणाचा विनयभंग करण्याचें मनांत आणलें नव्हतें, किंवा लग्नाची कल्पना कुणाच्या अंतःकरणाला शिवली नव्हती तो घोळका जमलेला पाहून शरश्चंद्राचें हिंदी मन बिचकत असे. आनुवंशिक संस्कारांमुळें यात कांहींतरी पाप

आहे असें त्याला वाटे या घोळक्यापासून शक्य तेवढें दूर कसे रहावें याचा तो विचार करी, आणि त्यामुळेंच तो बाकीच्या डॉक्टरांचा थट्टेचा विषय झाला होता.

पण त्याची ही वृत्ति फार काळ टिकली नाहीं खंदकात रेडक्रॉसच्या कामावर गेलेले डॉक्टर मृत्युमुखीं पडले असे जेव्हा त्यानें पाहिलें, तेव्हां त्यालाही आयुष्याचें क्षणभंगुरत्व जाणवूं लागले तें क्षणभगुरत्व अमर्याद होतें. सांसारिक लोकांना त्याची कल्पना आली नसती प्लेगसारख्या सांथीच्या काळांत या क्षणभगुरत्वाची अंधुकशी कल्पना माणसाला येते, नाहीं असें नाहीं पण लढाईवरचें क्षणभगुरत्व त्याहीपेक्षां जाज्वल्य होतें

इतरांना तो नांवें ठेवीत होता, पण तसें करण्यांत आपण चूक करतों आहो असें हळुहळू त्याला वाटूं लागलें आयुष्याचा एवढा काळ आपण फुकट घालवला असें देखील त्याच्या मनांत येऊं लागले.

हळुहळू तोही त्या घोळक्यांत मिसळूं लागला स्त्रियांना आकर्षक होईल इतकी देहयष्टि त्याला लाभली होती. तो हिंदी होता, तरीही युरोपियन समुदायांत काळवंडून जाईल इतका तो काळा नव्हता नाकींडोळीं तर तो चांगलाच नीटस होता.

लढाईच्या रणांगणावर जितजेत्यांचा भेद फारसा कुणी ध्यानांत घेत नव्हतें. समतेच्या कल्पना बडबडणारे लोक लढाईच्या रणांगणावर गेले असते तर त्यांनीं देशभिन्नत्वाच्या किंवा देहभिन्नत्वाच्या अडचणी समतेला आड येतात असें कधींच प्रतिपादलें नसतें.

' त्या घोळक्यांत त्याच्यासारखीच एक नर्स होती. ती देखील इतर लोकांशीं अशीच फटकून वागत असे. इतर मुली जरी श्रीमंतांच्या घराण्यांतून आल्या होत्या तरी त्यांचें रक्त तिच्याइतकें निळसर नव्हतें 'निळ्या रक्ता'चा तिला मोठा अभिमान होता आणि म्हणूनच ती इतरांपासून शक्य तितकी दूर राही. तिला देखील त्या एकलेपणाचा कंटाळा आला होता. आणि म्हणूनच एकलेपणाला कंटाळलेलीं तीं दोन माणसें साहजिकच एका जागीं आलीं. इतर घोळका त्याना आपल्यांत मिसळून घेण्याचा प्रयत्न करीत होता. त्यांनाही वारंवार वाटे कीं आपण या घोळक्यांत मिसळावें. पण पहिल्यापासून तीं दोघेंही त्या घोळक्यापासून दूर राहिलीं होतीं—या घोळक्यांत आपण मिसळलों तर आपण आपला बाणा सोडला असें होईल असें वाटून त्या दोघांनींही शक्य तेवढा त्या एकलकोंडे-

पणाचा हट्ट चालविण्यास सुरवात केली, आणि म्हणूनच तीं मोठ्या प्रमाणांत इतराच्या थट्टेचा विषय होऊन बसू लागलीं

वरिष्ठ सर्जनच्या ही गोष्ट ध्यानीं आल्यावांचून राहिली नाहीं वरिष्ठ दर्जाच्या घराण्यांतली एक मुलगी एका काळ्या आदमीशीं मित्रत्वानें वागते आहे, हें त्याला पहावेना शक्य तेवढें त्या दोघाना एकमेकापासून दूर ठेवायचा प्रयत्न तो करू लागला. दोघांच्या कामाच्या वेळा त्यानें अशा ठेवाव्या, कीं एकमेकांना एकमेकाच्या भेटी घेणें सुलभ जाऊं नये. ती कामावर असली तर त्याला मोकळीक असे, आणि तो कामावर असला तर ती मोकळी राही.

बाकीच्या घोळक्याच्या हें ध्यानी आलें. आणि वरिष्ट सर्जन मुद्दाम अशी कांहीं योजना करतो आहे, हे पाहिल्यावर ती मडळी त्या दोघाच्या गांठी–भेटी सुलभ होतील अशा योजना घडवून आणू लागली

विरोधानें आकर्षण वाढत असते. वरिष्ट सर्जननें जर हा विरोध उत्पन्न केला नसता तर त्यांच्या स्नेहाची तीव्रता वाढली नसती. दोघाचा परिचय झाला असता, स्नेह जडला असता, क्वचित् उत्कट मैत्रीच्या सदरात त्यांचा परस्पर-संबध आला असता. पण प्रेमाचा प्रादुर्भाव झालाच असता असें नाहीं

ती मोठी मानी होती आणि हाही तितकाच आत्मप्रवण होता. वरिष्ठ सर्जन मुद्दाम आपली ताटातूट घडवून आणण्याचा प्रयत्न करतो आहे, हें जसंजसें त्याच्या ध्यानी येऊं लागले तसतशी त्यांची एकमेकांकडची ओढ तीव्रतर होऊं लागली. चोरून भेटी घेण्यासाठीं युक्त्या काढण्यांत त्या दोघांची बुद्धि खर्चे होऊ लागली

तो कामावर असला आणि ती कामावर नसताना त्याला भेटायला आली, तर टपून बसलेला वरिष्ट सर्जन तिला तिथून हांकलून देत असे. ती कामावर असतांना तो गेला तर त्याबद्दल त्याला विशेष वाटत नसे पण एका काळ्या आदमीच्या ओढीनें एक गोरी बाई बंदी मोडून आंत घुसूं पहाते याचें त्या वरिष्ठ सर्जनला वैषम्य वाटे

बाजूला घेऊन एके दिवशीं त्यानें तिची चांगलीच कानउघाडणी केली. तिनें तें बोलणें नुसतें हंसण्यावारी नेलें. तो वरिष्ठ सर्जन देखील तरुणच होता— शरश्चंद्राइतकाच तरुण होता म्हणून तिनें त्याच्या बोलण्याचा विपर्यास करून

त्याच्यावर मत्सराचा आरोप केला.

बाजूच्या घोळक्यानें या भानगडीत लक्ष घालायला सुरवात केली त्यांना कांहींना कांहीतरी कुरापत उकरून काढायची होती वरिष्ट सर्जनची त्यांच्यावर एक प्रकारची छाप होती आपण एक करडा अंमलदार आहों याचा त्याला जितका अभिमान होता, तितकाच सगळ्या काफिल्याच्या नीतीची जबाबदारी आपल्या डोक्यावर आहे, असें समजून तो वागत असे आणि म्हणूनच बाकीच्या डॉक्टराचा त्याच्यावर मोठा डोळा असे मिलिटरी शिस्तीमुळें त्याच्या हुकुमाच्या बाहेर जाणें त्यांना अशक्य होतें म्हणून खाजगी गोष्टींत त्याला कुठें ना कुठेंतरी पकडावें आणि त्याचा पाणउतारा करावा यासाठी ते टपून बसले होते

वरिष्ट सर्जन शरश्चंद्राचा हेवा करतो अशी कडी त्यांनी पिकवून दिली, आणि तोच सर्वांच्या चर्चेचा विषय होऊन बसला

वस्तुस्थिति तशी नव्हती असें काही म्हणतां येत नव्हतें वरिष्ठ सर्जनच्या अंत करणांत कुठें ना कुठें तरी त्या नर्सबद्दल ओलाव्याची जागा होती. इंग्लिशमन असल्याइतकाच ती ओलाव्याची जागा त्याच्या हृदयांत जागृत होती

एके दिवशीं शरश्चंद्राला त्यानें आपल्या तंबूंत बोलावून घेतलें मनाची तयारी करूनच शरश्चंद्र त्याला भेटायला आला होता. कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव न करितां वरिष्ठ सर्जननें त्याला उघड उघड प्रश्न केला, "या पोरीशीं तुझा हा जो खेळ चालला आहे त्याचा अर्थ काय?"

"खेळ चालला आहे असं तुम्ही कां म्हणतां?" शरश्चंद्र म्हणाला, "स्त्रियांच्या इभ्रतीची तुम्हां लोकांपेक्षां आम्हा हिंदी लोकांना जास्त किंमत आहे तिचा माझा परिचय झाला आहे एका ठिकाणीं काम करणारीं दोन माणसं एकमेकांशीं परिचित झालीं, एकमेकांचे स्नेहसंबंध एकमेकांना बांधून टाकूं लागले, तर कुठं बिघडलं?"

"स्नेहसंबंधापुरताच तुमचा हा संबंध आहे असं तुझं म्हणणं आहे का? त्याच्यापुढं मजल गेली नाहीं का?"

"त्याच्या पलिकडे मजल गेली असली तर ती एकपक्षी खास नाहीं. तिला भेटण्याची जितकी मला आवश्यकता वाटते त्यापेक्षां ती मला भेटायला जास्त उत्सुक असते, हें तुम्हीं पाहिलंच आहें. मी कांहीं अकुलीन माणूस नाहीं.

ती जितकी कुलवान आहे, तितका मीही आहें. तसाच कांहीं योग आला तर तिच्या दर्जानं तिला वागवण्याइतकी माझी योग्यता आहे—"

" पण तू हिंदी आहेस याची तुला आठवण आहे का ? "

" या लढाईच्या मैदानावर येतांना कोणती आठवण माझ्या अंतःकरणांत सतत जागी असेल तर ती मी हिंदी आहें हीच मी हिंदी आहें, म्हणूनच चांगल्या चालत असलेल्या प्रॅक्टीसला लाथ मारून काबाडकष्ट करण्यासाठीं—जवळ जवळ पोटापुरत घेऊन काबाडकष्ट करण्यासाठीं रणांगणावर आलों तुम्ही आलां आहांत ते सक्तीन—मी आलों आहें तो आपखुषीनं—हौसेनं—कांहीं नवीन शिक्षण मला या रणांगणांत मिळेल या आस्थेन— "

" तें हेंच नवीन शिक्षण घेतोस वाटतं ?" वरिष्ठ सर्जन खवचटपणें म्हणाला

" या शिक्षणासाठीं मला कांहीं रणांगणावर यायला नको होतं आमचे कितीतरी विद्यार्थी इंग्लडमध्यें जाऊन इंग्लिशमनच्या मुलींशी लग्न करून हिंदुस्तानांत परत गेले आहेत "

" पण त्या अशा मुली नव्हत्या. ही कुणाची मुलगी आहे, तुला माहीत आहे ? तिच्या बापाचा दर्जा तुला माहीत आहे ? कित्येक शतकांचं निळ रक्त तिच्या नसानसांतून वहात आहे याची तुला जाणीव आहे ? "

शरश्चंद्र नुसता हसला त्याच्या त्या हसण्यांत बेमुर्वतपणाची छटा होती त्या हंसण्यामुळेंच वरिष्ट सर्जनला चीड आली पण रागाचा आलेला आवेश गिळून तो म्हणाला, " मी तुझा वरिष्ट आहे—मिलिटरी वरिष्ट आहे. इथले कायदे किती कडक आहेत, हें तुला माहीत आहे ना ? त्या कायद्याचा आधार घेऊन तुम्हां दोघांची कायमची ताटातूट करणं माझ्या हातीं आहे याची तुला कल्पना आहे का?"

तितक्याच निश्चिंतपणें शरश्चंद्र म्हणाला, " मी केव्हांच अविचार करीत नसतों. लढाई केव्हांना केव्हांतरी संपणार आहे. केव्हांना केव्हांतरी आपण आपआपल्या घरीं जाणार आहोंत—अर्थात् जगलों तर जाणार आहोंत. पण जोंपर्यंत जिवांत जीव आहे तोंपर्यंत तिची माझी ताटातूट करणं तुम्हांला शक्य नाहीं. "

आणखी कांहीं दिवस निघून गेले. कांहीं दिवस वरिष्ट सर्जननें त्यांना आडकाठी केली नाहीं किंबहुना त्यांना सवलतच दिली. त्यांच्या गाठीभेटी वारंवार

होऊं लागल्या रुजणारें प्रेमाचें बीज हळुहळू फुटून बाहेर पडू लागलें. त्याचे अकूर वाढू लागले एके दिवशीं त्या नर्सचा बाप छावणींत येऊन दाखल झाला वरिष्ट सर्जननें त्याची शरश्चंद्राशीं ओळख करून दिली झालेला प्रकार वरिष्ट सर्जननें त्याला सांगितला असावा, असें त्याच्या बोलण्यावरून शरश्चंद्राला दिसून आले त्या म्हाताऱ्याने शरश्चंद्राला अगदीं सडेतोडपणानें सांगितलें, "मी एक खानदानी माणूस आहें तुमच्यांतल्या ऑर्थोडॉक्स् लोकांइतकाच ऑर्थोडॉक्स् आहें. तुमच्या लोकांत कठोरपणानं जात पाळतात तितकाच कठोरपणा आम्ही कित्येक शतक आचरणात आणीत आहोंत आमच्या रक्तात भेसळ होऊ नये म्हणून आमच्या कुटुंबातील मुली आजन्म अविवाहित राहिल्या आहेत—मुलगेही अविवाहित राहिले आहेत. अशा ह्या माझ्या मुलीशी लग्न होण्याची वेडी आशा मनात धरून तूं जर स्वत ला फसवून घेत असलास तर शेवटीं तुला धक्का बसल्यावाचून रहाणार नाही "

" हेंच का तुमचं कल्चर ? " शरश्चंद्र म्हणाला, " तुमची मुलगी सज्ञान आहे. मीही सज्ञान आहें दर्जाच्या दृष्टीन तुमच्या माझ्यात फरक नाहीं. फरक आहे काय तो देशाचा—"

"— आणि तोच महत्वाचा आहे " तो म्हातारा म्हणाला तेवढ्या-साठींच हें लग्न होतां कामा नये. याच्यापेक्षां तुझ्याशीं जास्त बोलण्याची माझी इच्छा नाहीं " असें म्हणून तो म्हातारा निघून गेला.

तिची त्याची जेव्हा भेट झाली, तेव्हां म्हाताऱ्यानें तिला देखील चांगलीच तंबी दिली होती असें दिसून आलें.

तरीही दोघांचा निश्चय अणूमात्र ढळला नव्हता दोघेंही एकमेकांशीं वचनबद्ध झालीं होतीं. उघड उघडपणें त्यानीं आपला वाङ्निश्चय सर्वांसमोर जाहीर केला, तेव्हां मात्र वरिष्ठ सर्जनचें पित्त खवळलें. त्यानें शरश्चंद्रावर नसत्या तोहमती घेण्यास सुरवात केली. आणि त्याचा परिणाम शरश्चंद्राला नोकरीवरून काढून टाकण्यांत झाला

तत्कालीन मिलिटरी कायद्याप्रमाणें नोकरी सोडतांच त्याला इंग्लंडमध्यें जाणें शक्य नव्हतें. परत हिंदुस्तानला जीं जखमी किंवा निकामी झालेलीं माणसें पाठविण्यांत येत होतीं त्या बोटीनेंच त्याची हिंदुस्तानांत रवानगी करण्यांत आली. वरिष्ठ सर्जनला आनंद झाला. तो आतां त्या नर्सशीं जास्त लगट करण्याचा प्रयत्न

करू लागला पण तिने त्याला दाद दिली नाहीं वाङ्निश्चित वधू म्हणजे विवाहित वधूपेक्षां निराळी नाही याची तिने त्याला ज्यावेळीं जाणीव करून दिली, त्यावेळी तिचे त उद्गार त्यानें थट्टेवारी नेले.

शरश्चद्राच्या जाण्याने त्याच्या सोबत्यांनाही फार वाईट वाटले जित–जेत्यांचा भेद त्यांच्या अत करणांत नव्हता. वरिष्ठ सर्जन हिंदुस्थानांतून आला होता म्हणूनच काळ्या–गोऱ्या रगाच्या जाणिवेनें तो शरश्चद्राचा छळ करीत होता, हे त्या नर्सप्रमाणेच इतरानाही माहीत होते

शरश्चद्र गेल्यानतर तिचे मन कामाकडे लागेना जरुरीपुरती रजा घेऊन ती इंग्लडमध्यें निघून गेली

वरिष्ठ सर्जन रणांगणावर असताना जखमी झाला. आणि त्याला बरेच दिवसपर्यंत दवाखान्यात पडून राहावें लागले बरा होताच इंग्लडमधील कन्व्हर्सट होममध्यें त्याला पाठविण्यांत आलें

तोंपर्यंत लढाई सपली नव्हती. अशा होममध्यें बिछान्याला खिळलेल्या लोकांना भेटी देण्यासाठी मोठमोठी माणसे वारंवार येत असत, त्याची विचारपूस करीत असता रणागणासबंधींच्या त्यांच्या मुलाखतीही घेत असत

अशीच भेट देणारी कांही मडळी एके दिवशीं त्या होममध्ये आली होती त्यातील दोन व्यक्तींना पाहून वरिष्ठ सर्जन आश्चर्यचकित झाला शरश्चंद्र त्याला सामोरा आला त्याच्याबरोबर असलेल्या त्या नर्सचा परिचय करून देत वरिष्ठ सर्जनला तो म्हणाला, "ही माझी पत्नी मिसेस शरश्चद्र. मी कुणीतरी साधा माणूस आहें अशी तुम्हीं कल्पना करून घेतली हिंदुस्तानांत जाणाऱ्या बऱ्याच ऑफिसर लोकांचीही जशी कल्पना होते तशीच ती होती.'पूर्व आणि पश्चिम कधींच मिळणार नाहीत,' अशी ग्वाही तुमच्या मोठ्या लेखकानीं कितीही मोठ्या कंठरवानें दिली, तरी ती चूक होय तुमचीसुद्धा चूक झाली, नि मला नोकरीवरून दूर करण्यात आलें हिंदुस्तानात जातांच दुसऱ्याच बोटीनं मी परत इंग्लंडला आलों. हिलाच मी बोलावून घेणार होतों. पण योगायोगानं तीही त्याच वेळी आली होती. आमचं दोघांचं लग्न झालं. आम्ही आतां फार सुखांत आहोंत. आणि या आमच्या सर्व सुखाचं श्रेय तुम्हाला आहे"

वरिष्ठ सर्जननें खालीं मान घातली

# गोव्याचा पाहुणा !

आम्हां गोवेंकरांचा मोठा दोष म्हणजे आमची आदरातिथ्यवृत्ति. ह्या आदरातिथ्याच्या पायीं आम्हीच आमची जितकी बदनामी करून घेतली आहे तितकी आमच्या वैऱ्यांना देखील साधली नसेल अतिथि म्हणजे आम्हांला देवतेसारखा वाटतो. कुळपरंपरेनें हा समज आमच्या रक्तांत भिनून गेलेला आहे. पाहुणा कोण आला आहे, कां आला आहे, याचा विवेक न करतांच तो आमचा पाहुणा आहे, एवढेंच घ्यानीं घेऊन आम्ही वागत असतों

गोमन्तक प्रांतांत हा समज सर्वसाधारण आहे त्यांत जातगोताचा भेद नाहीं पुर्तुगेजांच्या अंमलाखालीं जरी आम्ही वाढलों आहोंत तरी आमच्यावर खरा अंमल चालविणारीं आमचीं कुलदैवतें आहेत. ह्या आमच्या अदृश्य सरकारचा हुकुम आम्ही दृश्य सरकारापेक्षां देखील जास्त महत्त्वाचा समजत असतों. आणि म्हणूनच अतिथीचा सत्कार करण्यांत आमची कुळधर्मपरंपरा निरवच्छिन्न रीतीनें कशी पाळली जाईल, एवढ्यावरच आम्ही दृष्टि ठेवीत असतों

ब्रिटीश हद्दींतून एके दिवशीं एक पाहुणा आमच्या घरीं आला—आणि पाहुणा आल्यामुळें मलाही फार आनंद झाला.—त्यांतूनही हा पाहुणा कांहीं सामान्य नव्हता. तो एक मोठा लेखक होता. त्यानें अनेक विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले होते. सव्यसाचित्वाबद्दल त्याची फार प्रख्याति होती. महाराष्ट्रांतील लेखक बहुधा दरिद्री असतात. पण हा लेखक त्याला अपवाद होता. त्यानें साऱ्या हिंदुस्तानभर प्रवास केला आहे असें लोक सांगत असत. प्रत्यक्ष एकाद्या स्थळाचा परिचय करून घेतल्याशिवाय त्या स्थलाविषयींचें कथानक लिहायचें नाहीं असा त्याचा बाणा होता. आणि म्हणूनच तो आल्यामुळें मला फार आनंद झाला.

मोठमोठीं माणसें आमच्या या गोव्यांत येऊन गेलीं आहेत. इथें असतांना

तोंड फाटेपर्यंत त्यानी गोव्याची स्तुति केली आहे आणि इथून बाहेरच्या हद्दीत जातांच त्या स्तुतीचें निंदेत रुपांतर झालें आहे हें मला माहीत असल्यामुळे ह्या लेखकांना गोव्याचा परिचय करून देताना आपण पूर्ण सावधगिरी बाळगायची असें मीं मनाशीं ठरवलें

ब्रिटीश हद्दीपेक्षा आमच्या गोव्यातील रहाणी थोडी वेगळ्या स्वरुपाची आहे, हें सर्वांनाच कांहीं माहीत नाहीं. ब्रिटीश हद्दीतील लोक बहुधा नोकरपेशाचे असल्यामुळे आणि ब्रिटिशांच्या अनुषगाने नोकरीच्या वेळा एका प्रकारे निश्चित झालेल्या असल्यामुळें तिकडील रहाणीला इंग्रजी वळण लागलेलें आहे आमच्याकडे नोकरी–पेशाचे लोक फार थोडे. श्रीमतांची संख्या इतरांच्या मानाने मोठी मध्यम वस्तीही एकप्रकारें सुखवस्तु अशी परिस्थिति असल्यामुळें आमच्या दैनदिनींत बाहेरच्या लोकांच्या दृष्टीनें बरीच ढिलाई दिसून येते

ही जी ढिलाई आहे ती मात्र निश्चित आहे. पण बाहेरच्या माणसाला ती नैमित्तिक वाटते आणि म्हणूनच तो गैरसमज करून घेऊन निघून जातो

आमच्या पाहुण्याना पहिल्याच भेटीत मी आमच्या रहाणीचा पूर्ण परिचय करून दिला. लेखक–पाहुणे विलक्षण बुद्धिमान होते त्यांची दृष्टि मोठी तीक्ष्ण होती आकलनशक्ति सर्वव्यापी होती पण कोणत्याही गोष्टीकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन परिचयापूर्वीच निश्चित झालेला असेल याची मला कल्पना नव्हती.

गोव्याबद्दलच्या ज्या कांही समजुती ब्रिटीश हद्दीत प्रचलित आहेत त्या अनुरोधानेंच त्यांनी मला प्रश्न विचारायला सुरवात केली

गोव्यावरचा पहिला आक्षेप म्हणजे ही वेश्याभूमि आहे! माझ्या नित्याच्या पद्धतीप्रमाणें मी त्यांचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला.

" वेश्या नाहींत कुठं ? मग गोव्यावरच हा आरोप का ? " मीं म्हटलें, " कलेच्या संरक्षणासाठीं एक विशिष्ट समाज आमच्या पूर्वजांनी अस्तित्त्वांत आणून त्याची पद्धतशीर संघटना केली. तोच हा कलावत समाज इतर प्रातातल्या वेश्या आणि आमच्या प्रांतांतल्या कलावंतिणी यांच्या मनोवृत्तींत व रहाणींत जो फरक आहे तो या संघटनेमुळंच—"

माझ्या दृष्टीनें मीं मोठें तात्त्विक विवेचन करण्याचा आव आणला होता पण त्यानें लेखकमहाशयांचें समाधान झाले नाहीं. ते म्हणाले,

" मला प्रत्यक्ष माहिती पाहिजे आहे दुसऱ्यानं सांगितलेल्या किंवा आपुलकीच्या दृष्टिकोनानं पाहिलेल्या गोष्टींनीं माझं समाधान होणार नाहीं. "

मीं म्हटलें, " तर मग आपली निराशा होईल हा समाज—म्हणजे कलावत समाज दिवसेंदिवस नाहींसा होत चालला आहे आर्थिक परिस्थिति हें त्याचं कारण असो, किंवा सामाजिक जागृति असो, कलावंतीण अशी सज्ञा वाच्यार्थानें जिला देतां येईल अशी स्त्री आतां या प्रांतांत क्वचितच आढळून येईल कलावंतीण ही इथली एक जात आहे. चातुर्वर्णांत जरी तिचा उल्लेख नसला तरी समाजात त्या जातीला एक स्थान आहे त्या जातींतील कांहीं स्त्रिया परंपरेला अनुसरून आपल्या सेवावृत्तीचा डोलारा अजूनही उभारून धरूं पहात आहेत. "

" मग अशी एकादी परंपराप्रिय कलावतीण मला दाखवून द्याल काय ? " लेखकानीं विचारलें.

मला मोठी पचाईत पडली. माझ्या वाडवडिलांवर कुणी कांहीं आरोप करोत. पण मी एक मोठा पापभीरू माणूस आहें. एकाद्या जिज्ञासू माणसाची विचक्षण वृत्ति तृप्त करण्यासाठीं का होईना, कलावंतिणीच्या घरी जायला माझें मन धजावलें नसतें.

पण पाहुण्यांचा आग्रह पडला. मी पाहुण्यांना माझ्या एका मित्राच्या सुपूर्द केलें, आणि पाहुणे एका देवस्थानांतील एका कलावतिणीच्या घरीं जावयास निघाले. त्यांनीं फार आग्रह केला पण मी बरोबर गेलों नाहीं

हकीकत मला नतर कळली.—पाहुण्यांनीं सांगितली नाहीं, माझ्या मित्रानें सांगितली

आदरातिथ्याच्या रोगानें आम्हा गोमन्तकीयांना सारखेंच पछाडलें आहे त्यातून बिचारी कलावंतीण कुठून सुटते ? लेखक, लेखक म्हणून गेले नव्हते. पण ते उतरले मात्र तिच्या घरीं. तिनें त्यांचीं जेवणाखाणाची व्यवस्था सैंपाकी आणून करण्याचें सुचविलें, पण त्यानें रुकार दिला नाहीं. ते तिच्याच घरीं जेवायला राहिले. सन्मान्य गृहस्थ या नात्यानें तिनें त्यांचें आदरातिथ्य केलें. स्वभावसुलभ आपुलकीच्या वृत्तीनें ती वागू लागली. पण पाहुण्यांचा दृष्टिकोन भिन्न होता. त्यांना त्या आपुलकींत व्यवहार दिसला.

कुटुंबवत्सल गृहस्थाच्या घरीं स्त्रिया पुरुषाशीं बोलायलासुद्धां धजावत

नाहींत. पण कलावंतिणीला घरच्या कर्त्या पुरुषाचीच जागा भरून काढायची जबाबदारी असल्यामुळें ती साहजिकच मोकळ्या मनानें वागते--स्त्रीपुरुषभेद विसरून वागते हें सांगितले असूनसुद्धां पाहुणे विसरले.

पाहुण्यांच्या प्रात्यक्षिकाची मजल मर्यादेपलीकडे जेव्हां जाऊं लागली, तेव्हां त्या कुलीन कलावतिणीनें बाडबिछायतीसकट त्यांना घराबाहेर हुसकून लावलें. पाहुणे तिच्याकडे 'वेश्या' या नजरेने पहात होते 'कलावतीण' म्हणून नव्हे. वेश्या त्यांच्या परिचयाची होती 'कलावतीण' ही संज्ञासुद्धां त्यांना अपरिचित होती. ब्रिटीश हद्दींतील वेश्या देहविक्रय करणाऱ्या असतात तशीच ही एक असा त्यांचा समज होता आणि त्या समजाच्या अनुरोधानेंच त्यांनीं तिच्याकडे पाहिलें आणि म्हणूनच हा फटका खाल्ला.

झालेली हकीकत लेखकानीं जरी मला सांगितली नाहीं तरी आलेल्या अनुभवाच्या अनुरोधानें त्यांनी हजिरी घेण्यास सुरवात केली ते म्हणाले, "या तुमच्या कलावंतिणी मोठया मिजासखोर आहेत गोव्याबाहेरचे आम्ही लोक आलों म्हणजे आम्हांला चाळवण्या दाखवून दिपवून टाकूं अस त्यांना वाटत. पण विवाहित दंपत्यातच जिथ एकनिष्ठा मिळण मुष्कील, तिथं या कलावंतिणीनी कितीही दिमाख दाखविला तरी कुणाचा विश्वास बसणार आहे? मी आतां या गोष्टीचा पिच्छाच पुरवणार आहें."

जरी मला हकीकत कळली होती, तरी मी अंधारांत आहे असाच त्यांचा समज झाला होता. तो समज कायम ठेवण्यासाठी मी म्हणालों, "मला वाटतं, आला एवढा अनुभव पुरे झाला. परगांवांत बदनामी व्हायचं साधन कां उगीच निर्माण करतां?"

"मी एक जिज्ञासू आहें." लेखक आवेशानें म्हणाले. "माझ्या जिज्ञासेच्या चरितार्थापुढं बदनामीची मला पर्वा नाही."

लेखकांना अनुभव चांगलाच येणार असें समजून मी स्वस्थ बसलों. आणि त्याबरोबरच या भानगडींत लेखकांशीं सहकार्य करायचें नाहीं असें ठरवलें.

पाहुण्यांची मधुकरी सुरू झाली होती. प्रत्येक ठिकाणीं त्यांना एकच अनुभव येत होता. ज्या ठिकाणीं त्याची निराशा होणार नाहीं अशीं जीं कांहीं स्थळें होतीं त्या ठिकाणीं जायची त्यांची तयारी नव्हती.

निरनिराळ्या देवस्थानांतून ते हिंडत होते त्यांचा आदरसत्कार यथास्थित होत होता खाण्यापिण्यासाठी एक दिडकीही खर्च करावी लागत नव्हती पण—

पण त्यांचा उद्दिष्ट हेतु सफल होत नव्हता. गाणें—बजावणें भरपूर ऐकायला मिळत होते पण गाण्याची बैठक सपताच तें घर सोडून जावें लागले कीं त्याची पायांची तिडीक मस्तकाला जाई. ते म्हणत, " या बायकांच मला मोठं आश्चर्य वाटत असं वाटत, की याच्या अतःकरणात भेदभाव नाही. पण ही भेदभावशून्यतेची मर्यादा एका ठराविक मर्यादेच्या पलीकडे का जात नाहीं, याचं मला आश्चर्य वाटत साऱ्याच अशा कशा ? दृष्टीची चचलता, हावभावाची उत्तानता, हालचालींची श्रृगारिकता पाहिली म्हणजे इतरापेक्षा या निराळ्या नाहींत असं वाटाव, तोच त्यानीं बखोटीला धरून एकाद्याला बाहेर काढाव ! का ?

" म्हणजे ! " मीं विचारलें, " तुम्हाला कुणी बखोटीला धरून बाहेर काढल की काय ? "

मोठमोठ्यानें हसत पाहुणे म्हणाले, "मी अवलोकनासाठीं जातों. आस्वादासाठी नव्हे एकदोघा गुजराती शेठ्यांना तो प्रसाद मिळालेला मीं पाहिला "

"आता कळल ?" मी म्हटलें, "मीं पूर्वीच नव्हतं का तुम्हाला सांगितलं?"

" तरी अजून माझ समाधान होत नाहीं " लेखक म्हणाले, " स्त्रिया वश होण्याचीं दोनच साधनं आहेत एक पैसा किंवा एक प्रेम पैसा निष्फळ झालेला मी पाहिला——"

" आता प्रेमास्त्र सोडून पहाणार आहां वाटत ? " मीं म्हटलें.

लेखक मोठमोठ्यानें हंसले

लेखकानीं इतरांपासून चोरून ठेवलेलें आपलें नांव प्रगट केलें सर्वांकडून त्याना आमंत्रणें येऊ लागली व्याख्यानें सुरू झाली. चर्चा चालू झाल्या ते गायनाचे भोक्ते आहेत असें कळल्यामुळें त्यांच्यासाठीं गाण्याच्या बैठकीही होऊ लागल्या.

रोज माझ्याकडे मुक्काम असणारे लेखक मला आतां भेटणें सुद्धां मुष्कील झाले. आणि मीही त्यांची फारशी चौकशी करायची नाहीं असा निश्चय केला.

लेखकांना मेजवान्या देखील दिल्या जात होत्या. खाण्यापिण्याच्या बाबतींत लेखकमहाशय फारशीं बधनें पाळीत नाहीत असें दिसून आलें. मुंबईप्रमाणें

आमच्याकडे मोठीं हॉटेलें नाहीत आणि जीं कांहीं आहेत त्यात हिंदूंपेक्षां ख्रिस्ती लोकच जाणारे फार. लेखकाना फ्रेंच भाषा अवगत होती. त्यानी कांहीं पुर्तुगेजाचा स्नेह संपादन केला

हॉटेलची वर्दळ वाढू लागली पण पाहुण्याचे समाधान होईना. मधून मधून ते माझ्याकडे येत असत, त्यावेळी पुर्तुगेज युरोपियनाची देखील निंदा करीत असत ते म्हणत, " हे लोक आदरातिथ्याला तुम्हा हिंदूंसारखेच आहेत खरे. पण इंग्लिशमनची सर त्याना येणार नाहीं थोडासा परिचय होतांच हे लोक जो गळेपडूपणा करतात तो पाहिला म्हणजे जगाच्या बाजारांत पुर्तुगेजाची किंमत कमी का झाली आहे याच प्रत्यतर पटत कशाला हे युरोपात जन्माला आले ? बीर, पोर्टवाइन, ब्रॅको पिऊन का मदिरानदाचा अनुभव घेतां येतो ? ब्रँडी—व्हिस्की म्हणजे काय हें सुद्धा ज्याना माहीत नाहीं—जाऊ द्या ! कशाला उगीच दुसऱ्याची निंदा करा ! काय फसवणूक होत आहे ही आमची ! गोव्यात म्हणे दारू स्वस्त आहे ! पण ती कुठली ? काजूची ! किंवा नुसती—ताडाची !

" ताडाची नव्हे—" मी म्हटलें, " माडाची ! ताडी आणि माडी यांत फारच अंतर आहे. "

" असेल, असेल " लेखक उत्तरले, " पण आमच्या हिशेबीं ताडी माडी सारखीच उगाच तुम्ही लोकानी आरडा ओरडा केला आहे झाल ! गोवेवाले म्हणजे खादाड, गोवेवाले म्हणजे दारुडे, गोवेवाले म्हणजे प्रणयी ! तुमचं खाद्य पाहिल, दारू पाहिली नी प्रणयही पाहिला ब्रिटिशांच्या सहवासाशिवाय जीवनाचा आनद कसा अनुभवायचा हे तुम्हांला कळणार नाहीं हें तुमचं उशीरां उठणं, न्याहारीसाठी पन्नास प्रकार, आणि अपरात्रीचं जेवण---काय खावं हें सुद्धां कळत नाही ! प्रत्येक गोष्टीला कांही मर्यादा आहे आम्हीं सुद्धां मासे खातों. पण तुमची पद्धत अगदीच वेगळी. एकदां मुबईला या तुम्हाला मी ताजमहालांत घेऊन जाईन. केवढी स्वच्छता तिथं ? केवढा नीटनेटकेपणा ! केवढी टापटीप ? सर्व्हीस किती प्रॉम्प्ट ! इकडे पहावं तो जिकडे तिकडे ढिलाई--"

लेखक महाशयांचें चऱ्हाट सारखें चालू होतें मला वाटलें, त्यांची आवडती व्हिस्की त्याना कुठे तरी लाभली-- कुणी तरी मुंबईचा पाहुणा भेटला.

मीं म्हटलें, " आम्ही आपले साधे सिधे लोक आहोंत. पण तुम्ही आतां

सांगितल्या त्याच गोष्टीकडे तेवढं कां पहातां ? थोडंसं इथल्या निसर्गाकडे पहा. जरा अंतर्भागांत जा तेथली वनश्री पहा दुथडी गर्द झाडी असलेल्या आमच्या खाड्या पहा निसर्गाचं इतकं मोहक सौंदर्य हिंदुस्तानांतल्या कोणत्या भागांत आहे, तें तरी मला दाखवून द्या."

"निसर्ग—निसर्ग—निसर्ग !" लेखक मोठ्या आवेशाने ओरडले "निसर्गाचं सौंदर्य पाहून कांहीं डोक्याला कैफ चढत नाही, किंवा वासनेची तृप्तीही होत नाहीं प्रेम म्हणजे काय भावना आहे हें तुम्हां लोकांना माहीतसुद्धां नाही निसर्गाच्या सौंदर्यापलीकडे या तुमच्या गोव्यांत काय आहे? ईश्वरी सौंदर्याचं शारीरिक तेज ठिकठिकाणीं चमकतांना दिसतं, पण त्याचा उपभोग घेता येत नाहीं ईश्वराच्या उत्तम कलाकृतीचा अशा रितीन सर्वनाश होतो आहे ख्रिस्ती पाहिले ते धर्मभोळे, हिंदु पहावे तेही तसेच उच्च मनोविकारांची पेरणीच ज्या क्षेत्रांत झाली नाहीं, तिथ प्रेमाच्या स्वर्गीय भावनेची अपेक्षा करण्यांत तरी काय अर्थ आहे? सर्वव्यापी, प्रगाढ, नितांतरमणीय, बंधनशून्य अशा प्रेमाची अपेक्षा करून मी या तुमच्या प्रेमभूमींत येऊन फसलों मात्र—"

"कुणी सांगितलं तुम्हांला ही प्रेमभूमि आहे म्हणून?" मीं म्हटलें, "किंवा ही प्रेमभूमि नाहीं असं तरी कसं म्हणूं? ही प्रेमभूमि आहे पण ती कामुकतेची नसून वात्सल्याची—सौहार्दाची? तुम्ही भलताच समज करून घेऊन इथ येतां आणि मग तुमची निराशा होते. आम्ही तुमच आदरातिथ्य करतों तें आमचं कर्तव्य म्हणून. स्वतः पीत नसलों, तरी तुम्हांला दारु पाजतों–गृहस्थधर्म म्हणून. आणि मग तुम्ही असा समज करून घेतां कीं आम्ही दारूबाज आहों, आमच्या गोव्यांत खून होत नाहींत, मारामाऱ्या होत नाहींत. आमचे कायदे ढिले आहेत म्हणून तुम्ही थट्टा करता,पण कडक कायद्यांची आम्हाला आवश्यकता नसते कायदेबाजीमुळं तुमची लबाडी वाढली आहे. तसं आमच्याकडे व्हायला नको आहे."

"तुम्ही विषयांतर करतां आहांत." पाहुणे बजाऊन बोलले. "जिथं जावं तिथं मला असा अनुभव आला कीं प्रेमाच्या स्वर्गीय भावनेची तुम्हां लोकांना जाणीवसुद्धां नाहीं—."

मला तिटकारा आला. पुन्हां पुन्हां प्रेमाचं पुराण ऐकत बसण्याचा मला

वीट आला होता. मीं म्हटलें, "आणखी किती दिवस तुमचा मुक्काम होणार आहे?"

" आतां मात्र तुम्ही मुद्द्यावर आलां " लेखक म्हणाले. " तुम्ही माझ्या घरीं आलां असतां तर हा प्रश्न मी पूर्वीच केला असता "

दुसऱ्या दिवशीं लेखक महाशय निघून गेले,आणि माझा जीव खालीं पडला.

ते गोव्यात होते तोंपर्यंत लोकांनीं तोंडे बंद ठेवलीं होतीं. ते जाताच सारा इतिहास बाहेर पडला

कांही महिने निघून गेले आणि आमच्या सन्माननीय पाहुण्यांनीं लिहिलेले प्रवासवृत्त प्रसिद्ध झालें त्यांतील एक उतारा असा होता —

" जगात विसावें शतक सुरू झालें आहे याची जाणीव अजून गोमंतकाला नाही. सारें जग प्रगतिपथावर पाऊल टाकीत असता गोमंतकीय अजून कित्येक शतकें मागे आहेत हें त्यांचे आचारविचार पाहिलें असतां सिद्ध होतें त्यांची रहाणी सुद्धां इतकी मागसलेली, इतकी गलिच्छ आहे, कल्पना इतक्या कोत्या आहेत, कीं जगांतील सुधारणेचा त्यांना अजून मागमूसही लागलेला आहे कीं काय अशी शका उत्पन्न होते विवाहपूर्व प्रेम, समागमस्वातंत्र्य, बधनविरहित ससार, प्रभृति आधुनिक सुधारणांची नांवें त्यांनीं ऐकलीं सुद्धां नाहींत. गृहस्थधर्माची त्यांना अजून ओळख नाहीं जिकडे पहावें तिकडे गलिच्छपणा—तिरस्करणीय मनोवृत्ति ! असा एकादा प्रांत सुधारलेल्या हिंदुस्तानांत असेल, अशी कुणाला कल्पनाही होणार नाहीं. स्वाभाविक जीवनाचा आपण अनुभव घेत आहोंत अशा भ्रममूलक कल्पनेनें गोमन्तकीय लोक अज्ञानाधकारांत गटगळ्या खात आहेत ! "

माझ्यानें पुढें वाचवेना मी पुस्तक फेंकून दिलें कृतघ्नतेची परमावधि ती आणखी कोणती असणार !

मी निश्चय केला, आदरातिथ्याच्या खुळया कल्पना आतां पुरे झाल्या. बरा असो वाईट असो——सज्जन असो, दुर्जन असो——पाहुणा आला कीं त्याला दाराशीं उभा करायचा नाहीं !

# लेखकाचीं इतर पुस्तकें

## नाटकें

कुजविहारी
संजीवनी
सरस्वती
वरवर्णिनी
हाच मुलाचा बाप
समर्थ भिकारी (चंद्रशेखर)
लयाचा लय (नरकेसरी)
संन्याशाचा संसार
सत्तेचे गुलाम
पतित–पावन (तुरुंगाच्या दारात)
नवा खेळ
करग्रहण
करीन ती पूर्व
सोन्याचा कळस
जागती ज्योत
स्वयंसेवक
समोरासमोर

## लघु नाटकें

वज्रकुसुम
पापी पुण्य
संसार
नामानिराळा
सदा बंदिवान

## कादंबऱ्या

संसार कीं संन्यास
चिमणी
विधवा कुमारी
गोदु गोखले भाग १-२
धावता धोटा
परतभेट
कुलदैवत
उघडझांप
विकारी वात्सल्य
वेणू वेलणकर
उमलती कळी
१९१४ नंतर
न पुजलेली देवता
मलबार हिल (सौंगडी)
प्रेम संतान
मर्दांची माउली
तिची आत्महत्या

## लघुकथा

स्वैरसंच र
षोडशी

## किरकोळ

आघात (व्याख्यानें)
श्रुतिका (श्राव्य प्रकरणें)

मामा वरेरकरांनीं रचलेल्या खालील गाण्यांचे आमचे रेकॉर्ड आपल्या संग्रहीं ठेवा.

"HIS MASTER'S VOICE"

# हिज मास्टर्स व्हॉईस

**बेळगांव श्रूतिका मंडळ**

N 5238—यम—सावित्री संवाद (भाग १–२)

**यशवंत संगीत विद्यालय**

N 5245--ध्रुव (भाग १–२)

N 5249, N. 5250 —कालिया मर्दन (भाग १–४)

**मोहन, नयनतारा आणि पार्टी**

N. 5237— { रासक्रीडा, गोपाळ काला

**कु. गुलनार, कु. सुमती, कु. कामिनी**

N 5215--मुलींचे बंड, (भाग १–२)

**सहकारी मनोरंजन मंडळ**

N. 5124--कोंकणची नवरी.

N 5133, N 5134, N 5135—सिंहगड (भाग १–६)

N 5159, N 5160, N. 5161—भक्त तुकाराम (भाग १–६)

N 5142—घरगुती त्रिकूट (भाग १–२)

N. 5211—मी उभा राहिलों तर! (भाग १–२) इ. इ.

वरील रेकॉर्डस् कोणत्याही एच. एम्. व्ही. डीलरकडे मिळतील.

# फॅशन प्लेट्स !

लेडीज् व जेन्ट्स् टेलरकरितां फॅशन प्लेट्स् व बुक्स्, हेअर कटींग सलून करिता लेडीज्, जेन्ट्स्, बफ् कटींगचे फॅशन्स् व वॉशिंग कंपन्या, उपहारगृह, कापडाचे व्यापारी इ. सर्वांना दुकानाच्या शोभेकरता लागणाऱ्या **फॅशन प्लेट्स्** किफायत भावानें मिळतात. तसेंच फोटोग्राफी, एन्लार्जमेंट व फ्रेममेकींग उत्तम प्रकारें करून देण्याचें एकच ठिकाण:—

**वसंत आर्ट पब्लिशीग कंपनी,**

प्रो.—के. सी. घवाळकर, आंबेवाडी

म्याजेस्टिक सिनेमासमोर, मुंबई नं. ४



---

कुठेंच मनपसंत कपडे शिवून न मिळाल्यामुळे आपले **फॅमिली टेलर्स म्हणून कोणाला निवडावें?** हा प्रश्न तुम्हांला पडला असेल.

## दळवी ॲण्ड सन्स

( स्वस्तिक बिल्डिंग, पाथे सिनेमाशेजारी, लॅमिंग्टन रोड, मुंबई. )

**इकडे तुम्ही एकदांच गेला म्हणजे हा तुमचा प्रश्न कायमचा सुटेल !**

---

## भपका नव्हे तर प्रामाणिकपणा

आपलीं घड्याळें रिपेअर करावयाचीं किंवा नवीन घ्यावयाचीं असल्यास

**'स्वस्तिक वॉच कंपनी'** चाच

सल्ला घ्या. रिपेर काम तर अत्यंत काळजीपूर्वक केलें जातें.

मालक — स्वस्तिक वॉच कंपनी.

डी. बी. वायरकर — २०९ गिरगांव रोड, मुंबई ४




आपल्या पसंतीप्रमाणें
उत्तम शिलाईचे
कपडे
शिवण्याकरतां आपल्या
परिचयाच्याच ठिकाणीं
या.

जोशी ब्रदर्स
टेलर्स
आंबेवाडी, मुंबई नं. ४



सिगारेट ओढण्याचा खरा आनंद
"चेस्टर फिल्ड" मुळेच मिळतो. म्हणून सगळे लोक

"चेस्टरफिल्ड"
पसंत करतात.


# ABHYANKAR'S Shorthand & Typewriting INSTITUTE,

**Near Prarthana Samaj,**

**BOMBAY 4**

Special Features of the Institute

1 Thorough coaching on Scientific basis.
2 Moderate fees. May be given by instalments if preferred.
3 Students may join at any time
4 Special arrangement for LADY STUDENTS
5 Simple mechanism taught.

# सागर साहित्य

## आमच्या प्रकाशनाविषयीं लोकमत

### १ सागराच्या लाटा : प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई

**कथासंग्रह......पृष्ठें १५२... किं. १ रु.**

**विविध वृत्त**—.. उत्कृष्ट कथासूत्र सुचणारी बुद्धि आणि मनुष्यस्वभावांतील विविधतेची मार्मिक चिकित्सा व निरीक्षण करणारी दृष्टि हें सरदेसायांचें वैशिष्ठ्य आहे. सागराच्या लाटांतून ऐकू येणारें हें विविध सुरांचें सगीत ऐकल्यावर प्रो सरदेसायाच्या कौशल्याबद्दल कोणीही वाचक त्यांना धन्यवादच देईल

**नवा काळ**—...कथांमध्ये प्रादेशिक वातावरण निर्माण करण्यांत प्रो. सरदेसाई यांना बरेच यश आले आहे प्रादेशिक वातावरणामुळे या कथांन रम्यपणा आला आहे...'बंडखोर' ही कथा सर्वांत हृदयगम आहे....

**चित्रमयजगत्**—....'विलासिनीचा भविष्यकाळ' या गोष्टीला प्रस्तुत संग्रहांत मानाचें स्थान दिले पाहिजे...रजकता व आकर्षकता उत्पन्न करण्याचें कमब श्री सरदेसाई याच्या लेखणीत आहे. सग्रह एकंदरीत आल्हाददायक आहे. छपाई सुदर व कलापूर्ण आहे

**चित्रा**—.. प्रो सरदेसाई यांच्या लेखणीचे विशेष म्हणजे अत्यंत विशुद्ध, ओघवती, सफाईदार भाषाशैली, आणि नाजूक मानवी भावनांचें आणि सृष्टींतील सुदर दृश्याचें सारख्याच हळुवार हातानें केलेले चित्रण...

**विहार—उठावदार स्वभावचित्रांचा सुंदर कथासग्रह. रेखीव विचारशीलतेचा गुण** (मथळा). स्त्रीसौंदर्यासंबंधींच्या कथा यात नाहींत असें नाहीं. अगदीं सामान्य बीजांतून सुंदर लघुकथा लेखकानें निर्माण केल्या आहेत.

**समाजस्वास्थ्य**— त्या (लघुकथा) सर्वच वाचनीय आहेत आणि काहीं विशेष मननीय आहेत. लिहिण्याची पद्धतही एकंदरींत परिणामकारक आहे

## २ गुलाबगेंद् : जयवंतराव सरदेसाई

**कथासंग्रह......पृष्ठें ८२... किं १२ आणे**

**प्रतिभा**— मानवी मनाच्या सात्विकतेचा विचार होईल अशी या सर्व कथांची रचना व परिणाम आहेत ...मनाची पकड घेण्याचें–हृदय हालवण्याचें सामर्थ्य या कथेंत (पहिलें पाप) आहे त्यांचें स्वभावरेखन व संवादही स्वाभाविक वाटतात पाल्हाळिक, कंटाळवाणी, क्लिष्ट गूढ अशी एकही कथा या संग्रहात नाही. सामान्य वाचकांपासून चोखदळ टीकाकारांपर्यंत सर्वांना रुचणारे हे गेंद आहेत

**ज्ञानप्रकाश**—....बहुतेक कथांतून सुंदर कल्पना विखुरल्या असल्यामुळें कथाच्या गोडींत भर पडली आहे....'सोल्दाद' ही कथा अत्यंत कलापूर्ण आहे ...संग्रहावर श्री दणाईत यांचें सुंदर चित्र देण्यांत आलें आहे.

**विहंगम**—.. थोडक्यांत आटोपणें आणि कोठें थांबावें हे ठाऊक असणें हें लघुकथांचें व्याकरण लेखकानें चांगलें सभाळलें आहें. 'सोल्दाद' ही गोष्ट 'धूमकेतू' च्या गुजराती लघुकथांच्या वळणाची आहे.....

**केसरी**—....संग्रहांतील कांहीं कथांतून बोध पाझरत आहे तर कांहीं कथा केवळ मनोरंजक आहेत....रा. सरदेसाई यांची लेखनशैली मनोवेधक आहे ...

**समाजस्वास्थ्य**—...या दहाही लघुकथा वाचनीय असून पुस्तकाचें बाह्यांगही सुंदर आहे.

**पुरुषार्थ**—....प्रस्तुत कथासंग्रहांतील गोष्टी गोमन्तकीय वातावरणाशीं तद्रूप होऊन लिहिलेल्या आहेत. ..

**विहार**—...'सुखाचे क्षण' या कथासंग्रहापेक्षां 'गुलाबगेंद' अंतर्गत रचनेच्या दृष्टीनें सरस असल्याचें आढळून येतें. 'आठवणींचे अवशेष' या कथेची कल्पना नाविन्यपूर्ण आहे रक्षापुत्रींबद्दलही प्रेमळ पित्याला आपलेपणा वाटतो हें सत्य या कथेंत फार नाजुक रीतीनें मांडलें आहे. जयवंतरावांच्या कथालेखनाच्या कौशल्याचा नमुना ह्या कथेंत पहावयास मिळतो...

**चित्रमय जगत्**—आधुनिक कथावाङ्मयात अशा सुंदर गोष्टींचे संग्रह फार थोडे असतील. कला, भाषा, विचार, सहृदयता वगैरे कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी गोष्टींत दोष दाखविणें शक्य नाहीं...स्त्रीहृदयाचे धागेदोरे अत्यंत हलक्या हातानें उलगडून दाखविण्याचें कठीण पण उद्बोधक काम लेखकानें केलें आहे.... समाजाची सूक्ष्म चित्रें अवलोकन करून तीं सहृदयतेनें रेखाटण्याचा यशस्वी प्रयत्न (त्यांनीं) केला आहे....

## ३ वादळांतील नौका : प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई

**कथासंग्रह......पृष्ठें ११६.......किं १ रु.**

**ज्योत्स्ना [ वि स. खांडेकर ]**—...कांहीं गोष्टींत व्यवहारदृष्ट्या व्यभिचार या सदराखाली येणारे प्रसग आहेत पण त्यांच्या मुळाशीं असलेल्या निर्दय व निर्बुद्ध सामाजिक रूढी पहिल्या म्हणजे त्यांचें चित्रण गैर वाटत नाहीं।

**विविधवृत्त [परिचित, फोंडा]**—....अशा वेळीं असलीं अश्लील, सुप्त कामवासना उद्दीपित करणारीं, लैंगिक भावनाचा क्षोभ करून तरुण स्त्री पुरुषांच्या शुद्ध चारित्र्याला अनिष्ट वळण लावणारीं, कौटुंबिक स्वास्थ्यात माती कालवून समाजरचनेची घडी विस्कळित करणारीं, भिकारडीं, हिडीस पुस्तकें अविवाहित स्त्रीपुरुषांच्या हातांत देण्याचें महत्पाप होऊं नये, एवढ्याचसाठीं ह्या घाणेरड्या चोपड्याचा असा परिचय मी करून देत आहें ह्या पुस्तकाचीं ११६ पृष्टें विषय कर्दमांत लिडबिडलेली असून त्यांतील वर्णनशैली अनीतीला उत्तेजन देणारी आहे

**चित्रा**—...हा संग्रह अंतर्बाह्य सुंदर आहे उत्तान प्रेमाचीं नऊ स्वरुपे लेखकानें आपल्या कुशल कलमानें या नऊ गोष्टींत चित्रित केलीं आहेत. ही गोष्ट लक्षात ठेऊन सामान्य वाचकानें या गोष्टी वाचल्या तर त्याच्या निरोगी मनावर विशुद्ध आनदोद्दीपक असाच परिणाम त्या करतील पण सडक्या मनाच्या आणि दुबळ्या प्रकृतीच्या विकारी वाचकावर मात्र या कथांचा कामोद्दीपक परिणाम होऊन त्याला त्रास होण्याचा आणि हें पुस्तक अश्लील वाटण्याचा संभव आहे. पण त्याबद्दल या पुस्तकाला दोष देणें अन्यायाचे होईल .. श्रृंगारिक कथा इतक्या जबाबदारीनें लिहिल्याबद्दल लेखकाचें अभिनदन करणे जरूर आहे ..

**चित्रमयजगत्**—प्रेमविषयक कथाच्या सागरांत ह्या कथासग्रहानें चांगलीच भर घातली आहे मुखपृष्ठावरील चित्र म्हणजे चित्र कलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे

**निर्भीड**—साध्या, व हृदयस्पर्शी लघुकथा लिहिण्यांत प्रो. सरदेसाई यांचा हातखंडा आहे. . त्यांच्या सर्व वैशिष्ठ्याचीं उदाहरणें या संग्रहांतही विपुल आहेत.

**महाराष्ट्र शारदा**—मानवी मनांतील विचारविकारांचें कोडें सोडविण्यांत लेखकाचें कौशल्य दिसून येतें....मुखपृष्ठावरिल चित्र नांवाला शोभून दिसतें.

**समाजस्वास्थ्य**—.. प्रस्तुतचा कथासंग्रह त्यांच्या पूर्वीच्या संग्रहां पेक्षांही सरस म्हणतां येईल.

**स्तव**—....आपल्या मनोरम भाषाविलासानें वाचकांचें चित्त वेधून त्यांना रिझवूं शकणारे कांहीं अगदी थोडे लेखक आपल्यात आहेत त्यांत प्रो. सरदेसायांचा समावेश करणें न्याय्य आहे मुखपृष्ठावरील चित्रात सूचकतेबरोबर जिवतपणाही आहे.

## ४ कुळागर : संपादक—बा. द. सातोस्कर, बी. ए.

**गोमन्तकीय लेखकांचा प्रादेशिक कथासग्रह पृ ११२, किं. १ रु**

**सोल एजंटः—तुकाराम पुंडलीक शेट्ये, माधवबाग मुंबई ४**

**ज्योत्स्ना [ वि स खांडेकर ]**— कथाविषय व रस यांचे आकर्षक वैचित्र्य या सग्रहांत साधलें आहे

**उषा (भा वि वरेरकर)**— भावनाप्रवणतेच्या कसोटीला लावतां 'कुळागर' मधील कथा अधिकृत वगलेखकांच्या कसोटीला उतरतील इतक्या सुंदर आहेत.. कथाकथित भूमिकेशीं तादात्म्य पावून लिहिलेली इतकी सुदर कथा ( दिवटीचा प्रकाश ) मराठी वाङ्मयांत क्वचितच आढळेल या एकाच गोष्टीनें 'कुळागर' हा संग्रह अद्वितिय झाला आहे...

**विविधवृत्त**—...विषयांची विविधता, लेखनकामाठीचें चातुर्य, आणि मनोरंजनाचें उद्दिष्ट या तीनही दृष्टींनीं 'कुळागर' वाचण्यासारखा झाला आहे टाकाऊ कथेला संग्रहांत स्थान मिळालेलें नाहीं, यामुळें पुस्तकाचें वाचन आनददायक होतें

**केसरी**—.. यांतील सर्वच कथा वाचनीय आहेत....गोष्टीत गोमंतकीय जीवनाचीं चित्रें मनोहरपणें मांडलीं आहेत ...

**चित्रा**—...हा प्रादेशिक लघुकथांचा संग्रह त्यांतील विषयवैचित्र्य व भाषाशैली या दोन्ही गुणांनीं महाराष्ट्रवाचकांचें मन आकर्षण करून घेऊन त्यांस आपल्या गोमंतकीय बंधूविषयीं माहिती करून देणारा असल्यामुळें हा संग्रह प्रसिद्ध केल्याबद्दल श्री सातोस्कर हे अभिनंदनास पात्र आहेत ...

**चित्रमयजगत्**—...वाचकवर्गाला प्रादेशिक कथासाहित्याची यथार्थ कल्पना आणून देण्याच्या हेतूनें विशेष निवडानिवड करून व सखोल चिकित्सक दृष्टि ठेवून हा संग्रह तयार केला आहे कुळागर हें पुस्तकाला दिलेलें नांव रम्य आहे

**लोकमान्य**—...गोमन्तकांतील समाजजीवनाच्या निरनिराळ्या अंगांवर ह्या संकलित कथांनीं प्रकाश पाडला आहे. 'कुळागर' हा प्रादेशिक कथासग्रह प्रसिद्ध करून सातोस्कर यांनीं मराठी वाङ्मयांत मोलाची व वैशिष्ट्यपूर्ण भर घातली आहे.

**भारत**—....ह्या कथासंग्रहांतून विविधता व आकर्षकता आणण्याचा यशस्वी प्रयत्न प्रकाशकांकडून तडीस गेला आहे. श्री. सातोस्कर उत्तरोत्तर अशींच पुस्तके प्रकाशित करून गोमन्तकाच्या वाङ्मयसंपत्तींत भर घालतील अशी आशा आहे ..

**समाज सुधारक**—...या कथासग्रहामुळें गोमन्तकाच्या बहिरंगाची प्रायः पूर्णत्वानें व अतरंगाची बरीचशी ओळख गोमन्तकीयेतराना होईल ...